CMYK

सोलापूर तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

▌dainiktarunbharat.com

▌epaper.dainiktarunbharat.com

लातूर | शनिवार, २१ मार्च २०२६ । वर्ष ४ थे अंक १३ । पाने १२ । किंमत रु. ६/-


# महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकरांचा राजीनामा

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांकडे सोपवला | अशोक खरात प्रकरण भोवले

**पुणे, दि.२० मार्च-**

नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात याने अनेक महिलांचे लैंगिक शोषण केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आल्यानंतर संपूर्ण राज्यात संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणाला आता मोठे राजकीय वळण लागले असून, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांचा खरातची पाद्यपूजा करतानाचा व्हिडिओ आणि त्याच्यासोबतचे काही फोटो समाजमाध्यमांवर व्हायरल झाले आहेत. या गंभीर प्रकारामुळे चाकणकर यांच्यावर चोहोबाजूंनी टीकेची झोड उठली होती. तसेच विरोधकांनी त्यांच्या राजीनाम्याची आग्रही मागणी लावून धरली होती. अखेर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेऊन चाकणकरांनी राजीनामा दिला असल्याचे समोर आले आहे. तसेच वैयक्तिक कारणाने राजीनामा देत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.



नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणामुळे राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांना आपले पद गमवावे लागले असून, राष्ट्रवादी काँग्रेसने शुक्रवारी सकाळीच त्यांना राजीनामा देण्याच्या सूचना केल्याची माहिती समोर आली आहे. त्यानुसार चाकणकर यांनी प्रथम महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला असून, आता त्या राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाचाही राजीनामा देणार असल्याची दाट शक्यता वर्तवण्यात येत आहे. रुपाली चाकणकर यांनी नुकतीच पुणे डीजींची भेट घेतली होती. तसेच सुनेत्रा पवार यांच्या भेटीसाठी जाण्यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची त्यांनी वर्षा बंगल्यावर भेट घेतली होती. त्यानंतर रात्री उशिरा चाकणकर यांनी सुनेत्रा पवारांची भेट घेतली व या भेटीत त्यांनी राजीनामा दिला आहे.

### राजीनामा देण्याचे आदेश दिल्याबद्दल मुख्यमंत्र्यांचे आभार : रोहित पवार



रोहित पवार यांनी ट्विट करत म्हटले की, मुख्यमंत्री साहेबांनी महिला आयोगाच्या अध्यक्षांना राजीनामा देण्याचे आदेश दिल्याचे समजत आहे, याबाबत मुख्यमंत्र्यांचे आभार, परंतु केवळ राजीनामा घेऊन चालणार नाही तर या प्रकरणाच्या तळाशी जाऊन पारदर्शक चौकशी करावी आणि आ. अमोल जी मिटकरी म्हणत असल्याप्रमाणे अजितदादांच्या अपघाताशी या भोंदू बाबाचे कनेक्शन आहे का? याचाही तपास व्हायला हवा.

### उपमुख्यमंत्री पवारांनी राजीनाम्याचे आदेश द्यायला पाहिजे होते : अंधारे



शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे म्हणाल्या, राजीनामाचे आदेश गृहमंत्र्यांनी दिले असतील तर स्वागतचा आहे. मात्र एक खंत आहे की हीच भूमिका राज्याचे खमके नेतृत्व म्हणून राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री आणि या पक्षाचे अध्यक्ष सुनेत्रा वहिनींनी घेणं जास्त अपेक्षित होतं. दुर्दैवाने त्यांनी ही संधी गमावली.. असो, चाकणकरांना सहआरोपी करून अटक करा.

**अशोक खरातसोबतचे अनेक फोटो व्हिडिओ व्हायरल :** राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर आणि अशोक खरात यांच्यातील जवळीक दर्शवणारे अनेक व्हिडिओ आणि फोटो सध्या समाजमाध्यमांवर प्रचंड व्हायरल होत आहेत. एका व्हिडिओमध्ये चाकणकर या खरातची 'पाद्यपूजा' करताना दिसत आहेत, तर दुसऱ्या एका प्रसंगी त्यांनी खरातची तुलना थेट 'विठ्ठलाशी' केल्याचे समोर आले आहे. महिलांच्या हक्कांचे रक्षण करणाऱ्या घटनात्मक पदावर बसलेल्या व्यक्तीचे अशा वादग्रस्त भोंदूबाबाशी असलेले हे अतिशय घनिष्ट संबंध पाहून सर्वच स्तरांतून संताप व्यक्त केला जात आहे. केवळ वैयक्तिक संबंधच नव्हे, तर रुपाली चाकणकर या अशोक खरातने स्थापन केलेल्या ट्रस्टच्या संचालिका असल्याचेही उघड झाले आहे. विशेष म्हणजे, गेल्या वर्षी एका महिलेच्या लैंगिक छळ प्रकरणात पीडितेला मदत करण्याऐवजी चाकणकर यांनी उलट खरातलाच साथ दिल्याची धक्कादायक माहिती आता समोर आले आहे.







सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# सोलापूर महापालिका सभेत पाणी प्रश्न पेटला

## सार्वजनिक आरोग्य अभियंता तज्ज्ञ आहेत का?

## स्काडा प्रणाली कामाची चौकशी करण्याची मागणी

## पाणीपुरवठा संदर्भात महापालिकेची विशेष सभा घेणार : महापौर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मार्च-**

सोलापूर महापालिका सर्वसाधारण सभेत आज पाणी प्रश्नावर लक्षवेधी मांडत सत्ताधारी व विरोधी सदस्यांनी अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. स्मार्ट सिटी अंतर्गत केलेल्या स्काडा प्रणाली विस्कळीत पाणीपुरवठा गढूळ पाणीपुरवठा त्याचबरोबर अचानक पाण्याचे दिवस वाढविण्याचा घेतलेला निर्णय यावरून सदस्यांनी संताप व्यक्त केला.

सोलापूर महापालिकेची सर्वसाधारण सभा महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली आज पार पडली या सभेच्या सुरुवातीलाच अनंत जाधव यांनी विस्कळीत पाणीपुरवठाकडे लक्ष वेधले. लक्षवेधी मांडत अधिकाऱ्यांना धारेवर धरले. सुरुवातीला प्रोसिडिंग महत्त्वाचे की पाण्याचा प्रश्न महत्त्वाचा यावरून अनंत जाधव आणि अमोल शिंदे यांच्यात शाब्दिक चकमक उडाली. एकीकडे महापौर हे दिवस कमी करण्याची घोषणा करतात तर दुसरीकडे पाणीपुरवठा अधिकारी दिवस वाढविण्याचा निर्णय घेतात. हे दिवस का वाढवले असा संतप्त सवाल अनंत जाधव यांनी उपस्थित केला.

त्यावर सार्वजनिक आरोग्य अभियंता वेंकटेश चौबे यांनी खुलासा केला. मात्र सदस्यांना त्यावर समाधान झाले नाही. आतापर्यंत २५ वर्षात पाणीपुरवठ्यावर किती



निधी खर्च केला? किती पाणी लागते ? किती साधने उपलब्ध आहेत असा प्रश्न उपस्थित करत सार्वजनिक आरोग्य अभियंता तज्ञ आहेत का याबाबत शंका आहे अशी टीका करण्यात आली. स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत एबीसीडी पाणीपुरवठ्याची कामे करण्यात आली. स्काडा प्रणाली राबविण्यात आली. ती अपयशी ठरली आहे. कामे करून मक्तेदार पळून गेला आहे. पाणी प्रश्न गंभीर बनला आहे. चौबे हे चुकीची, दिशाभूल करणारी माहिती देत असल्याचा आरोप सदस्यांनी केला. शहरात काही ठिकाणी पाच ते सात दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. चा फटका सामान्य नागरिकांना बसतो. प्रभाग १० मध्ये तर तब्बल दहा दिवसाआड पाणीपुरवठा होत असल्याचे नमूद करण्यात आले. एमआयडीसीतील कंपन्यांकडून पालिकेचे अधिकारी हप्ते घेतात असा आरोप केला. त्या कंपन्यांवर एवढी मेहरबानी का असा सवाल अनंत जाधव यांनी उपस्थित केला.

सोलापूर शहरात सणासुदीच्या काळातच पाणीपुरवठा विस्कळीत केला जातो. याप्रकरणी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. पाणी प्रश्नी झालेल्या चर्चेत राजकुमार पाटील, डॉक्टर किरण देशमुख, हजहर हुंडेकरी, युवराज सरवदे, प्रथमेश कोठे, शिवानंद पाटील, मनीष केत, वहिदा शेख, अक्षयकुमार अंजीखाने, रोहिणी तडवळकर, सत्यजित वाघमोडे, वैभव हत्तरे, वंदना गायकवाड, श्रीदेवी फुलारे , वृषाली चालुक्य, रंजीता चाकोते, बिजू प्रधाने, अविनाश पाटील, संजय कोळी, किसन जाधव, गणेश वानकर, अमोल शिंदे, चेतन नरोटे यांच्यासह सदस्यांनी प्रश्न उपस्थित करत अधिकाऱ्यांना धारेवर धरले. पाणी प्रश्न विशेष सभा घेण्यात येईल, असे महापौर विनायक कोंड्याल यांनी स्पष्ट केले.

**पाण्याचा अपव्यय करणाऱ्यांवर कारवाई करा : मनीष केत**

सोलापूर शहरात अनेक जण पाण्याचा अपव्य करतात. महापालिका आयुक्तांनी या संदर्भात कारवाई करण्याचे आदेश दिले होते त्यावर कारवाई केली का ? शहर आणि हद्दवाढ भागात जर पाणी देताना दुजाभाव केला असेल तर मग हळदवाड भागात ५० टक्के पाणीपट्टी घ्यावी अशी मागणी मनीष केत यांनी केली.

**चवदार तळे स्मृती शिल्प उभारण्यास मान्यता**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाड येथे चवदार तळ्याचा सत्याग्रह केला. उपेक्षित वंचितांना न्याय दिला. त्यास ९९ वर्ष पूर्ण होत आहेत. त्याचे स्मरण म्हणून शहरातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक येथील संविधानभावनाच्या जागेवर चवदार तळे सत्याग्रह स्मृती शिल्प उभारण्याचा प्रस्ताव शिंदे सेनेचे गटनेते अमोल शिंदे यांनी मांडला. त्यास एकमताने मान्यता देण्यात आली.

### पंधरा वर्षे झाले नळाला पाणी येत नाही; रोहिणी तडवळकर संतापल्या

विस्कळीत पाणीपुरवठ्याच्या विषयावर बोलताना रोहिणी तडवळकर या संतापल्या. गेली पंधरा वर्षे झाले आमच्या घरातील नळाला पाणी येत नाही तरीही आम्ही टॅक्स भरतो. ज्या ठिकाणी बे रात्री पाणीपुरवठा होतो त्या ठिकाणी टँकरने पाणीपुरवठा केला जाईल असे स्पष्टीकरण आरोग्य अभियंता चौबे यांनी दिल्यानंतर तडवळकर संतापल्या. मी काय टँकरवर पाणी भरू का ? बेजबाबदारपणे बोलू नका. तर मग टॅक्स भरणार नाही असा इशारा त्यांनी दिला.

### खून प्रकरणातील आरोपी शालन शिंदे सभेला उपस्थित

सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुक कारणावरून झालेल्या एका खून प्रकरणी अटकेत असलेल्या नगरसेविका शालन शिंदे या पोलीस बंदोबस्तात पालिका सभेत हजर झाल्या. संपूर्ण सभेला त्यांनी उपस्थिती दर्शवली. सभा संपल्यानंतर पोलीस बंदोबस्तातच त्या सभागृहाबाहेर गेल्या.

# महापालिका सर्वसाधारण सभेत ५२ विषयांना मंजुरी

## सत्ताधारी, विरोधकांनी विविध विषयांवर महापालिकेच्या अधिकाऱ्यांना धरले धारेवर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० मार्च-**

सोलापूर महानगरपालिकेची मार्च महिन्याची सर्वसाधारण सभा शुक्रवारी वादळी वातावरणात पार पडली. विविध विषयांवर जोरदार चर्चा, आरोप-प्रत्यारोप आणि गदारोळाच्या पार्श्वभूमीवर एकूण ५२ महत्त्वाच्या प्रस्तावांना एकमताने मंजुरी देण्यात आली. गोंधळ, गदारोळ आणि दोन आमदार गट आमने-सामने आले. मात्र महापौर विनायक कोंड्याल यांनी समन्वय आणि समतोल साधत सभा यशस्वीरित्या पार पाडली. राजमाता जिजाऊ, वीरांगणा राणी अवंतीबाई लोधी तसेच माजी महापौर महेश कोठे यांचे पूर्णाकृती पुतळे उभारण्याच्या प्रस्तावांना हिरवा कंदील देण्यात आला.

महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेच्या यशवंतराव बळवंतराव चव्हाण सभागृहात ही सभा घेण्यात आली. यावेळी डायसवर उपम हापौर ज्ञानेश्वरी देवकर, महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे, नगरसचिव प्रवीण दंतकाळे यांची उपस्थिती होती. या सभेत महापालिका आयुक्तांकडून आलेल्या पाच विषयांना, तर ४३ सभासद प्रस्तावांना एक मताने मंजुरी देण्यात आले. त्याचबरोबर तातडीच्या चार विषयांना मान्यता देण्यात आली. नगरसचिव दंतकाळे यांनी विषयाचे वाचन केले. सभागृह नेते नरेंद्र काळे यांनी सूचना मांडली. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना अंतर्गत १५ कोटी ९८ लाख ४७६ रुपये निधी शासनाकडून १०० टक्के उपलब्ध होणार आहे त्याअनुषंगाने हा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रशासकीय वित्तीय मान्यश्रेष्ठ पाठविण्यास एकमताने मंजुरी देण्यात आली. जनगणना २०१७ च्या कामकाजाकरिता जनगणना कार्यालयाकडून सोलापूर महापालिका अंतर्गत विभागीय कार्यालयाने हाय तयार करण्यात आलेल्या प्रभाग निहाय झोनला चार्ज (ऑफिस क्षेत्र) कार्य तर मान्यतेस्तव पाठविण्यात आलेल्या विषयास मंजुरी देण्यात आली.

श्री खंडोबा मंदिर बाळे या तीर्थक्षेत्रास क वर्ग दर्जा मिळण्यासाठी देवस्थान ट्रस्टने कागदपत्रे सादर केली आहेत. पर्यटन स्थळे घोषित करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीला



आहेत. स्थानिक प्राधिकरण म्हणून सोलापूर महापालिकेकडून तसा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविण्यास संदर्भात आयुक्तांकडून आलेल्या प्रस्तावावर चर्चा झाली. यावर धर्मदाय आयुक्तांकडे प्रलंबित प्रकरणे कायदेशीर बाबी तपासून विधी विभागाकडून अभिप्राय मागवून हा प्रस्ताव पाठविण्यास एकमताने मान्यता देण्यात आली. या प्रस्तावाच्या चर्चेत समाधान आवळे, प्रधाने यांनी सूचना केल्या.

**स्मशानभूमीच्या विषयावरुन घमासान**

सोलापूर स्मार्ट सिटी अंतर्गत शहरातील विविध स्मशानभूमीत गॅसदाहिनी कार्यवाहीत करण्यात आली. मात्र देगाव याठिकाणी १ कोटी ३ लाख रुपये खर्च करूनही दाहिनी का चालू करण्यात आली नाही? असा प्रश्न गणेश वानकर यांनी उपस्थित केला. माहिती घेऊन सांगतो अशी उत्तरे अधिकाऱ्यांनी दिली. तेव्हा, अजेंडावर विषय असताना अधिकारी माहिती घेऊन का येत नाहीत? असा सवाल गणेश वानकर, अनंत जाधव, चेतन नरोटे, मृण्मयी गवळी या नगरसेवकांनी उपस्थित केला. स्मशानभूमीत कर्मचारी नसल्याने मृत्यू दाखले मिळण्याचा प्रयत्न जटिल झाला आहे. या विषयावर रोहिणी तडवळकर यांनीही आक्रमक भूमिका घेतली. स्मशानभुमीच्या विषयावरील झालेल्या घमासान चर्चेत चेतन नरोटे, अमोल शिंदे, सभागृह नेते नरेंद्र काळे, वैभव हत्तुरे, डॉ.किरण देशमुख यांच्यासह इतर सदस्यांनी सहभाग नोंदवला. दरम्यान, स्मशानभूमी संदर्भातील विषयासंबंधी उडवाउडवीची उत्तरे दिलेल्या अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे आदेश महापौर विनायक कोंड्याल यांनी आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांना दिले.

**हुतात्मा बागेचा भाडेतत्त्वावर दिलेला मक्ता रद्द**

सोलापूर महापालिकेअंतर्गत शहरातील हुतात्मा बाग भाडेतत्त्वावर देण्याचा निर्णय रद्द करण्याबाबत सभागृहात प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. श्रध्दा पवार व प्रविण दर्गोपाटील यांनी हा प्रस्ताव मांडला. शहरातील सार्वजनिक बागा या नागरिकांच्या आरोग्य, विश्रांती तसेच मुलांच्या खेळासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. मात्र काही बागा भाडेतत्त्वावर दिल्यामुळे नागरिकांना प्रवेश शुल्क भरावे लागत असून त्याचा आर्थिक बोजा सर्वसामान्यांवर पडत आहे. सार्वजनिक सेवा म्हणून असलेल्या बागांचा वापर नागरिकांना मोफत आणि मुक्तपणे करता यावा. काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने बागा भाडेतत्त्वावर दिल्याचा आरोप करत याबाबत सखोल चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

**नगरसेवकांना मिळणार बॅझ; राज्यातील पहिली महापालिका ठरणार**

सोलापूर महानगरपालिकेच्या बोर्ड बैठकीत नगरसेवकांना विधानसभा सदस्यांप्रमाणे बॅझ देण्याच्या प्रस्तावाला एकमताने मान्यता देण्यात आली. नगरसेवक अक्षय अंजिखाने यांनी मांडलेल्या या प्रस्तावास महापौर विनायक कोंड्याल यांनी मंजुरी दिली. महानगरपालिकेत यंदा सुमारे ६० ते ७० टक्के नगरसेवक प्रथमच निवडून आलेले आहेत. त्यामुळे अनेक वेळा प्रशासकीय अधिकाऱ्यांना नगरसेवकांची ओळख पटत नसल्याने अडचणी निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले होते. या बॅझमुळे अधिकाऱ्यांना नगरसेवकांची ओळख सहज होणार असून प्रशासकीय कामकाज अधिक सुलभ होणार आहे. या निर्णयामुळे सोलापूर महानगरपालिका ही राज्यातील पहिली महापालिका ठरणार आहे, जिथे नगरसेवकांना विधानसभा सदस्यांप्रमाणे बॅझ देण्यात येणार आहे.

## महापौर विनायक कोंड्याल ठरले धुरंधर

**-एका शौचालयासाठी सात लाखाचा खर्च**

श्रध्दा पवार आणि प्रवीण दर्गोपाटील यांनी मांडलेला शौचालय प्रकरणी अधिकारी यांची चौकशी करून कारवाई करण्याचा प्रस्ताव चर्चेला आला. या विषयावर संदर्भात सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले आणि नगर अभियंता अकुलवार, झोन अधिकारी हिबारे यांनी स्पष्टीकरण दिले. चार बाय चारच्या शौचालयाला ३ लाख २० हजार रुपये सरासरी खर्च दाखविला आहे. काही ठिकाणी ७ लाख रुपये शौचालय बांधायला लागत असल्याचे नमूद केले आहे. या खर्चात टू बीएचके घर बांधून येते तर मग एवढा खर्च का दाखवला, असा उपस्थित करत नगरसेवकांनी तीव्र संताप व्यक्त केला. या चर्चेत अनंत जाधव, नरेंद्र काळे, गौतम कसबे, अमोल शिंदे चेतन नरोटे यांनी सहभाग नोंदवला. मागील सभेत झालेल्या गोंधळाचा विचार करता महापौर विनायक कोंड्याल यांनी 'चौकार-षटकार' शैलीत सभा चालवत शहर विकासाच्या तब्बल ५२ विषयांना एकमताने मॅरेथॉन मंजुरी मिळवून एक प्रकारचा विक्रमच केला. सभेच्या सुरुवातीलाच धुरंधर स्टाईल भूमिका घेत, सर्वांनी सभागृहाची शिस्त पाळावी, गोंधळ घालणाऱ्या सदस्यांना बाहेर काढले जाईल, अशी कडक तंबी दिली. महापौरांच्या या ठाम भूमिकेचा सकारात्मक परिणाम सभागृहावर दिसून आला. शहर विकासाशी संबंधित प्रत्येक विषयावर चर्चा व्हावी; यासाठी महापौरांनी नगरसेवकांना पुरेसा वेळ दिला. आजच्या सभेत पायाभूत सुविधा, पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य, इतर विषयांचा समावेश होता. सभेचे प्रभावी नियोजन, शिस्तबद्ध कामकाज आणि सर्व सदस्यांना समान संधी दिली गोंधळाच्या पार्श्वभूमीवर विषय मंजूर होणे ही उल्लेखनीय बाब मानली जात आहे.

# कोठे-देशमुख गट आले आमने-सामने

## आ.विजयकुमार देशमुख गटाचा सभात्याग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० मार्च-**

महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत शहरातील डी-मार्ट ते विजापूर हायवे रस्ता डांबरीकरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. तर अक्कलकोट रोडवरील शांती चौक येथे लिंगायत समाजासाठी २ एकर जागा स्मशानभूमीसाठी देण्याचा विषय उपस्थित केला. ही स्मशानभूमी सिद्धेश्वर देवस्थान कमिटीला देखभाल व्यवस्थापनसाठी देण्याच्या प्रस्तावास वादळी चर्चेनंतर मान्यता देण्यात आली.

दरम्यान, या विषयावर आमदार देवेंद्र कोठे आणि आमदार विजयकुमार देशमुख यांचे गट सभागृहात आमने-सामने आले. शांती चौकातील जागेचा विषय मंजूर झाल्यानंतर आमदार विजयकुमार देशमुख गटाने थेट सभात्याग केला. विजापूर रोड, जुळे सोलापूर परिसरातील स्मशानभूमीसाठी जागा होटगी ब्रह्मठ संस्थेत देण्याचा तातडीच्या विषयाला मान्यता देण्यात आली. शहरातील स्मशानभूमी व्यवस्थापनाबाबतही महत्त्वाचा प्रस्ताव पुढे आला आहे. अक्षयकुमार अंजिखाने आणि बिज्जु प्रधाने यांनी पूर्व भागातील अक्कलकोट रोडवरील शांती चौक येथे लिंगायत सम ाजासाठी २ एकर जागा स्मशानभूमीसाठी देण्याचा विषय उपस्थित केला आहे. या संदर्भात यापूर्वीच सर्वसाधारण सभेत ठराव मंजूर झाला असून, त्या जागेच्या देखभालीसाठी सिद्धेश्वर देवस्थानकडे जबाबदारी देण्याचा प्रस्ताव आहे.

देवस्थानला रूपाभवानी येथील रुद्रभूमी स्म शानभूमी चालविण्याचा अनुभव असल्याने ही जबाबदारी त्यांना देणे सोयीस्कर ठरेल, असे मत व्यक्त करण्यात आले आहे. महापालिका प्रशासनाने या दोन्ही विषयांवर तातडीने कार्यवाही करून धोरणात्म क मान्यता देण्याचा प्रस्ताव आयुक्तांकडे सादर केला आहे. हा विषय सभापटलावर आल्यानंतर आमदार देवेंद्र कोठे आणि आमदार विजयकुमार देशमुख समर्थक नगरसेवकांनी आपापली बाजू मांडली. शिवानंद पाटील यांनी हस्तक्षेप करत यापूर्वी आमदार विजयकुमार देशमुख यांनी दिलेल्या पत्रांना केराची टोपली दाखवणार का असा सवाल उपस्थित केला. दोन्ही गटांकडून आरोप प्रत्यारोप करण्यात आले. यावेळी स्थायी समिती सभापती रंजीता चाकोते यांनी आक्रमक भूमिका मांडली. दोन्ही देवस्थानचा आम्हा सर्वांना स्वाभिमान आहे असे मत त्यांनी मांडले. त्यामुळे योग्य तो निर्णय सन्मानपूर्वक घ्यावा अशी सूचना मांडली. हा विषय काळजीपूर्वक हाताळावा. सर्वांची बैठक घ्यावी अशी सूचना अनंत जाधव यांनी मांडली. या विषयावर कुणी राजकारण करू नये अशी सूचना महापौर विनायक कोंड्याल यांनी केली. यावेळी वैभव हत्तूरे , अमोल शिंदे , सभागृहनेते नरेंद्र काळे,



चेतन नरोटे, रोहिणी तडवळकर, अनंत जाधव यांनी चर्चेत सहभाग नोंदवला. अखेर सिद्धेश्वर देवस्थानला व्यवस्थापनासाठी ती जागा देण्याचा ठराव झाला. त्यानंतर मात्र आमदार विजयकुमार देशमुख समर्थक नगरसेवक सभागृहाबाहेर गेले. दरम्यान, शेवटी विजापूर रोड, जुळे सोलापूर परिसरातील स्मशान भूमीसाठी जागा होटगी ब्रह्मठ संस्थेत देण्याचा तातडीचा विषय घेऊन त्यास एकमताने मान्यता देण्यात आली. महापौर कोंड्याल यांनी अगदी शिस्तबद्ध रीतीने हा विषय हाताळत. दोन्ही संस्थांना समतोल साधक निर्णय घेतला.

डी-मार्ट ते विजापूर हायवे दरम्यानच्या रस्ता डांबरीकरणाच्या कामासाठी सुमारे ३ कोटी ५१ लाख रुपयांचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. मात्र, या कामाच्या मंजुरीबाबत आणि अंमलबजावणीच्या स्वरूपाबाबत सभासदांनी गंभीर शंका उपस्थित केल्या आहेत. श्रध्दा पवार आणि कल्पना कारभारी यांनी मांडलेल्या प्रस्तावात या कामासाठी कोणती योजना लागू आहे, विशेषतः 'राष्ट्रीय धुळमुक्त योजना' अंतर्गत मंजुरी मिळाली आहे का, याचा खुलासा मागण्यात आला आहे. तसेच, पूर्वगणनापत्रकात 'डांबरीकरण' असा उल्लेख असताना प्रत्यक्षात मुरमीकरण केले जाणार आहे का, यावरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे.

सभासदांनी स्पष्टपणे विचारले आहे की, जर फक्त मुरमीकरण केले जाणार असेल तर ते धुळमुक्तीऐवजी धुळ वाढविणारे ठरणार नाही का? तसेच, नियमबाह्य काम केल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई होणार, याबाबतही प्रशासनाकडून स्पष्टीकरण मागण्यात आले.



# महोत्सवातील स्पर्धा महिलांचे मनोबल उंचावणारे : पाटील

**जेऊर, दि. २० मार्च-**

महिला महोत्सवातील स्पर्धात्मक कार्यक्रम महिलांचे मनोबल उंचावणारे असून यास मि ळणारा प्रतिसाद वाखाणण्याजोगा असल्याचे प्रतिपादन महिला नेत्या सौ. ज्योती पाटील यांनी केले.

जागतिक महिला दिनानिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही जेऊर (ता. करमाळा) येथे आमदार नारायण पाटील मित्रमंडळ व ग्रामपंचायत जेऊर यांच्या संयुक्त विद्यमाने महिला महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महिला महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी आज फनी गेम्स झोनचे उद्‌घाटन आमदार नारायण पाटील यांच्या सुविद्य पत्नी जोती पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शेकडो महिला फनी गेम्समध्ये भाग घेण्यासाठी उत्सुक होत्या. उद्घाटनाप्रसंगी अधिक बोलताना ज्योती पाटील म्हणाल्या, की हा महिला महोत्सव महिलांच्या कलागुणांना वाव देणारा असुन फनी गेम्स सारखे उपक्रम हे म हिलांसाठी रोजच्या ताणतणावातून विरंगुळा देणारे ठरतील. यातील समाविष्ट जवळपास २८ गेम्स हे महिलांची करमणूक तर करतीलच पण त्याचबरोबर यात कौशल्याचा कस सुध्दा लागणार आहे.

# वेळापूरच्या अर्धनारी नटेश्वर यात्रा सोहळ्यास २३ मार्चपासून सुरुवात

## अध्यक्षपदी काशिनाथ आडत गंगाधर होडगे यांना अर्धनारी नटेश्वर पूजेचा मान

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. २० मार्च-**

वेळापूरचे आराध्य दैवत अर्धनारी नटेश्वराच्या उत्सवास २३ मार्च पासून सुरुवात होत आहे. गुढीपाडव्या दिवशी मंदिरामध्ये आमदार उत्तमराव जानकर यांच्या उपस्थितीत बैठक संपन्न झाली.



यामध्ये अर्धनारी नटेश्वर यात्रा सोहळा कमिटी- अध्यक्ष काशिनाथ आडत, उपाध्यक्ष ॲड. विठ्ठल मंडले, उपाध्यक्ष रणजीत साठे, कार्याध्यक्ष अमोल मंडलिक, खजिनदार दादा तुपे, सरचिटणीस विनायक भगत, सचिव अभिजित साठे, सेक्रेटरी विजय पवार, सदस्य मनोहर माने आदींची निवड करण्यात आली. तसेच यावर्षीचा अर्धनारी नटेश्वर उत्सवाचा पूजेचा मान गंगाधर होडगेंना देण्यात आला आहे. यात्रा सोहळ्याच्या बैठकीला सरपंच रजनीश बनसोडे, उपसरपंच नानासाहेब मुंगुस्कर,



अशोकराव माने देशमुख, मार्केट कमिटीचे माजी सदस्य दादासाहेब घाडगे, रिपाई आठवले गट तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे, ग्रामपंचायत गटनेते सदस्य संजय मंडले, अमृतराव माने देशमुख, डॉ.शिवाजी पनासे, हनुमंत वायदंडे, संजय देशपांडे, जवान माने देशमुख, युवराज मंडले, शंकर आडत, अमोल पनासे, सुर्यकांत मोहिते, राहुल सराटे, वैभव बनसोडे, प्रदीप सरवदे, रणजीत सरवदे, धनंजय शिवपुजे, शिवाजी मंडले, ग्रामपंचायत अधिकारी कैलास सुरवसे, गौरीशंकर गाढवे, गौरीहर गुरव,महेश स्वामी, विवेक जोशी, सतीश गुरव, रविराज गुरव उपस्थित होते.

**धार्मिक कार्यक्रम**

२३ मार्च रोजी श्रींचा हळदी सोहळ्याचा कार्यक्रम सायंकाळी ७ ते १० महाप्रसादाचे वाटप, बुधवार, २५ मार्च रोजी रात्री १२ वाजता श्रीचा लग्न सोहळा, महाप्रसाद दुपारी ११ ते ५, गुरुवार दि. २ एप्रिल रोजी रात्री १२ वाजता श्री चा साड्याचा कार्यक्रम, त्यानंतर रात्री पालखी मिरवणूकए कावड मिरवणूक, शुक्रवार दिनांक ३ एप्रिल रोजी महाप्रसाद सकाळी ९ते ५ वेळेत, शुक्रवार दिनांक १० एप्रिल रोजी श्री ची सोळावी व सत्यनारायण पूजा, जागरण गोंधळ सोहळा, सकाळी १०:०० वाजता सत्यनारायण पूजा, जागरण गोंधळ कार्यक्रम सायंकाळी ७ वाजता, महाप्रसाद सायंकाळी ७ ते १० वेळेत इत्यादी कार्यक्रम होणार असल्याची माहिती गुरव गौरीहर गुरव, सतीश गुरव, रविराज गुरव यांनी यावेळी दिली.



# तांबवे येथील ग्रामदैवत हनुमान देवाची यात्रा

## अमोल खटके-पाटील यांची अध्यक्षपदी निवड

**टेंभुर्णी, दि. २० मार्च-**


तांबवे येथील ग्रामदैवत श्री हनुमान देवाच्या मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाही नववर्षारंभ व गुढीपाडव्याच्या पावन मुहूर्तावर पंचांगवाचन कार्यक्रम झाला.

५ एप्रिला श्री हनुमान देवाची यात्रा असून, ६ एप्रिल रोजी जंगी कुस्त्यांचे भव्य मैदान भरविण्यात येणार आहे. या पंचांगवाचन कार्यक्रमाच्या निमित्ताने ग्रामदैवत श्री हनुमान देवाच्या यात्रा कमि टीची बैठक घेण्यात आली. या बैठकीत सर्वानुमते अमोल खटके-पाटील यांची यात्रा कमिटीच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. यावेळी माजी सरपंच राजा खटके-पाटील, माजी चेअरमन अशोक खटके-पाटील, ज्येष्ठ नेते मुकुंद खटके-पाटील, माजी सोसायटी चेअरमन भजनदास खटके-पाटील, चेअरमन नवनाथ खटके-पाटील, सरपंच सचिन कांबळे, माजी उपसरपंच मधुकर खटके-पाटील, व्हाईस चेअरमन आप्पासाहेब खटके-पाटील, यात्रा कमिटीचे सचिव विशंभर नाना गोडसे, माजी सदस्य राम पाटील, मेजर संजय थोरात उपस्थित होते.

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित



## विचारपुष्प



'दोहन' आणि 'शोषण' हे दोन शब्द महत्त्वपूर्ण आहेत. यात आम्ही 'दोहन'ला निवडले, 'शोषण'ला नव्हे. ज्याप्रमाणे आपण गाईला वेदना किंवा इजा होणार नाही इतकेच तिचे दूध काढतो. आपण तिचे शोषण करत नाही. त्याचप्रमाणे निसर्गाप्रतिही आपली हीच भावना असली पाहिजे, हाच आमचा आग्रह आहे. यामुळेच खरी शांती शक्य आहे. भारताला शांतीचा हाच संदेश संपूर्ण विश्वाला द्यायचा आहे.

**- प्रो. राजेंद्रसिंह उपाख्य रज्जूभय्या**
रा. स्व. संघाचे चतुर्थ सरसंघचालक

# भारत मानवतेचा पुरस्कर्ता

## विश्व हिंदू परिषद भवनाच्या भूमिपूजन समारंभात सरसंघचालकांचे प्रतिपादन

◆ **नागपूर, २० मार्च**

**संपूर्ण जगावर सध्या युद्धाचे गडद सावट आहे. अनेक जण स्वार्थासाठी युद्धाचा वापर करून घेत आहेत. अशा स्थितीत भारताकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. संघर्षाच्या या काळात विश्वशांतीसाठी पुढाकार घेणारा भारत हा एकमेव देश आहे. कारण 'सर्वेपि सुखिनः सन्तू' हे भारतीय तत्त्वज्ञानच या बिकट परिस्थितीत विश्वाला तारणार असल्याचा विश्वास सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी व्यक्त केला.**



विश्व हिंदू परिषद, विदर्भ प्रांताच्या नवीन कार्यालयाचा भूमिपूजन सोहळा शुक्रवारी जुना सुभेदार ले-आऊट येथील शारदा चौकात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांच्या हस्ते पार पडला, त्यावेळी ते बोलत होते.

या प्रसंगी गाझियाबाद येथील सच्चिदानंद नानकधामचे संत त्रिलोकदर्शन दासजी महाराज, अंजनगाव सुर्जी येथील देवनाथ मठाचे जितेंद्रनाथ महाराज. विहिंपचे केंद्रीय संघटन महामंत्री मिलिंद परांडे, प्रसिद्ध उद्योजक अनंतकुमारजी बन्सल, सुमितकुमार माहेश्वरी, दीपक तामशेट्टीवार, सुदर्शन शेंडे व्यासपीठावर उपस्थित होते.

स्वार्थी हितसंबंध आणि वर्चस्वाची प्रखर इच्छा, हेच जगातील संघर्षाचे खरे कारण आहे. स्थायी शांती केवळ एकता, शिस्त आणि धर्माचे पालन केल्यानेच प्राप्त होऊ शकते. ही शक्ती केवळ भारताकडेच आहे, याची जाणीव जगाला आहे. त्यामुळे युद्ध संपविण्यासाठी जग भारताकडे आशेने पाहत आहे.

सुमारे दोन हजार वर्षांपासून जगाने संघर्ष सोडविण्यासाठी अनेक विचारांवर प्रयोग केले आहेत. परंतु, त्यांना फारसे यश मिळाले नाही. भारत मानवतेच्या नियमाचे पालन करतो, तर इतर देश जंगलातील कायदे मानतात. आम्हाला आमच्या देवी-देवता आणि साधू-संतांकडून एक विचारधारा मिळाली आहे.

सर्व धर्म संप्रदायांनी एकतेचा मंत्र विश्वाला दिला. उपासना पद्धती निराळी असेल, मार्ग निराळे असतील, तरी उपदेश सारखा आहे. भारतीय मानवतेचा कायदा मानतात तर उर्वरित जग शक्तीचा कायदा मानते, असे डॉ. मोहनजी भागवत म्हणाले.

**डगमगणाऱ्या जगाला आधार देण्याचे धर्माचे काम**

धर्माचरणातून एका शक्तीचे निर्माण होते, असे सांगत सरसंघचालक पुढे म्हणाले, आज धार्मिक जागृतीची गरज आहे. संविधानातही आमच्या धार्मिक परंपरा आहे. समाज जागृत व्हावा आणि समाजाने एकमेकांशी जुळावे, ही यामागची संकल्पना आहे. आम्ही सर्व एक आहोत, हे मानण्यास कोणीही तयार नाही. त्यांच्याकडे विचारधारेचा अभाव आहे. संघर्षात काहीही अर्थ नाही. खरा अर्थ समन्वयातच आहे. आज कट्टरपंथींमुळे संघर्ष वाढतो आहे. सर्व समान आहे, ही विचारधारा भारताकडे आहे. भारताची विचारधारा सर्वांना मानावी लागेल. आज जग विनाशाकडे जात आहे. डगमगणाऱ्या जगाला आधार देण्याचे काम धर्मच करू शकतो. ही ताकद भारताकडे आहे.

भारतात जन्म हे आपले भाग्य असून सारेच भारतीय सनातनी आहेत, असे त्रिलोकदर्शनदास हे भाषणात म्हणाले. तर रा. स्व. संघाच्या शताब्दी वर्षात विहिंपच्या भवनाचे भूमिपूजन होणे, हा उत्तम योग आहे. विहिंपचे कार्यालय हे ऊर्जा केंद्र आहे, असे प्रतिपादन जितेंद्रनाथ महाराज यांनी केले.

समारंभाला राज्यसभा खासदार मायाताई इवनाते, आमदार कृपाल तुमाने, संत-महंत, विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. *(तभा वृत्तसेवा)*

### असे राहणार कार्यालय

**विश्व हिंदू परिषदेच्या या नवीन कार्यालयाचे बांधकाम सुमारे ४००० चौरस फुटांच्या प्रशस्त परिसरात करण्यात येत असून सहा मजली आधुनिक इमारतीचे नियोजन करण्यात आले आहे. या परिसरात पार्किंग सुविधेसह श्रीहनुमान मंदिर आणि श्रीगणेश मंदिराची उभारणीही करण्यात येणार आहे. नवीन इमारतीमध्ये कॉन्फरन्स हॉल, प्रवासी केंद्रीय व प्रांतीय पदाधिकाऱ्यांसाठी निवास व्यवस्था, वसतिगृह तसेच संघटनेच्या विविध आयामांसाठी स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात येणार आहेत. याशिवाय वाचनालयाची सुविधा, बाहेरगावाहून वैद्यकीय उपचारासाठी येणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी निवास व्यवस्था देखील राहणार आहे.**

# औद्योगिक डिझेल, प्रीमियम पेट्रोल महागले

## कच्च्या तेलाच्या दरवाढीमुळे तेल कंपन्यांनी घेतला निर्णय




◆ **नवी दिल्ली, २० मार्च**

मध्यपूर्वेतील संघर्षामुळे होर्मुझ जलमार्गातील वाहतूक विस्कळीत झाली असताना आखाती देशातील ऊर्जा प्रतिष्ठानांवर इराणने केलेल्या हल्ल्यानंतर जागतिक बाजारात कच्च्या तेलाने उच्चांक गाठला. अशातच देशांतर्गत तेल कंपन्यांनी औद्योगिक डिझेलच्या दरात २१.९२ रुपयांनी वाढ केली. त्यामुळे दर प्रति लिटर १०९.५९ रुपयावर पोहोचला आहे. दुसरीकडे प्रीमियम पेट्रोलची किंमत २.०९ ते २.३५ रुपयांनी वाढविण्यात आल्याने दर प्रति लिटर १११ रुपयांवर पोहोचले आहे. सामान्य पेट्रोल आणि डिझेलच्या दरात कोणताही बदल झालेला नाही. शुक्रवारी रात्री १२ वाजतापासून नवीन दर लागू होईल.

यापूर्वी औद्योगिक डिझेलचा दर दर प्रति लिटर ८७.६७ रुपये होता. औद्योगिक डिझेलच्या दरवाढीचा थेट परिणाम मोठ्या प्रमाणात डिझेल खरेदी करणाऱ्या कंपन्यांवर होणार आहे. डिझेल वापरणाऱ्या कंपन्यांना आता अधिक पैसे खर्च करावे लागतील, याचा परिणाम भविष्यात सर्वसामान्यांच्या खिशावरही होईल. कच्च्या तेलाच्या दरात झालेल्या अलीकडील वाढीमुळे कंपन्यांवरील दबाव लक्षणीयरीत्या वाढला आहे. युद्ध लांबल्यास भविष्यात सामान्य पेट्रोल आणि डिझेलच्या दरातही वाढ होऊ शकते. माध्यमांशी बोलताना, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या सहसचिव सुजाता शर्मा म्हणाल्या, प्रीमियम श्रेणीतील पेट्रोल, डिझेलच्या दरातच वाढ झाली आणि हे देशाच्या एकूण पेट्रोल विक्रीच्या केवळ २ ते ४ टक्के आहे. *(वृत्तसंस्था)*

### प्रीमियम, सामान्य पेट्रोलमधील फरक काय?

**आधुनिक आणि उच्च-कार्यक्षमतेची इंजिन असलेल्या वाहनांसाठी प्रीमियम पेट्रोल हा एक उत्तम पर्याय म्हणून समोर येत आहे. सामान्य पेट्रोलच्या तुलनेत प्रीमियम पेट्रोलचे गुणधर्म अधिक सरस असल्याचे दिसून आले. उच्च ऑक्टेनमुळे इंजिनमधील नॉकिंग कमी होते. परिणामी, वाहन अधिक सुरळीत चालते आणि चालकाला उत्तम ड्रायव्हिंग अनुभव मिळतो. इंजिनच्या आरोग्यासाठीही हे इंधन उपयुक्त आहे. प्रिमियम पेट्रोल वाहनाचे मायलेज सुधारण्यास मदत होते. तसेच इंजिनचे आयुष्य लक्षणीयरीत्या वाढवते.**



**सोलापूर : राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी शुक्रवारी रात्री माजी मंत्री तथा आमदार सुभाष देशमुख यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी सोलापूर कृषी उत्पन बाजार समितीचे संचालक मनीष देशमुख यांनी मंत्री शेलार यांचा सत्कार केला. यावेळी रोहन देशमुख, भाजपा जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण.**

## महत्त्वाचे

### अशोक खरातकडे कोट्यवधींची माया

**नाशिक** : स्वयंघोषित भोंदू बाबा कॅप्टन अशोक खरातच्या कृत्यांमुळे राज्यभरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणात दररोज नवनवे खुलासे होत आहे. एसआयटीने महिला अत्याचाराचे गंभीर आरोप असलेल्या या प्रकरणाच्या तपासाला गती दिली आहे. डिजिटल पुरावे आणि फॉरेन्सिक तपासाच्या आधारे खरातचे संपूर्ण नेटवर्क उद्ध्वस्त करण्यासाठी पोलिसांनी कंबर कसली आहे. एसआयटीकडून सध्या खरातचे फोन कॉल्स, चॅट्स आणि सोशल मीडिया अकाऊंट्सची कसून चौकशी केली जात आहे. पोलिसांच्या हाती लागलेल्या धक्कादायक व्हिडिओंमधील पीडितांना न्याय मिळवून देणे, हा तपासाचा प्राथमिक उद्देश आहे. या व्हिडिओंमध्ये दिसणाऱ्या महिलांची ओळख पटवून त्यांचे जबाब नोंदवण्याचे काम सुरू झाले आहे.

### सहा भारतीयांचा मृत्यू; तीन लाख मायदेशी परतले

**नवी दिल्ली** : मध्यपूर्वेत सुरू असलेल्या संघर्षात आखाती देशातील सहा भारतीय नागरिकांचा मृत्यू झाला तर एक नागरिक अद्याप बेपत्ता आहे. बेपत्ता नागरिकांचा शोध घेण्यासाठी आणि मृतदेह भारतात परत आणण्यासाठी सरकार युद्धपातळीवर प्रयत्न करत आहे. युद्धजन्य परिस्थितीमुळे आतापर्यंत ३ लाख लोकांना मायदेशी परत आणल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाने शुक्रवारी दिली. अतिरिक्त सचिव असीम आर. महाजन यांनी सांगितले की, सौदी अरब, ओमान, इराक आणि संयुक्त अरब अमिरातीमधील भारतीय दूतावास स्थानिक अधिकाऱ्यांच्या सतत संपर्कात आहेत. सध्या सरकारचे मुख्य लक्ष नागरिकांना मदत पुरवण्यावर आहे. आखाती देशात झालेल्या हल्ल्यात सहा भारतीय नागरिकांना जीव गमवावा लागला तर एक जण बेपत्ता आहे. स्थानिक सुरक्षा यंत्रणांच्या सहकार्याने शोधमोहीम तीव्र करण्यात आली आहे. आतापर्यंत तीन नागरिकांना मायदेशी परत आणले गेले.

### सुनावणीच्या विलंबाला बसणार खीळ

नवी दिल्ली : खटल्यांच्या सुनावणीला विलंब होऊ नये यासाठी सर्वोच्च न्यायालयाने कडक पावले उचलली आहेत. केवळ अपवादात्मक परिस्थितीत आणि विशिष्ट नियमांच्या अधीन राहूनच सुनावणी स्थगित करण्याची विनंती विचारात घेतली जाईल, असे न्यायालयाने स्पष्ट केले. यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने परिपत्रक जारी केले आहे. सुनावणी स्थगितीसाठीचे पत्र 'अॅडव्होकेट ऑन रेकॉर्ड' किंवा स्वतः पक्षकारांकडून दिले जाऊ शकते. हे विनंती पत्र दुसऱ्या पक्षाला किंवा कॅव्हेटरला आगाऊ देणे अनिवार्य आहे. सुनावणीच्या आदल्या कामकाजाच्या दिवशी सकाळी ११ वाजण्यापूर्वी अशा विनंतीची प्रत आणि पोहोच पावती सादर करणे आवश्यक आहे. विरुद्ध पक्ष अशा विनंतीवर आक्षेप घेऊ शकतो. हे आक्षेप आदल्या दिवशी दुपारी १२ वाजण्याच्या आधी ई-मेलद्वारे पाठवणे आवश्यक असून ते न्यायालयासमोर ठेवले जातील. स्थगितीच्या अर्जात स्पष्ट कारणे आणि त्या खटल्यात आतापर्यंत किती वेळा स्थगिती घेतली, याचा उल्लेख असणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने जारी केलेल्या परिपत्रकात म्हटले आहे.

# इराणचे दोन वरिष्ठ कमांडर ठार


## अमेरिका-इस्रायलचा आयआरजीसी, बसिज फोर्सवर हल्ला

◆ **तेहरान, २० मार्च**

इराणचे लष्करी नेतृत्व संपवण्याच्या प्रयत्नात असलेल्या इस्रायलने गुरुवारी रात्री केलेल्या हवाई हल्ल्यात दोन लष्करी कमांडर ठार झाले. यात इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्स अर्थात् आयआरजीसीचे प्रवक्ते अली मोहम्मद नाईनी आणि बसिज फोर्सचे गुप्तचर प्रमुख जनरल इस्माईल अहमदी यांचा समावेश आहे. इस्रायलच्या लष्कराने याची पुष्टी केली आहे.




अली नाईनी



अहमदी

ब्रिगेडियर जनरल अली मोहम्मद नाईनी हे आयआरजीसीचे प्रवक्ते आणि जनसंपर्क विभागाचे उपप्रमुख होते. जुलै २०२४ मध्ये आयआरजीसीचे सरसेनापती हुसेन सलामी यांनी त्यांची या पदावर नियुक्ती केली. १९५७ मध्ये जन्मलेले नाईनी हे इराण-इराक युद्धातील एक अनुभवी योद्धे होते. त्यांनी या युद्धात आयआरजीसीच्या वतीने वारंवार निवेदने जारी करून इराणच्या लष्करी सज्जतेबद्दल आणि क्षेपणास्त्र व ड्रोन क्षमतेबद्दल इशारा दिला. बसिज गुप्तचर विभागाचे प्रमुख जनरल इस्माईल अहमदी हे आयआरजीसीशी संलग्न असलेले अधिकारी होते. त्यांनी संघटनेत सुरक्षा आणि गुप्तचर भूमिका सांभाळली. दरम्यान, इस्रायलने इराणची राजधानी तेहरान येथील आयआरजीसी आणि बसिज फोर्सच्या अनेक तळांवर हवाई हल्ले चढविले. यात लष्करी तळ उद्ध्वस्त करण्यात आले. *(वृत्तसंस्था)*



### कुवैतच्या तेल प्रकल्पांवर पुन्हा हल्ले

कुवैत पेट्रोलियम कॉर्पोरेशनने सांगितले की, शुक्रवारी सकाळी इराणने मीना अल-अहमदी तेल शुद्धीकरण प्रकल्पावर ड्रोन हल्ले केले. यामुळे अनेक युनिट्सना आग लागली आणि खबरदारीचा उपाय म्हणून प्रकल्पाचे काम तात्पुरते बंद करण्यात आले. या हल्ल्यात जीवितहानी झालेली नाही. दुसरीकडे इराणच्या एका बॅलिस्टिक क्षेपणास्त्राने उत्तर इस्रायलमधील हैफा तेल शुद्धीकरण प्रकल्पावर हल्ला केला.

# अमेरिकेची १६ विमाने नष्ट

## वायुदलाचे मोठे नुकसान, सौदी, युएईतील रडार प्रणाली उद्ध्वस्त

◆ **वॉशिंग्टन, २० मार्च**

इराणविरोधात गेल्या तीन आठवड्यांपासून सुरू असलेल्या युद्धात अमेरिकेची १६ लढाऊ विमाने नष्ट झाली. याशिवाय सौदी अरब, संयुक्त अरब अमिराती अर्थात् युएईमधील रडार प्रणाली इराणच्या क्षेपणास्त्रांनी उद्ध्वस्त केल्याची माहिती समोर आली आहे.



युद्धात अनपेक्षितरीत्या अमेरिकेला इराणच्या कडव्या प्रतिकाराचा सामना करावा लागत असल्याची माहिती वॉशिंग्टन पोस्टमध्ये प्रकाशित अहवालात म्हटले आहे. विशेष म्हणजे अत्याधुनिक असे एफ-३५ विमान इराणी क्षेपणास्त्राने नष्ट केले. इराणने नुकतेच अमेरिकेचे जवळपास १२ एमक्यू-९ रीपर ड्रोन नष्ट केले. एका रीपर ड्रोनची किंमत ही जवळपास २५० कोटी रुपये इतकी आहे. ही ड्रोन्स इराणचे लाँचर पॅड आणि आयआरजीसीच्या तळांना नष्ट करण्यासाठी वापरली गेली. अमेरिकेची लष्करी ताकद मजबूत असताना इराणला नमवू शकले नाही. इस्रायल आणि अमेरिकेच्या रणनीतीसाठी हे मोठे आव्हान असल्याचे अहवालात नमूद आहे. एफ १५, रीपर ड्रोन आणि इंधन वाहून नेणारे विमान अशी १६ लष्करी विमाने गमावल्यानंतर ट्रम्प यांचा दावा आता उलटा पडत असल्याचे दिसत आहे. त्यातच अमेरिकेचे जवानदेखील हुतात्मा होत आहेत. इराणमध्ये त्वरित विजय होणार असा दावा करणाऱ्या ट्रम्प यांच्यावर त्यांच्या पक्षातूनच टीका होत आहे. *(वृत्तसंस्था)*

### चार हजार कोटींचे नुकसान

**इराण युद्धाबाबत अमेरिकेत सध्याच्या घडीला दोन मतप्रवाह आहेत. काहींच्या मते आता ट्रम्प हे अजून जोरदार हल्ले करतील. ते एफ-३५ आणि बी २ बॉम्बरसारखी अत्याधुनिक शस्त्रे इराणकडे रवाना करतील. दुसरे जाणकार सांगतात की, एवढे मोठे नुकसान पाहून ट्रम्प मागे हटण्याची शक्यता आहे. १६ विमाने पडल्यामुळे अमेरिकेचे जवळपास ४००० कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. ड्रोन सहज तयार होतील. मात्र, एफ १५ आणि केसी १३५ ही लढाऊ विमाने आणि वैमानिकांचे प्रशिक्षण यासाठी अनेक वर्षे लागतात.**

### होर्मुझमध्ये जलमार्गावर भारतीय कॅप्टनचा मृत्यू

◆ **दुबई, २० मार्च**

इराण-इस्रायल-अमेरिका युद्धादरम्यान होर्मुझच्या सामुद्रधुनीत अडकलेल्या अवाना जहाजाचे कॅप्टन राकेश रंजन सिंह यांचे निधन झाले. ते मूळचे नालंदा जिल्ह्यातील होते आणि त्यांचे कुटुंब रांचीमध्ये राहत आहे. इराणविरुद्ध संघर्षामुळे ते गेल्या १८ दिवसांपासून ते जहाजावर अडकले होते.

वेळेवर वैद्यकीय मदत मिळाली असती तर त्यांचा जीव वाचू शकला असता, परंतु युद्धजन्य परिस्थितीमुळे त्यांना आपत्कालीन आरोग्यसेवा मिळू शकली नाही, अशी माहिती कंपनीच्या वतीने देण्यात आली. कुटुंबीयांनी दिलेल्या माहितीनुसार राकेश रंजन सिंह गेल्या महिन्यात २ फेब्रुवारी रोजी आपली रजा पूर्ण करून अवाना जहाजावर रुजू झाले होते.

जहाज तेल घेण्यासाठी होर्मुझच्या सामुद्रधुनीला गेले होते. तेल भरल्यानंतर हे जहाज १ मार्च रोजी भारताकडे निघाले, परंतु युद्धामुळे दुबईपासून सुमारे ६० किलोमीटर अंतरावर समुद्रातच अडकले. कॅप्टन सिंह यांच्यासह सुमारे ३५ कर्मचारी अवाना जहाजावर होते. १८ मार्च रोजी कॅप्टन सिंह यांची प्रकृती अचानक खालावली. *(वृत्तसंस्था)*

### एकाच दिवशी रुपया ८२ पैशांनी घसरला

◆ **मुंबई, २० मार्च**

नवी दिल्लीः डॉलरच्या तुलनेत रुपयामध्ये शुक्रवारी ८२ पैशांनी घसरण झाली आणि रुपया ९३.७१ या विक्रमी नीचांकी पातळीवर बंद झाला. रुपयाची आतापर्यंतची सर्वात मोठी घसरण आहे. यापूर्वी बुधवारी त्याने विक्रमी नीचांक गाठला होता.

पश्चिम आशियातील सुरू असलेले युद्ध आणि परदेशी गुंतवणूकदारांकडून सुरू असलेल्या शेअर्सच्या विक्रीच्या पार्श्वभूमीवर रुपयामध्ये ही घसरण झाली. अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपया ८२ पैशांनी घसरून ९३.७१ या विक्रमी नीचांकी पातळीवर पोहोचला. बुधवारी, हे चलन ९२.८९ या आतापर्यंतच्या नीचांकी पातळीवर बंद झाले होते. देशांतर्गत ब्रोकरेज फर्म अॅम्बिट कॅपिटलच्या मते, जर तेलाच्या दरात वाढ सुरूच राहिल्यास रुपया ९८.९० वर जाऊ शकतो.

# नळदुर्ग-तुळजापूर महामार्गावर १० कोटींचे अंमली पदार्थ जप्त

## आरोपी फरार

**तभा वृत्तसेवा,**
**धाराशिव, दि. २० मार्च-**

नळदुर्ग-तुळजापूर राष्ट्रीय पदार्थ महामार्गावर पोलिसांनी मोठी कारवाई करत सुमारे १० कोटी रुपये किंमतीचे अमली पदार्थ जप्त केले आहेत. संशयितांनी पोलिसांना चकवा देत बॅग रस्त्यावर फेकून पलायन केल्याने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. या प्रकरणाचा तपास सुरू असून मोठ्या ड्रग्स रॅकेटचा पर्दाफाश होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

महामार्गावर नियमित नाकाबंदी सुरू असताना पोलिसांनी एका संशयित वाहनाला थांबवण्याचा प्रयत्न केला. मात्र, वाहनातील दोन संशयितांनी त्यांच्या ताब्यातील बॅग रस्त्यावर फेकून दिली आणि घटनास्थळावरून पळ काढला. पोलिसांनी तत्काळ ती बॅग जप्त करून तपास सुरू केला. प्राथमिक तपासात बॅगेत मोठ्या प्रमाणात



अमली पदार्थ आढळून आले असून त्याची बाजारातील किंमत सुमारे १० कोटी रुपये असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. मात्र, हा अमली पदार्थ नेमका कोणत्या प्रकारचा आहे, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. तो नवीन प्रकारचा असण्याची शक्यता व्यक्त केली जात असून त्याची ओळख पटवण्यासाठी फॉरेन्सिक तज्ज्ञांची मदत घेतली जात आहे. गेल्या दोन दिवसांपासून फॉरेन्सिक लॅबची टीम घटनास्थळी दाखल असून वैज्ञानिक पद्धतीने तपास सुरू आहे. नमुने तपासणीसाठी पाठवण्यात आले असून अहवालाची प्रतीक्षा आहे.

या प्रकरणातील दोन संशयित आरोपी अद्याप फरार असून त्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी विशेष पथक स्थापन केले आहे. सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक पुराव्यांच्या आधारे तपास वेगाने सुरू आहे.

इतक्या मोठ्या प्रमाणात अमली पदार्थ जप्त झाल्याने या प्रकरणामागे संघटित गुन्हेगारी टोळी कार्यरत असल्याचा संशय अधिक बळावला आहे. हा साठा नेमका कुठे आणि कोणासाठी नेला जात होता, याचाही तपास सुरू आहे.

**पोलिसांचे आवाहन**

बॅगेत अमली पदार्थ असल्याचे स्पष्ट झाले असून त्याचा प्रकार फॉरेन्सिक अहवालानंतर निश्चित होईल, अशी माहिती पोलिसांनी दिली. तसेच नागरिकांनी अफवा पसरवू नयेत आणि संशयास्पद हालचाली दिसल्यास त्वरित पोलिसांना कळवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# संसदेतील गोंधळाचे परिणाम लक्षात घ्या!

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा संपण्याच्या मार्गावर आहे. पाच राज्यांतील विधानसभा निवडणुका जाहीर झाल्यामुळे अर्थसंकल्पीय अधिवेशनातील राजकीय पक्षांचा उत्साह कमी होणे स्वाभाविकच. वित्त विधेयक संसदेत पारित झाल्यावर या अधिवेशनाचा गाशा गुंडाळला जाईल. अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्यात विरोधी पक्षांच्या आठ सदस्यांचे निलंबन मागे घेण्यात आले. यात काँग्रेसच्या सात तर माकपच्या एका सदस्याचा समावेश होता. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्यात या सदस्यांना अधिवेशनाच्या उर्वरित कालावधीपर्यंत निलंबित करण्यात आले होते. निलंबनाचा हा कालावधी २ एप्रिलला तसाही संपत आहे, पण आता २ एप्रिलपर्यंत हे अधिवेशन चालण्याची शक्यता दिसत नाही. त्यामुळे या सदस्यांचे निलंबन त्याच्या आधीच मागे घेण्यात आले.

गोंधळी सदस्यांचे निलंबन मागे घेण्याचा सरकारचा निर्णय मनाचा मोठेपणा दाखवणारा आहे. मात्र, हा निर्णय विनाशर्त नाही तर सशर्त आहे. विरोधी पक्षांच्या सदस्यांवर चांगल्या वागणुकीबाबत काही बंधने घालून त्यांचे निलंबन मागे घेण्यात आले. लोकसभा असो की राज्यसभा किंवा विधानसभा व विधानपरिषद, संसद व राज्य विधिमंडळांची ही सभागृहे लोकशाहीची पवित्र मंदिरे मानली जातात. ही सर्व सभागृहे ही चर्चेची आणि मुक्त मंथनाची व्यासपीठे आहेत. या सर्व सभागृहांत सर्व विषयांवर साधकबाधक चर्चा होणे अपेक्षित असते. या सभागृहांत आजकाल चर्चा होते का, मुक्त मंथन होते का, या प्रश्नाचे उत्तर दुर्दैवाने 'नाही' असेच आहे. कधीकाळी या सभागृहांत अभ्यासपूर्ण भाषणे होत. विरोधी पक्षांच्या अभ्यासू सदस्यांची भाषणे सत्ताधारी पक्षाचे नेते सभागृहात उपस्थित राहून ऐकायचे. सत्ता पक्षाच्या नेत्यांच्या भाषणाच्या वेळी विरोधी पक्षांचे नेतेही सभागृहात उपस्थित राहात होते. त्यावेळी सभागृहात खेळीमेळीचे वातावरण असायचे. विरोधकांकडे शत्रू म्हणून पाहण्याचा तो काळ नव्हता. पण आजचे चित्र काय आहे, या प्रश्नाचे उत्तर नुसते नकारात्मकच नाही तर वेदनादायकही आहे. आज संसदीय सभागृहात सत्ताधारी व विरोधक एकमेकांकडे शत्रू म्हणून पाहतात. विरोधी पक्ष तसेच सत्ताधारी पक्ष यांच्यातील संबंध गेल्या काही वर्षांत भारत-पाकिस्तानसारखे झाले आहेत. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे सुभाषितासारखे एक अतिशय प्रसिद्ध असे वाक्य आहे. ते असे की, आज विचारभिन्नता ही समस्या नाही तर विचारशून्यता ही खरी समस्या आहे. त्यातून एकदुसऱ्याबद्दल अनादराची, शत्रुत्वाची भावना वाढीस लागते. विरोधी पक्षांनी सत्ताधारी पक्षावर म्हणजे सरकारवर टीका केलीच पाहिजे; त्यांचा तो घटनादत्त अधिकार आहे. जनहिताचे निर्णय घेण्यात सरकार टाळाटाळ करीत असेल वा जनविरोधी निर्णय घेत असेल तर सरकारचे कान पकडण्याचा आणि पिळण्याचाही अधिकार विरोधी पक्षांना आहे. पण टीका करायची एवढ्यासाठीच ती करणे योग्य नाही. त्यामागे तर्कसंगती असली पाहिजे. विरोधी पक्षांत आहोत म्हणून सरकारच्या प्रत्येक निर्णयाला विरोध केलाच पाहिजे असे नाही. तसे होत असल्याने विधेयकावरील अभ्यासपूर्ण चर्चा मागे पडू लागल्या आहेत. सभागृहात अध्यक्ष वा सभापतींच्या आसनासमोरील मोकळ्या जागेत हातात पोस्टर्स वा फलक घेऊन गोंधळ घालणे, घोषणाबाजी करणे अशा घटना वाढू लागल्या आहेत. विधेयकाच्या प्रती फाडत त्याचे तुकडे अध्यक्ष आणि सभापतींच्या आसनाच्या दिशेने भिरकावले जाऊ लागले आहेत. संसदीय लोकशाहीच्या दृष्टीने हे अजिबात चांगले लक्षण नाही. भाजपा हा २०१४ पासून केंद्रीय सत्तेत आहे. त्याच्या आधी १९९९ ते २००४ च्या सत्ताकाळाचा मोठा अपवाद वगळता तो दीर्घकाळ विरोधी पक्षातच होता. तेव्हा भाजपाचे सदस्य अध्यक्ष वा सभापतींच्या समोरील मोकळ्या जागेत येत नव्हते असे नव्हे. भाजपा सदस्यांच्या हातात घोषणांचे पोस्टर्स वा फलक नसायचे असेही नाही. पण, सभागृहात विरोध व्यक्त करताना एक मर्यादा भाजपाचे सदस्य पाळत होते. आज संसदेच्या दोन्ही सभागृहांची स्थिती काय आहे, असे कुणी विचारले तर त्याचे उत्तर देणाऱ्याला घाम यावा. राज्यसभा हे ज्येष्ठांचे सभागृह मानले जाते. या सभागृहात येणारे सदस्य हे वयाने, ज्ञानाने आणि अनुभवानेही परिपक्व असतात. त्यामुळे या सभागृहातील सदस्यांकडून अधिक प्रगल्भ, संयमित आणि जबाबदारीच्या वागणुकीची अपेक्षा असते. लोकसभेत येणारे सदस्य सळसळत्या रक्ताचे आणि संसदीय कामकाजाचा अनुभव नसलेले असतात. त्यामुळे त्यांच्यात जोश असतो. त्यांचे चुकीचे वर्तन आक्षेपार्ह असले, तरी त्यांना नवखे म्हणून एखादवेळा माफ करता येणे शक्य आहे. राज्यसभेच्या सदस्यांकडून मात्र परिपक्व वर्तनाचीच अपेक्षा आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनात राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावरील चर्चेला पंतप्रधानांना उत्तर देता आले नाही. यावेळी पहिल्यांदा संसदीय प्रथा-परंपरा आणि संकेतात असा खंड पडला. पंतप्रधान हे लोकसभेचे नेते असतात. त्यांनाच सभागृहात बोलू दिले जात नसेल तर आपल्या संसदीय लोकशाहीचे अध:पतन झाले, असे म्हणावे लागेल. लोकसभेत एक स्थिती अशी उद्भवली होती की, विरोधी पक्षांच्या महिला सदस्यांनी अतिशय आक्रमक होत सत्ताधाऱ्यांच्या बाजूकडे धाव घेतली होती. सत्तारूढ बाजूच्या पहिल्या बाकावर सभागृहाचे नेते म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आसन आहे तर दुसऱ्या आसनावर सभागृहाचे उपनेते-संरक्षण मंत्री राजनाथ सिंह बसतात. विरोधी पक्षांच्या महिला सदस्यांकडून काही अनुचित प्रकार घडण्याचा संकेत मिळाल्यामुळे लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी पंतप्रधान मोदी यांना सभागृहात येण्यापासून रोखले आणि एक दुर्दैवी तसेच अनुचित घटना टळली. अन्यथा तो दिवस संसदीय लोकशाहीच्या इतिहासातील सर्वांत काळा दिवस ठरला असता. त्या दिवशी सभागृहात काय झाले असते, याची नुसती कल्पना केली तरी अंगावर काटे येतात. याच गोंधळाची परिणती विरोधी पक्षांच्या आठ सदस्यांच्या निलंबनात झाली. लोकसभेत वा राज्यसभेत सदस्य निलंबित होण्याची ही पहिली आणि शेवटचीही घटना नाही. सुमित्रा महाजन लोकसभेच्या अध्यक्ष असताना शंभर-शंभर सदस्यांना एका दिवशी निलंबित करण्यात आले होते. आजकाल संसदेच्या दोन्ही सभागृहांत प्रश्नोत्तरांच्या तासात गोंधळ होणे हा परिपाठ झाला आहे. सामान्यपणे प्रश्नोत्तराचा तास हा संसदेच्या दोन्ही सभागृहात खूप महत्त्वाचा मानला जातो. या तासात फक्त सत्ताधारी पक्षांच्या सदस्यांचेच प्रश्न असतात असे नाही, तर विरोधी पक्षातील सदस्यांचेही असतात. आपल्या मतदारसंघातीलच नव्हे तर जिल्ह्यातील आणि राज्यातील प्रश्नांना वाचा फोडणे ही दोन्ही पक्षांच्या सदस्यांची जबाबदारी असते. आपल्या प्रश्नावर संबंधित खात्याच्या मंत्र्यांचे उत्तर समाधानकारक नसेल तर मंत्र्याला कोंडीत पकडण्याची, सरकारला घेरण्याची संधी विरोधी पक्षांच्या सदस्यांना मिळत असते. पण सभागृहात गोंधळ घालून विरोधी सदस्य ही संधी गमावतात, असे म्हटले तर ते चूक ठरू नये. गोंधळामुळे पीठासीन अध्यक्ष वा सभापतीला कामकाज स्थगित करावे लागते. सभागृहाचे कामकाज स्थगित झाल्यामुळे अप्रत्यक्षपणे सरकारचा फायदा होतो तर विरोधी पक्ष सदस्यांचे नुकसान. पण हे शहाणपण विरोधी पक्षांच्या सदस्यांना येईल तो सुदिन म्हटला पाहिजे. त्यामुळे सभागृहात सरकारला घेरणे, विरोध करणे समजण्यासारखे असले तर गोंधळ घालण्याच्या विरोधकांच्या कृत्याचे कधीच समर्थन करता येणार नाही. विरोधी पक्षनेते पदी राहुल गांधींसारखा अपरिपक्व नेता असल्यावर यापेक्षा वेगळी अपेक्षाही करता येत नाही. विरोधकांमध्ये वयस्क नेते आहेत. ते राहुल गांधी यांना मर्यादा सांभाळण्यास का सांगत नाहीत, हा प्रश्नच आहे. यातून फक्त संसदेच्या कामांत व्यत्यय येतोय, असे नव्हे. दीडशे कोटी लोकांच्या आशा-आकांक्षांचे केंद्र असलेल्या संसदेचे कामकाज असे चालते तेव्हा समाजातही नैराश्याची भावना निर्माण होते. ती घालवण्याची जबाबदारी जशी सत्ताधाऱ्यांची आहे, तशी ती विरोधकांचीही आहे. ती त्यांच्या लक्षात यावी आणि संसदेचे कामकाज चांगल्या पद्धतीने चालावे, एवढीच अपेक्षा करता येते.

## यंगिस्तान

# बालपण नको देवा?

जयेश शत्रुघ्न मेस्त्री

आजच्या वेगवान आणि डिजिटल युगात सोशल मीडिया आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. परंतु, या माध्यमाच्या अतिवापरामुळे आणि अनियंत्रितपणामुळे काही गंभीर सामाजिक प्रश्नही निर्माण झाले आहेत. यातीलच एक अत्यंत संवेदनशील आणि चिंताजनक विषय म्हणजे लहान मुलांशी संबंधित अश्लील नृत्याचे व्हिडीओ, जे सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहेत. नुकताच एक व्हिडीओ पाहण्यात आला, ज्यात एका नामांकित सीबीएसई इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील कार्यक्रमात काही मुली 'दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे' या लोकप्रिय चित्रपटातील गाण्यावर टॉवेलमध्ये नृत्य करीत होत्या. या कार्यक्रमाला लहान मुलेही प्रेक्षक म्हणून उपस्थित होती आणि विशेष म्हणजे, शाळेचा बॅनर मागे स्पष्ट दिसत होता. अशी घटना केवळ याच शाळेत घडली आहे असे नव्हे, याआधीही शाळांचे असे व्हिडीओ व्हायरल झाले होते.

भारत हा संस्कृती आणि परंपरांचा देश आहे. नम्रता, मर्यादा, आदर, वडीलधाऱ्यांचा मान राखणे आणि वयानुसार योग्य वर्तन करणे ही भारतीय संस्कृतीची मूलभूत तत्त्वे आहेत. बालपणीच मुलांना नैतिक मूल्यांची शिकवण दिली जाते, ज्यामुळे ते सुजाण आणि जबाबदार नागरिक बनतात. कुटुंबात आणि शैक्षणिक संस्थांमध्ये मुलांना योग्य-अयोग्य, चांगले-वाईट याची जाणीव करून दिली जाते. भारतीय परंपरेत कलेला नेहमीच उच्च स्थान दिले गेले आहे, परंतु ती कला मर्यादा आणि नैतिकतेच्या चौकटीत असावी, अशी अपेक्षा असते. आपल्या संस्कृतीत बालपण हे निरागसतेचे प्रतीक मानले जाते आणि त्याचे पावित्र्य जपण्याची जबाबदारी समाजातील प्रत्येक घटकावर असते.

जागतिकीकरणामुळे पाश्चात्त्य संस्कृतीचा प्रभाव भारतीय समाजावर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. अनेकदा 'आधुनिक' दिसण्याच्या किंवा 'प्रगत' असल्याचा दावा करण्याच्या नादात काही वेळा सांस्कृतिक मूल्यांची पायमल्ली केली जाते. पाश्चात्त्य संस्कृतीत काही प्रमाणात अधिक मोकळेपणा असला, तरी लहान मुलांसाठी 'बोल्डनेस' आणि 'अश्लीलता' यातील सीमारेषा स्पष्टपणे आखलेली असते. दुर्दैवाने भारतात अनेकदा या दोन्ही संकल्पनांमध्ये गल्लत केली जाते. 'बोल्डनेस' म्हणजे केवळ शारीरिक प्रदर्शन नव्हे, तर विचारांची आणि अभिव्यक्तीची स्पष्टता असते. परंतु, आजकाल 'बोल्डनेस'च्या नावाखाली लहान मुलांना अश्लीलतेकडे ढकलले जात आहे, जे त्यांच्या मानसिक आणि भावनिक विकासासाठी अत्यंत हानिकारक ठरू शकते. 'डीडीएलजे' मधील अभिनेत्री काजोलने 'मेरे ख्वाबों में जो आए' या गाण्यावर केलेले नृत्य हे सोज्वळ आणि कलात्मक होते, असे म्हणावे लागेल. मात्र आताच्या व्हायरल व्हिडीओमधील नृत्यात मात्र ती सोज्वळता हरवलेली दिसते; उलटपक्षी ती अश्लीलतेकडे झुकणारी आहे. हा फरक समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण याच फरकामुळे बालपणाचे पावित्र्य जपले जाते.

लहान मुलांच्या संगोपनात पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. पालकांनी आपल्या मुलांना योग्य-अयोग्य शिकविणे, सोशल मीडियाच्या वापराबाबत मार्गदर्शन करणे आणि त्यांच्यावर योग्य संस्कार करणे आवश्यक आहे. परंतु, आजकाल अनेक पालक 'व्हायरल' होण्याच्या हव्यासापोटी आपल्या मुलांच्या निरागसतेचा बळी देत आहेत. लाईक्स, व्ह्यूज आणि फॉलोअर्स मिळविण्यासाठी काही पालक आपल्या मुलांना अयोग्य कंटेंट सादर करण्यास प्रवृत्त करतात. यामुळे मुलांचे बालपण हिरावले जाते आणि त्यांना अवेळी लैंगिक किंवा अश्लील कंटेंटच्या संपर्कात आणले जाते. 'माझं मूल किती हुशार आहे', 'किती बोल्ड आहे' हे दाखवण्याच्या नादात पालक नकळतपणे आपल्या मुलांचे भविष्य धोक्यात घालत आहेत. लहान मुलांचे मन अत्यंत कोमल असते. त्यांच्यावर अशा प्रकारच्या दृश्यांचा किंवा नृत्यांचा खोलवर परिणाम होऊ शकतो. त्यांना लैंगिकतेबद्दल चुकीची माहिती मिळू शकते, ज्यामुळे त्यांच्या मनात गोंधळ निर्माण होऊ शकतो. पालकांनी हे समजून घेणे आवश्यक आहे की, 'बोल्डनेस' वगैरे मोठे झाल्यावर, वयात आल्यावर ठीक आहे, पण लहानपणी हे का हवे आहे? बालपण हा निरागसता, धम्माल-मस्ती, अभ्यास आणि नैसर्गिक विकासाचा काळ असतो. या काळात मुलांना त्यांच्या वयानुसार योग्य अनुभव मिळणे आवश्यक आहे. त्यांना सुरक्षित आणि संस्कारक्षम वातावरण देणे ही पालकांची नैतिक जबाबदारी आहे. शिक्षण संस्थांची जबाबदारी केवळ शैक्षणिक ज्ञान देण्यापुरती मर्यादित नाही, तर मुलांना नैतिक आणि सांस्कृतिक मूल्यांची शिकवण देणे ही देखील त्यांची जबाबदारी आहे. शाळेच्या आवारात किंवा शाळेच्या नावाखाली आयोजित केलेल्या कार्यक्रमांमध्ये सांस्कृतिक मर्यादांचे पालन करणे आवश्यक आहे. 'आधुनिकता' किंवा 'प्रगती' या नावाखाली मूल्यांचा ऱ्हास करणे हे शिक्षण संस्थांसाठी योग्य नाही. ज्या ठिकाणी संस्कारांची बीजे पेरली पाहिजेत, तिथे जर अश्लीलतेचे धडे दिले जात असतील, तर ते अत्यंत गंभीर आहे. शाळा हे दुसरे घर असते, जिथे मुलांना सुरक्षित आणि पोषक वातावरण मिळायला हवे. शिक्षकांनी आणि शाळा प्रशासनाने हे सुनिश्चित केले पाहिजे की, कोणत्याही कार्यक्रमात मुलांच्या वयाला आणि भारतीय संस्कृतीला धरूनच कार्यक्रम सादर केले जातील. केवळ स्पर्धेत जिंकण्यासाठी किंवा 'नवीन काहीतरी' करण्याच्या नावाखाली मुलांच्या निरागसतेशी खेळणे हे अक्षम्य पाप आहे. शिक्षण संस्थांनी आपल्या विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्ये रुजविण्यासाठी आणि त्यांना जबाबदार नागरिक बनविण्यासाठी अधिक सक्रिय भूमिका बजावणे आवश्यक आहे. सोशल मीडिया ही एक दुहेरी तलवार आहे. तिचा योग्य वापर केल्यास ती वरदान ठरते, अन्यथा ती शापही ठरू शकते. 'व्हायरल' होण्याच्या हव्यासापोटी अनेकदा मर्यादांचे उल्लंघन केले जाते. सोशल मीडिया प्लॅटफॉर्मची या संदर्भात मोठी जबाबदारी आहे. त्यांनी अशा अयोग्य सामग्रीवर नियंत्रण ठेवण्यासाठी कठोर उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर समाज म्हणून आपलीदेखील जबाबदारी आहे. अशा व्हिडीओजला प्रोत्साहन न देणे, ते शेअर न करणे आणि त्याबद्दल आवाज उठवणे हे आपले कर्तव्य आहे. भारतीय मूल्ये आणि आधुनिकतेचा समतोल साधणे ही आजच्या काळाची गरज आहे. आपल्या संस्कृतीला आणि मूल्यांना विसरणे म्हणजे 'आधुनिक' होणे नव्हे, तर त्यांना जपून प्रगती करणे होय. पालक, शिक्षण संस्था आणि संपूर्ण समाजाची ही सामूहिक जबाबदारी आहे की, त्यांनी बालमनाचे संरक्षण करावे आणि त्यांना योग्य संस्कार द्यावेत. सोशल मीडिया साक्षरता वाढविणे आणि नैतिकतेचे शिक्षण देणे हे यावरचे काही महत्त्वाचे उपाय आहेत. मुलांना सोशल मीडियाचा वापर कसा करावा, काय योग्य आहे आणि काय अयोग्य आहे, हे शिकविणे आवश्यक आहे. केवळ लाईक्स आणि व्ह्यूजसाठी मुलांच्या निरागसतेचा बळी देणे हे समाजासाठी घातक आहे. या गंभीर विषयावर समाजाने एकत्र येऊन विचार करणे आणि योग्य पावले उचलणे अत्यंत आवश्यक आहे; जेणेकरून आपल्या भावी पिढीला सुरक्षित आणि संस्कारक्षम वातावरण मिळेल आणि त्यांचे बालपण खऱ्या अर्थाने फुलू शकेल.

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

विजय कुळकर्णी

# शेतजमिनीचा पोत वाढविणे आवश्यक

रासायनिक खतांचा अतिवापर, विविध प्रकारच्या कीटक व रोगनाशकांची पिकांवर फवारणी यामुळे शेतजमिनीचा पोत (कस) कमी होत आहे. शेतीतून जास्तीत जास्त उत्पादन मिळण्यासाठी शेतकरी विविध रासायनिक खतांचा वापर करीत आहेत. आपल्या जमिनीला कोणती द्रव्ये आवश्यक आहेत, याबाबत जाणून न घेताच रासायनिक खतांचा अतिवापर केला जात आहे. पिकांवर आलेल्या विविध रोग व कीड नियंत्रणासाठी विविध प्रकारची रासायनिक औषधी फवारली जात आहेत. त्यामुळे अन्नधान्यात अजाणतेपणी विष मिसळले जात आहेच; शिवाय आपल्या शेतजमिनीचा पोत म्हणजे कसदारपणादेखील आपण आपल्याच हाताने कमी करीत आहोत. त्यामुळे जमिनीचा सुपीकपणा जाऊन ती काळी भुसभुशीत जमीन पडीक होण्याच्या स्थितीकडे जात आहे. तेव्हा, शेतजमिनीचा पोत कायम राखणे आज अतिशय आवश्यक झाले आहे. पूर्वी जवळपास सर्वच शेतकऱ्यांकडे गायी-म्हशी असायच्या. किमान एक बैलजोडी तर असायचीच. त्यामुळे दरवर्षी शेतात घरचे शेणखत टाकले जात होते. शेणखत मिळाल्यामुळे जमिनीला आवश्यक ती सर्व घटकद्रव्ये मिळत होती. ती मिळाल्याने रासायनिक खतांचा वापर अभावानेच केला जात होता. आज शेतकऱ्यांकडील गायी-म्हशींची संख्या फारच कमी झाली आहे. नसल्यातच जमा आहे. बैलजोड्याही फार कमी कास्तकारांकडे आहेत. शेतीची जवळपास सर्वच कामे ट्रॅक्टरद्वारे केली जातात. तसेच, पीक पद्धतीत बदल झाल्याने चाऱ्याचा अभाव निर्माण झाला आहे. त्यामुळे शेतकरी बैलजोडी किंवा गायी-म्हशी ठेवत नाहीत. परिणामी शेणखत शेतात टाकले जात नाही. याचा परिणाम जमिनीचा कसदारपणा कमी होण्यावर झाला आहे.

सध्या बुलढाणा जिल्ह्यात जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी गाळमुक्त धरण व गाळयुक्त शेती हा उपक्रम हाती घेतला आहे. या अभियानांतर्गत जिल्ह्यातील धरणांचे खोलीकरण करण्याचे काम केले जात आहे. धरण खोलीकरणातून निघालेला गाळ शेतकऱ्यांना मोफत त्यांच्या शेतात टाकण्याची परवानगी देण्यात आली आहे. या उपक्रमामुळे नदीकाठच्या गावातील शेतकऱ्यांनी लोकसहभागातून नदीपात्राचे खोलीकरण करून त्यातील गाळ ट्रॅक्टरने आपआपल्या शेतात टाकणे सुरू केले आहे. ज्या शेतकऱ्यांनी धरणातील गाळ आपल्या शेतात टाकला त्यांची शेती गाळयुक्त होणार आहे. गाळाची शेती झाल्याने तिची सुपीकता वाढून उत्पादनातही वाढ होणारच आहे. लोकसहभागातून हे काम केले जात असल्याने शासनाचा या कामावरील खर्च वाचला आहे. तसेच, शेतकऱ्यांना मोफत गाळ मिळाल्याने त्यांची शेती सुपीक होणार आहे. तर, नदीपात्राचे खोलीकरण झाल्याने धरणातील पाणी साठ्यात वाढ होणार आहे. पात्र खोल झाल्याने धरणात जास्त दिवस पाणी राहणार आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटणार आहे. धरणातील जलसाठा वाढल्याने आसपासच्या भूगर्भातील पाण्याच्या पातळीतही वाढ होणार आहे. त्यामुळे विंधन विहिरी, विहिरी इत्यादी जलस्रोतातील जलस्तरात वाढ होणार आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्याची समस्या सुटण्यासोबतच शेतकऱ्यांना सिंचनासाठीही पाणी उपलब्ध होणार आहे. सिंचनासाठी पाणी उपलब्ध झाल्याने शेतकरी खरिपासोबतच रबीची पिके घेऊ शकणार आहे. पाणी उपलब्ध झाल्याने फळबाग लागवड करता येणार आहे. याचा शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे. सोयाबीन, कापूस, तूर इत्यादी खरिपाच्या पिकांसोबत गहू, हरभरा, लिंबू लागवड व इतर फळबाग लागवड केल्यामुळे शेतकऱ्यांना तीन ते चार पिके सहज घेता येतील. त्यामुळे उत्पन्नातही वाढ होणार आहे. एवढे फायदे हे या उपक्रमामुळे होणार आहेत. बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा तालुक्यातील साखरखेर्डा येथील भोगावती नदीवर सिंदी-साखरखेर्डा आणि सवडद येथे केटीवेअर तयार केले आहेत. त्यामुळे किमान आठ महिने या नदीत पाणी साठून राहते. या नदीपात्रात प्रचंड गाळ साचला होता. हा गाळ शेतीसाठी उपयुक्त असून रासायनिक खतापेक्षा पिकांसाठी पोषक आहे. हे ओळखून नदीकाठच्या शेतकऱ्यांनी एकत्र येऊन नदीतील गाळ उपसून शेतात टाकण्याचे काम सुरू केले आहे. सिंदीचे सरपंच अशोक खरात यांनी पुढाकार घेऊन शेतकऱ्यांच्या मदतीने लोकसहभागातून गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार हा उपक्रम राबविण्याचे ठरविले आहे. त्याला शेतकऱ्यांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे. हा बुलढाणा पॅटर्न इतर जिल्ह्यातही राबविला गेल्यास नदीपात्रांचे खोलीकरण करण्यास शासनाला एक रुपयाही खर्च येणार नाही. शेतकऱ्यांना त्यांची शेती गाळयुक्त झाल्याने रासायनिक खतांवरील खर्च टाळून बचत करता येईल. तसेच, उत्पादन वाढल्यामुळे त्यांच्या उत्पन्नातही वाढ होईल, हे नक्की. तेव्हा शासनाने महाराष्ट्रात हा उपक्रम राबवावा, असे वाटते.

८८०६००६१४९

## मुंबई वार्तापत्र

# सेक्युलर की सिलेक्टिव्ह?

नागेश दाचेवार

महाराष्ट्राच्या राजकारणात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की त्यांच्या वक्तव्यांमुळे, वागणुकीमुळे आणि भूमिकांमुळे सतत वाद निर्माण होतात. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड हे त्यापैकी एक प्रमुख नाव आहे. स्वतःला प्रगल्भ, विचारवंत आणि पुरोगामी म्हणून सादर करण्याचा प्रयत्न करणारे आव्हाड प्रत्यक्षात अनेकदा अशा भूमिका घेतात की, ज्यामुळे समाजात तणाव निर्माण होतो; मुळात तो निर्माण करणे हाच त्यांचा मूळ उद्देश असतो. कारण आव्हाड ज्या भागातून निवडून येतात त्या भागातील बहुतांश मतदार हे विशिष्ट समाजाचे असल्याने त्यांना खूश करण्यासाठी हा सर्व प्रकार ते सातत्याने करीत असतात. त्यांनी केलेले वक्तव्य मोठा गहजब करून जातात. मात्र, त्यानंतरचा त्यांचा माफीनामा कुठल्यातरी कोपऱ्यात जातो. त्यामुळे वक्तव्ये करून निर्माण झालेल्या वादातून आव्हाडांचा लांगूलचालनाचा उद्देश हा सफल होत असतो.

अलिकडच्या काळात वारंवार दिसून आलेली बाब म्हणजे आव्हाड यांची वक्तव्ये ही केवळ विरोधासाठी विरोध करण्याच्या पातळीवर जातात. हिंदुत्व, परंपरा आणि विशेषतः छत्रपती शिवाजी महाराजांसारख्या महान ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांबाबत बोलताना आवश्यक तो आदर, संवेदनशीलतेचा अभाव स्पष्टपणे जाणवतो. शिवाजी महाराज हे केवळ एका विचारसरणीचे प्रतीक नसून संपूर्ण महाराष्ट्राचे, देशाचे दैवत आहेत. त्यांच्या संदर्भात अर्धवट माहिती किंवा कुत्सित भूमिका घेणे हे केवळ अयोग्यच नाही तर समाजाच्या भावनांवर घाव घालणारे ठरते. राजकारणात किंवा राजकारणासाठी तरी किमान महाराजांच्या नावाचा वापर करू नये. महाराजांच्या नावाला कलंकित करू नये एवढीच माफक अपेक्षा राजकारण्यांकडून आहे.

विधानसभेत घडलेला अलिकडचा प्रसंग याचेच उदाहरण आहे. आपल्या वक्तव्यांमुळे निर्माण झालेल्या संतापानंतर आव्हाड यांना अखेर माफी मागावी लागली. पण प्रश्न असा आहे की, वारंवार अशी वेळ का येते? माफी मागून विषय संपतो का? की, त्यामागील विचारसरणी आणि वृत्ती यावर गंभीर प्रश्न उपस्थित होतात? एखाद्या राजकीय नेत्याने चूक केली तर त्यातून शिकणे अपेक्षित असते; येथे मात्र आव्हाड पुन्हा पुन्हा तेच करताना दिसून येतात. सातत्यानं चुका करतात, वादग्रस्त वक्तव्य करतात आणि माफीदेखील मागतात. असा निर्लज्ज प्रकार खपवून तरी कसा घ्यायचा?



स्वतः चर्चेत राहण्यासाठी, स्वतःची प्रसिद्धी मिळविण्यासाठी मुद्दाम वादग्रस्त विधान करणे, हा आव्हाड यांच्या राजकीय शैलीचा भाग झाला आहे. एकीकडे मी सेक्युलर असल्याचा दावा करणारे आव्हाड हिंदू परंपरांवर टीका करणे, देवीदेवतांवर टीका करणे, ऐतिहासिक व्यक्तींवर शंका उपस्थित करणे हा सगळा खटाटोप समाजातील एका विशिष्ट घटकाला खूश करण्यासाठी करतात. एका समाजाला खूश करण्यासाठी दुसऱ्याच्या भावना दुखावणे हा आव्हाडांच्या सेक्युलरिज्मचा प्रकार कळण्यापलीकडे आहे. आव्हाडांची ही कृती सेक्युलर की सिलेक्टिव्ह, असा प्रश्न निर्माण होतो.

तत्कालीन राज्यपालांनी केलेले महाराजांचे उदाहरण देऊन केलेल्या वक्तव्यानंतर राळ उठविण्यात हेच आव्हाड अग्रेसर होते आणि तेच आव्हाड, केवळ हिंदू देवी-देवतांचाच नव्हे, तर तुकाराम महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचादेखील अवमान वेळोवेळी करताना दिसले. तुकाराम महाराजांचा खून झाल्याचे वादग्रस्त वक्तव्य आव्हाडांनी मागील काळात केले होते. त्यांचा एकेरी उल्लेख केला होता. न्यायव्यवस्थेत आरक्षण नाकारून बाबासाहेबांनी ८० टक्के लोकांवर अन्याय केला असे वक्तव्य करणे, त्यानंतर बाबासाहेबांचा फोटो फाडणे, एवढेच नव्हे तर देशाचा ध्वज भर सभागृहात उलटा फडकविण्यासारखे कृत्य करून आव्हाडांनी सर्वच मर्यादा ओलांडल्या आहेत. स्वतःला शाहू-फुले-आंबेडकरांचा वारस आणि सेक्युलर म्हणवणाऱ्या या आव्हाडांनी कुठलीही अशी मर्यादा नाही जी ओलांडली नाही. जगात आणि देशात अशा प्रकारची विक्षिप्त माणसे आढळतात जी विचारपूर्वक नव्हे तर भावनिक, आक्रमक आणि कधी कधी बेफिकीर पद्धतीने बोलतात. कॅमेरा दिसला की काहीतरी बोलायचे, लक्ष वेधून घ्यायचे आणि त्यातून वाद निर्माण झाला तरी चालेल; मात्र आपला राजकीय स्वार्थ साधायचा, असे प्रकार ते करीत असतात. ही वृत्ती खरोखर धोकादायक आहे. कारण राजकारण हे केवळ लोकप्रियतेसाठी नसते, तर जबाबदारीने वागण्यासाठी असते. पण जबाबदारीनं वागणं हा शब्द जितेंद्र आव्हाडांच्या शब्दकोशातच नाही. प्रियांक खडगे, स्टॅलीन अशी काही उदाहरणेही याच संदर्भात लक्षात घेण्यासारखी आहेत. या काही नेत्यांनी देवीदेवतांवर अनावश्यक टीका करून राजकीय पोळी शेकण्याचा प्रयत्न केला. समाजमाध्यमं आणि प्रसारमाध्यमं यांच्यामुळे अशा वक्तव्यांचे परिणाम तत्काळ दिसून येतात. लोकं आता जागरूक झाले आहेत. त्यामुळे कोणते वक्तव्य केवळ प्रसिद्धीसाठी आहे आणि कोणते वास्तवावर आधारित आहे, हे ओळखू लागले आहेत. विरोधही करू लागले आहे. त्यामुळे आता असे प्रकार फार काळ चालणार नाही. हे जरी सत्य असले, तरी काही अराजकीय तत्त्व आणि माथेफिरू लोकांचीही कमी या देशात नाही. त्यामुळे अशा लोकांचं फावत आहे.


जितेंद्र आव्हाड यांच्या बाबतीत सर्वात मोठा प्रश्न हा आहे की, औरंगजेब, टिपू सुलतान आणि त्यांना 'रहनुमा' मानणाऱ्यांच्या प्रतीकांच्या बाबतीत बोलताना जी संवेदनशीलता आव्हाड राखतात, पाळतात ती आमच्या प्रतीकांच्या बाबतीत का पाळत नाहीत? त्यांच्या भूमिकांमध्ये दोन समाज किंवा दोन प्रतीकांच्या बाबतीत हा भेदभाव कसा? टीका करणे हा लोकशाहीचा भाग आहे, परंतु ती टीका अभ्यासपूर्ण, संयमित आणि वस्तुनिष्ठ असावी लागते. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे ती सर्वसमावेशक असली पाहिजे, पक्षपाती नसावी, सिलेक्टिव्ह नसली पाहिजे. मात्र, आव्हाडांच्या प्रत्येक भूमिका या सिलेक्टिव्ह आणि पक्षपाती असल्याचं वेळोवेळी अधोरेखित झाले आहे. केवळ लक्ष वेधणे आणि चर्चेत राहण्यासाठी असे कृत्य आव्हाड करीत असतात. मात्र, शिवाजी महाराज, हिंदू संस्कृती किंवा कोणतीही परंपरा यावर बोलताना संवेदनशीलता आवश्यक असल्याचं भान आव्हाडांनीच नव्हे, तर प्रत्येकानं राखलं पाहिजे. कारण या गोष्टी केवळ राजकीय मुद्दे नाहीत तर त्या लाखो लोकांच्या भावना, श्रद्धा आणि अस्मितेशी जोडलेल्या आहेत. त्या पातळीवर जाऊन जर कोणी वारंवार वाद निर्माण करीत असेल, तर त्यावर स्वाभाविकच गंभीरतेने विचार करण्याची गरज आहे. तसे विधानसभाध्यक्षांनी आव्हाडांना अंतिम चेतावनीच दिली आहे. यातून तरी आव्हाडांच्या वर्तणुकीत काही बदल होतात का? हे येत्या काळात कळेलच.

शेवटी, लोकशाहीत प्रत्येकाला आपले मत मांडण्याचा अधिकार आहे. पण त्या अधिकारासोबत जबाबदारीही येते. जितेंद्र आव्हाड यांच्यासारख्या नेत्यांनी ही जबाबदारी ओळखली नाही, तर त्याचे दुष्परिणाम केवळ त्यांच्या वैयक्तिक प्रतिमेवर नाही, तर त्याचा व्यापक परिणाम समाजावरही होतो. श्रीलंका, सीरिया, बांग्लादेश, नेपाळ, म्यानमार यासारख्या देशांची आणि जगातील युद्धजन्य परिस्थिती बघितल्यानंतर आज गरज आहे, ती संयम, संवेदनशील आणि समाजहित जपणाऱ्या परिपक्व राजकारणाची, समाजकारणाची.

९२७०३३३८८६

## वाचक पत्रे

### रेल्वे प्रवाशांची सुरक्षा



मुंबई उपनगरी रेल्वेच्या विस्तारीकरणावर भर दिला जात असताना, ज्यांच्यासाठी करायचं त्या प्रवाशांच्या सुरक्षेकडे मात्र दुर्लक्ष तर होत नाही ना, असा प्रश्न पडतो. एका दिवसात तब्बल १४ प्रवाशांचा मृत्यू झाल्याची नोंद मुंबई रेल्वे पोलिसांकडे झाली, असे वाचनात आले. ही घटना अत्यंत चिंताजनक असून धक्कादायकही आहे. दररोज लाखो प्रवासी जीव मुठीत धरून प्रवास करतात. रेल्वे रूळ ओलांडताना होणारे अपघात ही गंभीर समस्याच बनली आहे. रेल्वे प्रशासनाने केवळ प्रकल्पांची घोषणा न करता त्यांची वेळेत आणि प्रभावी अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. शिवाय प्रवाशांमध्ये जनजागृती, सुरक्षित पादचारी पूल, कुंपण, आणि महत्वाचे म्हणजे कडक कायदे, नियमांचा धाक वाटेल, भीती वाटेल अशा कायदे, नियमांची अंमलबजावणी यावर तातडीने भर देणे आवश्यक आहे. प्रवाशांचे जीव वाचवणे हीच खरी प्राथमिकता असली पाहिजे.

**विश्वनाथ पंडित** /ठाणे

### तरुण भारतमुळे मैत्री

दैनिक तरुण भारतची पुणे आवृत्ती ५ मार्च २०२६ ला सुरू झाली. दिनांक ७ मार्चच्या 'वाचक पत्रे' या सदरात 'भारताचे संकटमोचक' या शीर्षकाचा माझा एक लेख प्रकाशित झाला. त्याच दिवशी दहा वाजून बारा मिनिटांनी माझा भ्रमणध्वनी खणखणला. मी फोन घेतला आणि पुण्याचे डॉ. अशोक काळे सर माझ्याशी बोलत असल्याचे मला कळले. त्यांनी पुण्याच्या तरुण भारतात माझा लेख वाचल्याचे मला सांगितले. मी नागपूरकर असल्याचे त्यांना सांगताच त्यांनी 'लेख वाचला का ?' असा प्रश्न मला केला. तरुण भारतच्या नागपूर आवृत्तीत पण लेख असल्याचे मी सरांना कळवले. माझी लेखनशैली बघता मी वैद्यकीय डॉक्टर खात्रीने नसणार असा विश्वास त्यांना वाटत होता. पण मी विकृतिशास्त्रज्ञ आहे हे कळल्यावर त्यांना थोडसं आश्चर्य वाटलं. सेवानिवृत्तीनंतर करत असलेल्या समाजकार्याबद्दल त्यांनी मला विस्तृत माहिती दिली. त्यांच्या सामाजिक कार्याला हातभार लावण्याची मी तयारी दर्शवली. सहा मिनिटांच्या संवादात मला नवीन माहिती मिळाली. केवळ तरुण भारतमुळे मला पुण्यातील एक वरिष्ठ डॉक्टर मित्र मिळाला.

**डॉ. मदन काकडे**/९३७३११२४८७

### शतक पूर्तीनिमित्त अभिनंदन

आजपर्यंत वाचलेल्या अग्रलेखांपैकी अतिशय उत्तम आणि आदर्श अग्रलेख आज वाचण्यात आला. खूप खूप अभिनंदन. मी लहानपणापासूनच तरुण भारतमधील अग्रलेख, स्तंभलेख आणि रविवारची पुरवणी वाचूनच मोठे झाले. राजकारण, समाजकारण आणि अध्यात्म, राष्ट्रधर्म याविषयी आवड निर्माण झाली. घरात संघाचे संस्कार पूर्वीपासूनच होते. देव ,देश आणि धर्म यासाठी वाहिलेले हे एकमेव दैनिक होते. मा. गो. वैद्य हे संपादक असतानापासूनचे तरुण भारत मला माहिती आहे. प्रतिकूल परिस्थितीत, अडथळ्यांची शर्यत पार करत, एका विशिष्ट वैचारिक भूमिकेशी एकनिष्ठ राहून शतकपूर्ती करणे सोपे नाही. बऱ्यापैकी मी त्याची साक्षीदार आहे. १९९० पासून जागतिक आणि भारतातील बदल आणि त्यानंतर भारताची समृद्धीकडे होणारी वाटचाल ते २०१४ नंतर आपल्या विचारांशी सुसंगत सत्तांतर हे सर्व बदल आम्हाला अनुभवता आले. मला तरुण भारतमुळेच लिखाणाची आवड निर्माण झाली. तत्त्वाशी एकनिष्ठ राहून, कोणतीही आर्थिक तडजोड न करता शतकपूर्तीचा पल्ला गाठणे सोपे नव्हते. या अग्रलेखांमुळे आताच्या पिढीला तरुण भारतची वैचारिक, खडतर, कणखर आणि त्यातून प्रगतीकडे झालेली वाटचाल कशी झाली याची इत्थंभूत माहिती मिळाली. अभिनंदन आणि पुढच्या वाटचालीसाठी शुभेच्छा.

**माधवी पत्की**/नागपूर

### वनक्षेत्राची घट अत्यंत चिंताजनक

जगातील वन क्षेत्र संरक्षित राहावे व जंगलातील संपूर्ण जीवजंतूंचे संरक्षण व्हावे या उद्देशाने २१ मार्चला आंतरराष्ट्रीय वन दिवस साजरा केला जातो. देशात फक्त २१ टक्के व राज्यात १६ टक्के वनक्षेत्र शिल्लक असल्याचा अहवाल अत्यंत गंभीर व धोकादायक बाब आहे. घटत्या वनक्षेत्रामुळे हवामानात बदल होऊन ग्लेशियर वितळणे, भूकंप, ज्वालामुखीचा उद्रेक, भूस्खलन, अति उष्णता, अति पाऊस, त्सुनामी, समुद्राची पातळी वाढणे अशा घटना वाढत आहेत. अमेरिकेच्या हेल्थ इफेक्ट इन्स्टिट्यूटने 'स्टेट ऑफ ग्लोबल एअर २०२४' अहवाल सादर केला आहे. वायुप्रदूषणामुळे जगभरातील मृत्यूच्या तुलनेत २५ टक्के मृत्यू भारतात होतात म्हणजेच भारत वायुप्रदूषणाच्या बाबतीत अग्रेसर असल्याचे दिसून येते आणि ही गंभीर बाब आहे याला रोखण्यासाठी वनक्षेत्र वाढविण्याची नितांत गरज आहे व संपूर्ण स्तरातून वृक्षलागवड मोहीम युद्धपातळीवर राबविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**रमेश कृष्णराव लांजेवार**/नागपूर,

## महत्वाचे...

### मंत्री भरत गोगावले यांचा सोलापूर जिल्हा दौरा

**केळी उत्पादक शेतकरी, एक्सपोर्टर यांच्याशी साधणार संवाद**

**सोलापूर दि. २० मार्च-**
राज्याचे फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले हे शनिवार, दि. २१ मार्च २०२६ रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे. शनिवारी २१ मार्च २०२६ रोजी दुपारी १२.४५ वाजता टेंभुर्णी ता. माढा, जि. सोलापूर येथे आगमन व राखीव. दुपारी ०२.०० वाजता केळी उत्पादक शेतकरी वेंडर एक्सपोर्टर यांच्याशी चर्चा. दुपारी ०३.०० वाजता सुरली व अकोले खुर्द, ता. माढा या गावातील केळी, आंबा, पेरू व डाळींब उत्पादक यांच्या शेतावर शिवार फेरी. त्यानंतर सायं. ०५.३० वाजता अकोले खुर्द येथून पेनुर कडे प्रयाण. सायंकाळी ०६.०० वाजता पेनुर येथे आगमन व पेनुर येथे यात्रे निमित्त जंगी कुस्ती कार्यक्रमास उपस्थिती. त्यानंतर सायं. ०७.३० वाजता पेनुर ता. मोहोळ जि. सोलापूर येथून सातारा कडे प्रयाण करतील.



हिंगोली : राज्यसभेचे नूतन खासदार रामराव वडकुते यांचा सोलापूर दैनिक तरुण भारतच्या वतीने सत्कार केला. यावेळी मराठवाडा आवृत्ती विभाग प्रमुख राजाराम मस्के, हिंगोली शहर प्रतिनिधी तथा प्रेस फोटोग्राफर विजय गुंडेकर उपस्थित होते.

### तू माझ्याकडे रागाने का बघतोस म्हणत मारहाण

**सोलापूर, दि. २० मार्च-**
मानलेली मावशी मलेका जमाल शेख यांना भेटण्यास दि. २१ मार्च हे शब्बीर रौफ शेख (वय ३९) हे त्यांच्या न्यू धोंडीबा वस्ती सोलापूर येथे गेले असता सलीम नदाफ हा तू माझ्याकडे रागाने हे बघतो असे म्हणून शिवीगाळ करत असताना, सोहेल नदाफ व खुशबू नदाफ यांनी लोखंडी सळईने मारून, उजव्या पाय फ्रॅक्चर केला व लाथाबुक्याने मारहाण केली. याबाबत सलगर वस्ती पोलीस ठाण्यात दि. २० मार्च रोजी तिघां विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पवार करत आहेत.

# यंदा शिक्षकांना उन्हाळी सुट्टी नाहीच

- उन्हाळी सुट्टीतही शिक्षकांना जनगणनेची जबाबदारी; १६ मे ते १४ जून घरगणना
- कामानंतर मिळणार तेवढ्याच दिवसांची विशेष रजा; २०२७ च्या जनगणनेची तयारी सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० मार्च-**
देशातील जनगणना प्रक्रिया २०११ नंतर आता पुन्हा राबविण्यात येत असून, त्यासाठीची पूर्वतयारी प्रशासनाने सुरू केली आहे. २०२७ मध्ये होणाऱ्या जनगणनेपूर्वीचा महत्त्वाचा टप्पा म्हणून घरगणना (घरे मोजणी) प्रक्रिया १६ मे ते १४ जून या कालावधीत पार पडणार आहे. या कामासाठी शिक्षकांसह विविध शासकीय कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणार आहे.जनगणनेच्या या पहिल्या टप्प्याआधी नियुक्त प्रगणक व पर्यवेक्षकांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यानुसार २७ एप्रिल ते ८ मे दरम्यान प्रशिक्षणाचे सत्र आयोजित करण्यात आले आहे. या प्रशिक्षणानंतर प्रत्यक्ष घरगणनेचे काम सुरू होईल.

**शिक्षकांना सांभाळावी लागणार दुहेरी जबाबदारी**

शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यानंतर २० ते २५ दिवसांत म्हणजेच जुलै महिन्यात शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शिक्षकांना जनगणनेचे काम आणि टीईटीचा अभ्यास अशा दुहेरी जबाबदाऱ्या सांभाळाव्या लागणार आहेत. उन्हाळी सुट्टीत विश्रांतीऐवजी शिक्षकांना जनगणनेच्या कामासाठी वेळ द्यावा लागणार असून, पुढील शैक्षणिक व स्पर्धात्मक जबाबदाऱ्यांमुळे त्यांच्यावर ताण वाढण्याची शक्यता आहे.

**तेवढ्याच दिवसांची विशेष रजा**

जनगणनेचे काम पूर्ण केल्यानंतर संबंधित शिक्षकांना त्यांनी जितके दिवस काम केले, तेवढ्याच दिवसांची विशेष रजा शासनाच्या मान्यतेने दिली जाणार आहे. त्यामुळे सुट्टीत केलेल्या कामाची भरपाई पुढील काळात मिळणार असली, तरी सध्या मात्र शिक्षकांवर अतिरिक्त जबाबदारी येणार आहे.

यान, शाळांना २ मे ते १४ जून या कालावधीत उन्हाळी सुट्टी जाहीर असली, तरी १६ मे ते १४ जून या काळात शिक्षकांना जनगणनेचे काम करणे बंधनकारक असणार आहे. त्यामुळे सुट्टीच्या काळातही शिक्षकांना मुख्यालय सोडता येणार नाही. ज्या ठिकाणी ते नोकरी करतात, त्या गावात किंवा शहरातच त्यांना उपस्थित राहावे लागणार आहे.

जल्हा प्रशासनाने या प्रक्रियेसाठी आवश्यक म नुष्यबळाच्या याद्या तयार केल्या असून, नियोजनबद्ध पद्धतीने कामकाज सुरू आहे. प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी सांगितले की, जनगणना ही अत्यंत महत्त्वाची राष्ट्रीय प्रक्रिया असून, नियुक्त शिक्षक व कर्मचाऱ्यांनी त्यासाठी सज्ज राहणे गरजेचे आहे. २०२७ मध्ये फेब्रुवारी महिन्यापासून लोकसंख्येची जनगणना सुरू होणार असून, १ मार्च २०२७ पासून जातनिहाय जनगणनाही केली जाणार आहे. त्यामुळे यंदाची घरगणना ही त्या मोठ्या प्रक्रियेची पूर्वतयारी मानली जात आहे.

## दोन मोटरसायकल चोरांना अटक करून ६ मोटरसायकल हस्तगत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मार्च-**
आंतरराज्यीय दोन मोटार सायकल चोरांना अटक करून १ लाख ७५ हजार रुपये किंमतीच्या ६ मोटार सायकल शहर गुन्हे शाखेने हस्तगत केल्या.
चोरी केलेली मोटार सायकल क्रमांक एम.एच.१३ डी.पी. ९९२७ ही हिरो स्प्लेंडर प्लस कंपनीची मोटार सायकल घेऊन, कर्नाटकातील दोन इसम गंगामाई हॉस्पिटल परिसरात फिरत असलेल्यांना ताब्यात घेतले. प्रमोद अर्जुन जेऊर (वय २१, रा. अतारगा ता. इंडी जि. विजयपूर) व पाठीमागे बसलेला अमोल भाऊसाहेब चव्हाण (वय २६), रा. जाधव वस्ती, आरकेरी, ता. व जि. विजयपूर) असे असल्याचे सांगितले.ताब्यातीलमोटारसायकल ही, ४ जानेवारी रोजी सोलापूरात येऊन, सात रस्ता येथील एका हॉस्पिटलच्या समोरुन चोरल्याची कबूली दिली व शुक्रवारी देखील दोघे मोटार सायकल चोरण्याच्या उद्देशाने सोलापूरात आले होते, असे त्यांनी सांगितले. मागील सहा महिन्यात शहरातून आणखी ५ मोटार सायकली चोरल्या असल्याची माहिती दिली. त्यामुळे सपोनि शैलेश खेडकर यांनी त्या दोघांना गुन्ह्यात अटक केली, तपासामध्ये आरोपींनी आणखी ५ मोटार सायकली त्यांनी (जेऊर, जि. विजापूर) येथून काढून दिल्या आहेत. अशा प्रकारे शहर गुन्हे शाखेने मोटार सायकल चोरीचे ६ गुन्ह्यातील एकूण १ लाख ७५ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला.
ही कामगिरी शहर पालिस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस उपायुक्त डॉ. अश्विनी पाटील, सहा. पोलीस आयुक्त राजन म ाने, अरविंद माने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली स्टाफने केली.

## मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते जि.प. नुतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० मार्च-**
भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष शहाजी पवार यांच्या निवासस्थानी राज्याचे कॅबिनेट सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते उत्तर सोलापूर तालुक्यातील निवडून आलेल्या नूतन सदस्यांचा आणि जिल्हा परिषद पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.
त्यांनी माजी जिल्हाध्यक्ष पवार यांच्या निवासस्थानी येऊन नूतन जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, उपाध्यक्ष इंद्रजित पवार,



उत्तर सोलापूर सभापती तेजस्विनी बोराडे, उपसभापती सुनील भोसले, जिल्हा परिषद सदस्या चेताली मुळे, पंचायत समिती सदस्या सुनीता बारसकर व सर्व नवनिर्वाचित सदस्यांचा सत्कार केला. यावेळी शिखर बँकेचे माजी संचालक अविनाश महागावकर, बाजार समिती संचालक अविनाश मार्तंडे, सरपंच प्राजंली पवार, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष काशिनाथ कदम, तालुकाध्यक्ष संभाजी दडे, ओबीसी जिल्हाध्यक्ष विनायक सुतार, श्रीमंत बंडगर तसेच इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



## 'जैन गुरुकुल'च्या अंगणात २१ वर्षांनंतर पुन्हा भरली शाळा

**माजी विद्यार्थ्यांनी स्नेह मेळाव्यात दिल्या जुन्या आठवणींना उजाळा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मार्च-**
श्री ऐ. प. दिगंबर जैन पाठशाळा संचलित श्री दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयातील सन २००४-०५ च्या दहावीच्या (अ, ब, क, ड) बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. तब्बल २१ वर्षांनंतर सर्व मित्र आणि आजी-माजी शिक्षक पुन्हा एकत्र आले आणि शालेय जीवनातील जुन्या आठवणींना उजाळा मि ळाला.
प्रारंभी विद्येची देवता सरस्वती, गुरुकुल शिक्षण प्रणालीचे प्रणेते परमपूज्य १०८ समंतभद्र महाराज व संस्थेचे माजी सचिव श्रद्धेय भाऊसाहेब गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.
मुख्याध्यापक राजकुमार काळे यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा पार पडला. यावेळी उपमुख्याध्यापक शैलेश पांगळ, पर्यवेक्षक प्रवीण कस्तुरे, माजी मुख्याध्यापक प्रेमचंद मेने, वर्गशिक्षक अशोक धोंगडे, अरुण धुमाळ, श्रीरंग माळी, सुभाष नागरसे, संजय भस्मे, तांत्रिक विभाग प्रमुख राजेश मोहोळकर, सुरेश टोपरे आणि दिपक कलढोणे या गुरुजनांची प्रमुख उपस्थिती होती. माजी विद्यार्थ्यांच्या वतीने सर्व शिक्षकांचा मानाचा फेटा, मायेची शाल आणि रोप देऊन कृतज्ञतापूर्वक सत्कार करण्यात आला तसेच शाळेमध्ये वृक्षारोपण करण्यात आले.
अलीकडेच राज्यस्तरीय शैक्षणिक गुणवत्ता मूल्यांकनात या प्रशालेला + श्रेणी प्राप्त झाल्याचे अभिमानास्पद असल्याची भावना माजी विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी माजी विद्यार्थ्यांनी एकत्र संघटना स्थापन करणे ही काळाची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.
स्नेहमेळावा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी मल्लिनाथ आळंगे,अविनाश शिराळकर,विरेंद्र सट्टे,प्रशांत नागणकिरे, किरण कुलकर्णी,पंकज यादव,रोहित बोरामणी, रोहन भांडेकर,सागर हिरेहब्बू, ओंकार भांगे, गौस शेख, राजेश इंगोले, विरपक्षप्पा लोणी, नागराज हुमनाबादे, सुनिल कोकणे,सचिन जिरे, कान्हा कदम ,स्वप्नील आखाडे आणि अतिश धेंडे यांनी परिश्रम घेतले.

## मराठी भवनचे काम सुरू करण्यासाठी मसाप दक्षिणच्या वतीने मंत्री शेलारांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मार्च-**
पार्क चौकातील शुभराय आर्ट गॅलरीच्या जागेवरील रखडलेल्या मराठी भवनचे बांधकाम तातडीने सुरू करावे, अशी मागणी महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरच्या वतीने राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्याकडे निवेदनाच्या माध्यमातून करण्यात आली. यावेळी कार्याध्यक्ष प्रशांत बडवे, कार्यवाह जितेश कुलकर्णी, कोषाध्यक्ष अमोल धावळे, सल्लागार अविनाश महागांवकर, प्रसिध्दी प्रमुख विनायक होटकर, भारतीय जनता पक्षाचे माजी जिल्हाध्यक्ष शहाजी पवार, आदी उपस्थित होते.
महाराष्ट्रातील सोलापूर हे महत्वाचे शहर आहे. मराठी साहित्य, नाट्य,संगीत आणि विविध कला समृध्द करण्यासाठी सोलापूर मधून अनेकांनी योगदान दिले आहे. अनेक प्रतिभावंत साहित्यिक, कलावंत या सोलापूरने महाराष्ट्राला दिले. कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि म हाराष्ट्र या तीन राज्यांच्या सीमेवर असूनही मराठी भाषेची वृध्दी करण्यात सोलापूर हे अग्रेसर आहे. या सर्व पार्श्वभूमीवर सोलापूरमध्ये मराठी भवन असावे त्यातील एका विभागाला स्वर्गीय दत्ता हलसगीकर यांचे नाव द्यावे अशी अपेक्षा महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूर यांच्या वतीने तत्कालीन आमदार आणि विद्यमान खासदार प्रणिती शिंदे यांच्याकडे व्यक्त करण्यात आली होती. त्यानुसार स्व. डॉ.वासुदेव रायते, हास्यसम्राट प्रा.दिपक



देशपांडे, प्रशांत बडवे, रवी हलसगीकर यांचे शिष्टमंडळ आ. प्रणिती शिंदे यांच्या नेतृत्वाखाली तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांना भेटून मराठी भवनच्या मागणीचे निवेदन देण्यात आले. त्यावर सकारात्मकपणे प्रतिसाद देत तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.
त्यानंतर गेल्या ७ ते ८ वर्षांपासून मराठी भवनच्या म ागणीचे पाठपुरावा करून आ. प्रणिती शिंदे यांनी सोलापूरमध्ये मराठी भवन तयार करण्यासाठी राज्य शासनाकडून निधी मंजूर करून आणला. त्याबाबतचा आदेशही जिल्हा प्रशासनाला प्राप्त झाला. त्यानुसार बांधकाम ला सुरुवात झाली परंतु गेल्या दोन वर्षांपासून हे बांधकाम बंद अवस्थेत आहे. त्याचा पाठपुरावा म्हणून आणि मराठी भवन लवकरात लवकर सोलापूरकरांना उपलब्ध व्हावे या हेतुने राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांना मराठी भवनचे बांधकाम तातडीने सुरू करावे यासाठी निवेदन देण्यात आले. त्यावर त्यांनी सोलापूरच्या मराठी भवनचे काम सुरू करण्यासाठी प्रयत्न करू असे आश्वासन दिले.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**सिग्नलिंगचे काम**

डीआरएम (एस अँड टी) कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, रेल्वेच्या ई-प्रोक्युअरमेंट वेबसाइट www.Ireps.gov.In वर खालील कामांसाठी सक्षम आणि नामांकित कंपन्या/ कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा आमंत्रित करत आहे: निविदा क्रमांक: SUR-N-T-2025-26-44, कामाचे नाव आणि ठिकाण: सोलापूर विभागातील ताजसुलतानपूर आणि धाराशिव स्थानकांवरील गुड्स शेडच्या विकासासंबंधित एस अँड टी कामे., कामाचा अंदाजे खर्च: रु. 79,64,927.18, निविदा अर्जाची किंमत: Nil, जमा करावयाची अनामत रक्कम: रु. 1,59,300/-, कामाचा पूर्णत्वाचा कालावधी: 12 महिने., निविदा बंद होण्याची तारीख व वेळ: 10.04.2026 रोजी 15:30 नंतर. तपशील आयरेप्स (Ireps) वेबसाइटवर उपलब्ध आहे. काही शुद्धिपत्रक/ दुरुस्त्या असल्यास, त्या फक्त वरील ई-प्रोक्योरमेंट वेबसाइटवर अपलोड केल्या जातील. फक्त ऑनलाइन निविदा स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/पोस्टल/ ई-मेल, फॅक्स, प्रत्यक्ष हाताने आणलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. निविदाकारांना विनंती आहे की त्यांनी कंपनीच्या नावासह वर्ग 3 डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र (Class III Digital Signature Certificate) मिळवावे आणि त्याची www.Ireps.gov.in वर नोंदणी करावी. बयाणा रक्कम (Earnest Money - EMD) नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे किंवा बँक गॅरंटीच्या स्वरूपात स्वीकारली जाईल आणि मूळ बँक गॅरंटी निविदा सादर करण्याच्या अंतिम तारखेपूर्वी (म्हणजे निविदा सादर करण्याची शेवटची तारीख वगळून) निविदा दस्तऐवजात नमूद केलेल्या नामनिर्देशित अधिकाऱ्याकडे व्यक्तिशः सुपूर्द करावी. अधिक तपशिलांसाठी कृपया www.Ireps.gov.in ला भेट द्या.

**विभागीय रेल्वे व्यवस्थापक,**
**मध्य रेल्वे, सोलापूर**
**DE/Sur-12**

सुरक्षित प्रवास करा,
फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**एटीव्हीएम सुविधादाते**

सूचना क्रमांक: SUR/C/Cog/ TVM/Facilitator/1/2025 दिनांक: 18.03.2026 वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक, सोलापूर विभाग, मध्य रेल्वे, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने सोलापूर विभागातील 13 स्थानकांवर एटीव्हीएम सुविधादात्यांच्या निवडीसाठी अर्ज आमंत्रित करत आहे. अधिक माहितीसाठी http://www.cr.Indlanrallways.gov.in या संकेतस्थळावर तपशील उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक कार्यालय, सोलापूर 413001 येथे संपर्क साधा. अर्ज करण्याची अंतिम तारीख 17.04.2026 रोजी दुपारी 3:00 वाजेपर्यंत आहे.

**वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक**
**DE/Sur-14** **मध्य रेल्वे, सोलापूर**

सुरक्षित प्रवास करा,
फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**सिग्नलिंगचे काम**

डीआरएम (एस अँड टी) कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, रेल्वेच्या ई-प्रोक्युअरमेंट वेबसाइट www.Ireps.gov.in वर खालील कामांसाठी सक्षम नामांकित कंपन्या/ कंत्राटदारांना ऑनलाइन ई-निविदा आमंत्रित करत आहे: निविदा क्रमांक: SUR-N-T-2025-26-46, कामाचे नाव आणि ठिकाण: मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात जिओग्रिड आणि जिओ-टेक्स्टाईल पद्धतीसह बीसीएम कामासंदर्भात सिग्नलिंगचे काम (टीएफटीआर आणि टीबीआर). कामाचा अंदाजे खर्च: रु. 82,68,713.84, निविदा अर्जाची किंमत: एनआयआय, जमा करावयाची अनामत रक्कम: रु. 1,65,400/- कामाचा पूर्णत्वाचा कालावधी: 12 महिने. निविदा बंद होण्याची तारीख व वेळ: 17.04.2026, 15:30 नंतर. तपशील आयआरईपीएस (ireps) वेबसाइटवर उपलब्ध आहे. काही शुद्धिपत्रक/दुरुस्त्या असल्यास, त्या केवळ वरील ई-प्रोक्युअरमेंट वेबसाइटवर अपलोड केल्या जातील. केवळ ऑनलाइन निविदा स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/पोस्टल/ई-मेल, फॅक्स, किंवा प्रत्यक्ष हाताने सादर केलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. निविदाकारांना विनंती आहे की, त्यांनी कंपनीच्या नावासह वर्ग 3 डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र (Class III Digital Signature Certificate) प्राप्त करावे आणि त्याची www. Ireps.gov.In वर नोंदणी करावी. ईएमडी (एचऊ) पेमेंट नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे किंवा बँक गॅरंटीच्या स्वरूपात स्वीकारले जाईल आणि मूळ बँक गॅरंटी निविदा सादर करण्याच्या अंतिम तारखेपूर्वी (म्हणजे निविदा सादर करण्याची शेवटची तारीख वगळून) निविदा दस्तऐवजात नमूद केलेल्या नामनिर्देशित अधिकाऱ्याकडे व्यक्तिशः सुपूर्द करावी. अधिक तपशिलासाठी कृपया www.Ireps.gov.in ला भेट द्या. डीई/सुर-१३

**विभागीय रेल्वे व्यवस्थापक,**
**DE/Sur-13** **मध्य रेल्वे, सोलापूर**


सुरक्षित प्रवास करा,
फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**अभियांत्रिकी कामे**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (बांधकाम), मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/ कंत्राटदारांकडून ई-निविदा आमंत्रित करत आहे. निविदा सूचना क्र.: 09-2026-SIDENS, कामाचे नाव: 1. एडीईएन/केएलबीजी उपविभागांतर्गत केएलबीजी-केयूआय सेक्शनमधील रेल्वे वसाहतींमध्ये पोहोच रस्त्याची तरतूद. 2. एडीईएन/केएलबीजी उपविभागांतर्गत वाडळ एमआर सेक्शनमधील रेल्वे वसाहतींमध्ये पोहोच रस्त्याची तरतूद. कामाचा अंदाजित खर्च: रु. 8,33,87,381.41, अनामत रक्कम: रु. 5,66,900/-, पूर्णता कामाचा कालावधी: 12 महिने, देखभाल कालावधी: 24 महिने, www. Ireps.gov.in वर उद्धृत निविदा अपलोड करण्याची अंतिम तारीख व वेळ: 10.04.2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत, www.Ireps.gov.In वर निविदा उघडण्याची तारीख व वेळ: 10.04.2026 रोजी 15:30 वाजता. इच्छुक निविदाकारांना सूचित करण्यात येते की, या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/दुरुस्त्या लक्षात घेण्यासाठी निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटला वारंवार भेट द्यावी. वेबसाइट www.Ireps.gov.in

**विभागीय रेल्वे व्यवस्थापक (बांधकाम)**
**DE/Sur-15** **मध्य रेल्वे, सोलापूर**

सुरक्षित प्रवास करा,
फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा.




**Classifieds**

**विकणे आहे**
2325 स्क्वे. फुट, गंगा नगर येथे, NA, क्लिअर टायटल, खुला प्लॉट विकणे आहे. जुना देगाव नाका, मंगळवेढा रोडटच, CNS हॉस्पिटलजवळ, सोलापूर-1, मो. 8975744539

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

**लवाद न्यायाधिकरण**
**(लवाद - ॲड. अजित एम. देशमुख, एम. ए. मराठी, एम.ए (एम.सी.जे). एम कॉम. एल.एल.बी)**
**एकल लवाद न्यायालय.**
**लोकमंगल मल्टीस्टेट को-ऑप. सोसायटी लि. सोलापूर**
**प्लॉट नं. ९४/६६, मित्रनगर, रब्बी रिसर्च सेंटरचे मागे, शेळगी, सोलापूर -४१३००६**
**जाहिर प्रकटन जिल्हा सोलापूर**

या जाहिर नोटीसीने खाली दिलेल्या सामनेवाले यांना कळविण्यात येते की, दावेदार लोकमंगल मल्टीस्टेट को-ऑप. सोसायटी लि. सोलापूर या संस्थेने खाली नमुद कर्जदार, जामीनदारांविरुध्द थकीत कर्जाची रक्कम वसुली अवार्ड मिळणेकामी लवाद न्यायालयाकडे दावे दाखल केले असून, कर्जदार सचिन सुरेश पांढरे मयत झाले असून त्यांच्या वारसांना म्हणणे मांडण्याचे संधी देण्यासाठी दि. १८ एप्रिल २०२६ रोजी तारीख नेमण्यात आली असून नमूद तारखेस मयताच्या वारसांनी स्वतः अगर वकीलांमार्फत हजर राहून म्हणणे मांडावे अन्यथा वारसांचे काहीही म्हणणे नाही असे ग्रहीत धरून लवाद पारीत करण्यात येईल. लवाद न्यायालयाने दि. २५ जानेवारी २०२६ रोजी मयत कर्जदार यांचे वारसांना प्रकरणात समाविष्ट करण्याचे आदेश पारीत केलेले आहे.
न्यायाच्या दृष्टीने संबंधीत मयत कर्जदार यांचे वारसांना योग्य संधी देऊन न्याय निवाडा करणेकामी हि जाहिर नोटिस प्रसिध्दीस दिली आहे. खालील नमूद वारसांना व्यतीरिक्त कोणीही मयताचे वारस असल्यास त्यांनी देखील नमूद तारखेस हजर राहून स्वतः अगर वकीलांमार्फत म्हणणे मांडावे. अन्यथा खालील वारसांव्यतीरिक्त कोणीही वारस नाहीत असे गृहीत धरण्यात येईल. खालील नमूद सामनेवाले यांनी दि. १८/०४/२०२६ रोजी वर नमूद पत्यावर लवाद न्यायालयासमोर उपस्थित राहून लेखी म्हणणे न मांडल्यास एकतर्फी न्यायनिवडा करण्याचे सुचित करत आहे.

| अ. क्र. | लवाद दावा क्र व दिनांक | नाव | नाते | शाखा | पत्ता |
|---|---|---|---|---|---|
| १ | लवाद दावा क्र. ५७/२०२३ | सचिन सुरेश पांढरे (मयत) | कर्जदार | शेळगी | रा.मु.पो. प्लॉट नं. ११८३, संजय नगर अण्णासाहेब पाटील प्रशाला शेजारी लिमयेवाडी, सोलापूर-४१३२१५ |
| | | राहाबाई रामचंद्र पांढरे | मयताचे आई | शेळगी | रा.मु.पो. प्लॉट नं. ११८३, संजय नगर अण्णासाहेब पाटील प्रशाला शेजारी लिमयेवाडी, सोलापूर-४१३२१५ |
| | | युवराज सुरेश पांढरे | मयताचे भाऊ | शेळगी | रा.मु.पो. प्लॉट नं. ११८३, संजय नगर अण्णासाहेब पाटील प्रशाला शेजारी लिमयेवाडी, सोलापूर-४१३२१५ |
| | | देवीदास सुरेश पांढरे | मयताचे भाऊ | शेळगी | रा.मु.पो. प्लॉट नं. ११८३, संजय नगर, वांगी रोड लिमयेवाडी, सोलापूर-४१३२१५ |
| | | सुधाकर सुरेश पांढरे | मयताचे भाऊ | शेळगी | रा.मु.पो. प्लॉट नं. ११८३, संजय नगर, वांगी रोड लिमयेवाडी, सोलापूर-४१३१५ |

येणे प्रमाणे जाहिरनोटिस प्रसिध्द केली. ता. २०/०३/२०२६

**सही**
**लवाद अधिकारी**
**ॲड. अजित एम. देशमुख, एम. ए. मराठी, एम.ए (एम.सी. जे) एम कॉम. एल.एल.बी**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### आयपीएलसाठी श्रीलंकेच्या खेळाडूंची तंदुरुस्ती चाचणी

**कोलंबो** : श्रीलंकेचे खेळाडू २०२६ च्या इंडियन प्रीमियर लीगमध्ये सहभागी होण्यास पात्र ठरण्यासाठी, त्यांना अनिवार्य शारीरिक कामगिरी चाचण्या पूर्ण करणे आवश्यक असेल, असे श्रीलंकेच्या क्रिकेट मंडळाने शुक्रवारी स्पष्ट केले. पाथुम निसंका, कामिंदू मेंडिस आणि दुष्मंथा चामिराला त्यांचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. तर, वानिंदू हसरंगा, मथिशा पथिराना, नुवान तुषारा आणि ईशान मलिंगा हे खेळाडू त्यांच्या तंदुरुस्ती चाचण्या यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर - बहुधा येत्या आठवड्यातच - आपापल्या फ्रेन्चायझींमध्ये सहभागी होतील. शारीरिक कामगिरी चाचण्यांचे आवश्यक निकष यशस्वीरित्या पूर्ण करतील अशाच खेळाडूंना सध्या सुरू असलेल्या देशांतर्गत स्पर्धेत खेळण्यास परवानगी दिली जाईल; तसेच त्यांना आयपीएल २०२६ मध्ये सहभागी होण्यासाठी देखील मंजूर केली जाईल. त्यानुसार चाचण्या यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या दुष्मंथा चमीरा, पाथुम निसंका व कामिंदू मेंडिसला परवानगी देण्यात आली आहे. नुवान तुषाराचाही प्रवेश त्याच्या शारीरिक तंदुरुस्ती चाचणीच्या निकालावर अवलंबून असेल.चामिरा व निसंका आता दिल्ली कॅपिटल्स संघात सहभागी होतील, तर मेंडिस सनरायझर्स हैदराबाद संघात दाखल होईल. कोलकाता नाईट रायडर्स संघाकडून खेळणारा पथिराना सध्या संघाबाहेर आहे,

### सीएसकेचा नॅथन एलिस आयपीएलमधून बाहेर

**चेन्नई** : पाच वेळा विजेते ठरलेल्या चेन्नई सुपर किंग्सला (सीएसके) इंडियन प्रीमियर लीगच्या १९ व्या हंगामाच्या सुरुवातीच्या अवघ्या एका आठवड्यापूर्वीच मोठा धक्का बसला आहे. त्यांचा प्रमुख गोलंदाज नॅथन एलिस हा पायाच्या दुखापतीमुळे संपूर्ण स्पर्धेतून बाहेर झाला आहे. या ऑस्ट्रेलियन वेगवान गोलंदाजाच्या स्पर्धेबाहेर पडल्याच्या वृत्ताला फ्रेन्चायझीने शुक्रवारी समाज माध्यमावरील एका पोस्टद्वारे दुजोरा दिला. दुखापतीमुळे नॅथन एलिस या आयपीएल हंगामातून बाहेर झाला आहे. तो लवकरात लवकर बरा होवो, अशी आम्ही सदिच्छा व्यक्त करतो, असे सीएसकेने ट्विटरवर लिहिले आहे. एलिसने पंजाब किंग्ससोबत चार हंगाम घालवल्यानंतर त्याला सीएसकेने २०२५ च्या लिलावात २ कोटी रुपयांना विकत घेतले होते आणि २०२६ च्या हंगामासाठी त्याला संघात कायम ठेवले होते.

### कझाकस्तानचा हॉकी संघ भारतात दाखल


**नवी दिल्ली** : आगामी आशियाड क्रीडा स्पर्धेच्या पात्रता फेरी २०२६ च्या तयारीचा एक भाग म्हणून, कझाकस्तानचा वरिष्ठ पुरुष हॉकी संघ सध्या भारतात दाखल झाला आहे. १० ते २१ मार्च या कालावधीत हरयाणातील सोनीपत येथील भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या (साई) उत्तर प्रादेशिक केंद्रामध्ये आयोजित एका उच्च-कार्यक्षमता प्रशिक्षण शिबिरासाठी हा संघ भारतात आला आहे. हे शिबिर जागतिक दर्जाचे कृत्रिम मैदान, प्रगत शारीरिक तंदुरुस्ती सुविधा आणि अत्यंत स्पर्धात्मक वातावरण उपलब्ध करून देते. यामुळे कझाकस्तान संघाला एका महत्त्वपूर्ण आंतरखंडीय स्पर्धेपूर्वी आपल्या तयारीला अंतिम स्वरूप देण्यासाठी एक आदर्श व्यासपीठ लाभले आहे. भारताला क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्टतेचे जागतिक केंद्र म्हणून प्रस्थापित करणे, हे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे.

### स्नूकरपटू रॉनी ओसुलिव्हनने घडविला इतिहास

**नवी दिल्ली** : सात वेळा विश्वविजेता ठरलेल्या दिग्गज स्नूकरपटू रॉनी ओसुलिव्हनने शुक्रवारी चीनमधील वर्ल्ड ओपन स्नूकर स्पर्धेत १५३ गुणांचा आतापर्यंतचा सर्वोच्च ब्रेक नोंदवून व्यावसायिक स्नूकरमध्ये इतिहास रचला. ५० वर्षीय इंग्लिश खेळाडूने वेल्सच्या रायन डे विरुद्ध हा पराक्रम केला आणि युशान येथे ५-० अशा एकतर्फी विजयासह उपांत्य फेरीतील आपले स्थान निश्चित केले.

# पृथ्वीराज मोहोळची धीरजवर विजय

## महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा, वाघोली ● गडचिरोलीच्या विक्रमसिंह भोसलेने नाशिकच्या बाळू बोडखेला धूळ चारली



धीरज बारस्करला पराभूत करताना पृथ्वीराज मोहोळ

◆ **वाघोली, पुणे, २० मार्च**

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या मान्यतेने व रामकृष्ण अण्णासातव पाटील कर्तव्य फाऊंडेशन आयोजित ६८ व्या महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद आणि महाराष्ट्र केसरी किताब कुस्ती स्पर्धेत वाघोली, पुणे येथील स्व. अजितदादा पवार क्रीडा नगरीत महाराष्ट्र केसरी गटाच्या गादी विभागात सायंकाळच्या सत्रात खेळल्या गेलेल्या दुसऱ्या फेरीच्या लढतीत पुणे अ संघाच्या पृथ्वीराज मोहोळने धाराशिवच्या धीरज बारस्करला १२-२ अशा दहा गुणांच्या फरकाने चीत करून पुढील फेरीत विजय मिळविला. तसेच नांदेडच्या शिवराज राक्षे, कोल्हापूरच्या पृथ्वीराज पाटील, नाशिकच्या हर्षवर्धन सदगीरने गादी विभागातील दुसऱ्या फेरीच्या लढती जिंकल्या, तर केसरी गटाच्या माती विभागात गडचिरोलीच्या विक्रमसिंह भोसलेने नाशिकच्या बाळू बोडखेचा ४-१ ने पराभव करून तिसऱ्या फेरीत प्रवेश केला. हिंगोलीच्या सिकंदर शेखनेही पुण्याच्या मनीष रायतेवर ८-२ ने विजय नोंदविला.

राक्षेने पुणे शहराच्या श्रेयस होळकरवर १०-० ने, पृथ्वीराज पाटीलने सांगलीच्या सत्पाल शिंदेवर १०-० ने, तर हर्षवर्धनने अमरावतीच्या वेताळ शेळकेवर ८-१ अशा गुणांनी मात केली.

**पुण्याच्या अमोल वालगुडेला सुवर्ण**

६१ किलो वजनी गटातील माती विभागाच्या उपांत्य फेरीत (सेमीफायनल) कोल्हापूरच्या अजय कापडे याने साताऱ्याच्या गोरख कोळेकरचा १० -० तर पुण्याच्या अमोल वालगुडे याने पुणे शहराच्या अमित कुळालचा ११-० अशा गुणाधिक्याने पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम फेरीत पुणे जिल्ह्याचा व मागील दोन स्पर्धांमध्ये सुवर्णपदकांवर आपली मोहोर उमटवणाऱ्या अमोल वालगुडे हा पहिल्या फेरीत ७-२ (पाच) गुणांनी पिछाडीवर पडला होता. मात्र दुसऱ्या फेरीत अमोलने बचावात्मक आक्रमक पवित्रा घेत गुणांची कमाई करीत विजय मिळविल व तिसऱ्या सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. तर कोल्हापूरच्या राष्ट्रीय कुस्तीगीर अजय कापडेला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. तसेच कांस्यपदकासाठी झालेल्या लढतीत साताऱ्याच्या गोरख कोळेकर याने पुणे शहराच्या अमित कुलालवर ४-२ अशी मात करत कांस्यपदक जिंकले.

**बिरुदेव बनसोडेने जिंकले सुवर्णपदक**

७९ किलो वजनी गटातील माती विभागाच्या उपांत्य फेरीत (सेमीफायनल) बीडच्या अविनाश शिंदे याने सोलापूरच्या प्रणव हांडेचा १२-२ तर दुसरी उपांत्य फेरी सोलापूरचा बिरुदेव बनसोडे आणि पुण्याचा अनिल कचरे यांच्यात झाली. अत्यंत चुरशीची लढत सुरू असताना लढतीच्या दुसऱ्या फेरीत अनिल कचरेच्या उजव्या हाताला गंभीर दुखापत झाल्याने त्याला लढतीतून माघार घ्यावी लागली. अन्‌ बिरुदेव बनसोडेचा अंतिम फेरीचा मार्ग सुकर झाला.

अंतिम लढत सोलापूर शहराच्या बिरूदेव बनसोडे आणि बीडच्या अविनाश शिंदे यांच्या अत्यंत चुरशीची व उत्कंठावर्धक झाली.

यामध्ये निर्णायक लढतीत दोघांनेही ५-५ असे समान गुण घेतले.परंतु अशा स्थितीत शेवटचा गुण घेणारा बिरुदेव बनसोडे याने सुवर्णपदक जिंकले. तर पुण्याचा अनिल कचरे हा सेमीफायनलमध्ये गंभीर जखमी झालेल्यामुळे कांस्यपदकाच्या लढतीसाठी गैरहजर राहिल्याने सोलापूरच्या प्रणव हांडे कांस्यपदकाचा मानकरी ठरला.

**वैभवला सुवर्ण, विवेकला रौप्य**

६१ किलो वजनी गटातील गादी विभागाच्या उपांत्य फेरीत कोल्हापूरच्या विवेक धावडे याने धुळ्याच्या महेश चौधरीचा १०-० तर कोल्हापूर शहरच्या वैभव पाटील याने पुण्याच्या वेंकटेश देशमुखचा ११-० अशा गुणाधिक्याने पराभव करून अंतिम फेरीत धडक मारत पदक निश्चित केले. अंतिम फेरीत कोल्हापूर शहराच्या वैभव पाटील याने कोल्हापूर जिल्ह्याच्या विवेक धावडेवर ११-१ अशी मात करत सुवर्णपदकावर आपली मोहोर उमटवली तर विवेक रौप्यपदकाचा मानकरी ठरला. तर कांस्यपदकासाठी झालेल्या लढतीत सांगलीच्या पांडुरंग मानेने धुळ्याच्या महेश चौधरीचा ६-१ तर दुसऱ्या कांस्यपदकाच्या लढतीत साताऱ्याच्या अरु खांडेकरने पुण्याच्या व्यंकटेश बनकरचा पराभव करून कांस्यपदक जिंकले

**सोलापूरचा विकास करे सुवर्णपदकाचा मानकरी**

७९ किलो वजनी गटातील गादी विभागाच्या उपांत्य फेरीत सोलापूरच्या विकास करे याने कोल्हापूरच्या नितीन चव्हाणचा तर ठाण्याच्या सुरज मानेने सोलापूरच्या गोपीनाथ सुतारचा ८-४ अशा गुणाधिक्याने पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला अंतिम फेरीत सोलापूरच्या विकास करे याने ठाण्याच्या सुरज मानेचा १०-० अशा गुणाधिक्याने पराभव करून सुवर्णपदक जिंकले, तर सुरजला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले.

कांस्यपदकासाठी झालेल्या लढतीत कोल्हापूर शहराच्या पृथ्वीराज बोडके याने सोलापूर शहराच्या गोपीनाथ सुतारचा १३-२ असा पराभव करून कांस्यपदक जिंकले तर पुण्याच्या निखिल वाडेकर याने कोल्हापूरच्या नितीन चव्हाणचा १०-६ अशा गुणाधिक्याने पराभव कांस्यपदक पटकावले ◂(तभा वृत्तसेवा)

# नदालनंतर एटीपी १००० सामना जिंकणारा सर्वांत तरुण खेळाडू मोईस कुआमे

◆ **मियामी, २० मार्च**

फ्रान्सचा मोईस कुआमे हा २००९ किंवा त्यानंतर जन्मलेला, एटीपी १००० सामना जिंकणारा



पहिला खेळाडू ठरला आहे. कुआमे हा मियामी स्पर्धेतील सामना जिंकणारा सर्वात तरुण खेळाडू देखील आहे.

आपला आदर्श असलेल्या नोवाक जोकोविचने समाज माध्यमाद्वारे त्याचे अभिनंदन केले, तेव्हा हा १७ वर्षीय खेळाडू भारावून गेला.

मला आता मोठ्या स्तरावरील टेनिस वातावरणाची सवय खूप लवकर करून घ्यावी लागेल, असे फ्रान्सचा व ईल्डकार्डधारी टेनिसपटू मोईस मोईस म्हणाला.

मियामी ओपनमध्ये झॅकरी स्वाज्दाचा पराभव करून, २००३ मधील राफेल नदालनंतर एटीपी १००० सामना जिंकणारा सर्वात तरुण खेळाडू होण्याचा मान या १७ वर्षीय खेळाडूने मिळविला.

अमेरिकन पात्रता फेरीतील खेळाडू स्वाज्दावर कुआमेने मिळवलेला ५-७, ६-४, ६-४ असा पहिल्या फेरीतील विजय, त्याला २००९ किंवा त्यानंतर जन्मलेला व एटीपी १००० सामना जिंकणारा पहिला खेळाडू करणारा ठरला तसेच तो मियामी स्पर्धेतील सामना जिंकणारा सर्वात तरुण खेळाडूही झाला.


मियामीमध्ये एटीपी १००० स्पर्धेतील माझी ही पहिलीच मुख्य फेरी आहे. हे ठिकाण खूपच छान आहे. आजचा सामना जिंकल्यामुळे मला खूप आनंद झाला आहे व मी असेच आणखी अनेक सामने जिंकेन, असे तो म्हणाला.

या विजयामुळे माझा आत्मविश्वास खूप वाढला आहे. यावरून मला हे समजते की, मी योग्य मार्गावर आहे. मला केवळ माझे काम सातत्याने सुरू ठेवण्याची गरज आहे, असे तो म्हणाला. ◂(वृत्तसंस्था)

# चार ऑस्ट्रेलियन वेगवान गोलंदाज यंदा आयपीएल नाही खेळणार

मेलबर्न : पॅट कमिन्स, मिचेल स्टार्क व जोश हेझलवुडसह चार प्रमुख ऑस्ट्रेलियन वेगवान गोलंदाज या महिन्याच्या अखेरीस सुरू होणाऱ्या आगामी इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) हंगामाच्या सुरुवातीच्या टप्प्याला मुकणार आहेत. यामुळे त्यांच्या संबंधित संघांना (फ्रॅन्चायझींना) स्पर्धेच्या सुरुवातीलाच मोठा धक्का बसला आहे. स्टार्क, कमिन्स आणि हेझलवुड हे किमान आयपीएलच्या सुरुवातीच्या सामन्यांना मुकतील, तर नॅथन एलिस हा संपूर्ण स्पर्धेतूनच बाहेर पडण्याची शक्यता आहे.

क्रिकेट ऑस्ट्रेलिया (सीए) आपल्या वेगवान गोलंदाजांच्या बाबतीत सावध पवित्रा घेत आहे. याचे कारण म्हणजे ऑगस्टपासून सुरू होणारे त्यांचे अत्यंत व्यस्त वेळापत्रक



आहे, यात १२ महिन्यांच्या कालावधीत २१ कसोटी सामन्यांचा समावेश आहे. २०२७ मध्ये एकदिवसीय विश्वचषकाचे विजेतेपद राखण्यापूर्वी, ऑस्ट्रेलिया संघ दक्षिण आफ्रिका, भारत आणि इंग्लंडचा दौरा करणार आहे. या तिन्ही गोलंदाजांची उपलब्धता ही, पुढील काही आठवड्यांत खेळाकडे परतण्याच्या प्रक्रियेत ते किती प्रगती करतात, यावर अवलंबून असेल, असे या अहवालात म्हटले आहे. कसोटी कर्णधार कमिन्सला पाठीच्या दुखापतीमुळे गत उन्हाळ्यात केवळ एकाच कसोटी सामन्यात खेळता आले होते, तर हेझलवुडला हॅमस्ट्रिंगच्या दुखापतींमुळे संपूर्ण कसोटी मालिकेला मुकावे लागले होते. या दोन्ही खेळाडूंना टी-२० विश्वचषकातही खेळता आले नव्हते. स्टार्कने ॲशेस मालिकेतील सर्व पाच कसोटी सामने आणि बिग बॅश लीगचे अखेरचे सामने खेळले होते; मात्र टी-२० विश्वचषकात तो खेळला नाही, कारण त्याने या प्रकारच्या क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. आयपीएलसाठी कमिन्स व हेझलवुड यांची उपलब्धता हा पूर्णपणे ‘वेळेचा प्रश्न‘ आहे, असे टोनी डोडेमाइड यांनी सांगितले.

# न्यूझीलंडचा आफ्रिकेवर ८ गड्यांनी विजय

**ऑकलंड, २० मार्च-**

टॉम लॅथमने नाबाद ६३ धावांची खेळी व त्याने डेव्हॉन कॉनवेसोबत पहिल्या गड्यासाठी केलेल्या ९६ धावांच्या भागीदारीच्या जोरावर न्यूझीलंडने शुक्रवारी झालेल्या तिसऱ्या टी-२० सामन्यात २२ चेंडू शिल्लक ठेवित दक्षिण आफ्रिकेवर ८ गड्यांनी दणदणीत विजय नोंदविला. प्रथम फलंदाजी करणाऱ्या दक्षिण आफ्रिकेला ९ बाद १३६ धावांवर रोखल्यानंतर न्यूझीलंडने १६.२ षटकांत २ बाद १३७ धावा काढून आपला विजय साकार केला.



न्यूझीलंडचा सलामीवीर वियान मुलरच्या रुपाने एकमेव महत्त्वपूर्ण बळी मिळविणारा लॉकी फर्ग्युसन सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला. न्यूझीलंडला विजय मिळवून देताना कॉनवेने ३९ धावा केल्या, तर लॅथमने आपल्या टी-२० कारकिर्दीतील चौथे अर्धशतक पूर्ण केले. या विजयाबरोबरच न्यूझीलंडने पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली. आता चौथा सामना रविवारी वेलिंग्टन येथे होणार आहे.

या मालिकेतील फलंदाजीसाठीची परिस्थिती आव्हानात्मक राहिली व सामने कमी धावांचे ठरले आहेत. दक्षिण आफ्रिकेने पहिल्या सामन्यात न्यूझीलंडच्या ९१ धावांचा पाठलाग करत सात गड्यांनी विजय मिळवला होता, तर न्यूझीलंड संघाने दुसऱ्या सामन्यात प्रतिस्पर्ध्यांना १०७ धावांवर गुंडाळत ६८ धावांनी विजय नोंदविला होता. दक्षिण आफ्रिकेला झटपट गुंडाळताना न्यूझीलंडने सहा गोलंदाजांचा वापर केला आणि त्या सहाही गोलंदाजांनी बळी टिपलेत. यात फिरकी गोलंदाजांचाही समावेश होता. वेगवान गोलंदाज लॉकी फर्ग्युसनने चार षटकांत ९ धावा देऊन १ बळी घेतला

# श्री सिध्देश्वर वूमेन्स पॉलिटेक्निकची १८ पदकांची कमाई

## जिल्हा व राज्य स्पर्धेतील कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मार्च-**

जिल्हा व महाराष्ट्र राज्य IEDSS यांच्या वतीने झालेल्या क्रीडा स्पर्धांत येथील श्री सिद्धेश्वर वूमेन्स पॉलिटेक्निकच्या खेळाडूंनी १८ पदके व पारितोषिके मिळवली आहेत. या स्पर्धांमध्ये बास्केटबॉल, कबड्डी, खो-खो, बॅडमिंटन, टेबल टेनिस, कॅरम, चेस तसेच ॲथलेटिक्समध्ये १०० व २०० मीटर धावणे, ४ बाय १०० मीटर रिले, गोळाफेक, भालाफेक व थाळीफेक अशा विविध स्पर्धांमध्ये ६२ विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला.




त्यापैकी अनेक विद्यार्थिनींनी पदके मिळवून आपली क्रीडाप्रतिभा सिद्ध केली. त्यांना प्रा. शितल सावळगी, प्रा. संग्राम माने, प्रा. रविकिरण पतंगे, प्रा. वैदेही देशपांडे, श्रीशेल शिळे, ऐश्वर्या व्हनमाने यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष धर्मराज काडादी यांनी विद्यार्थिनींचे कौतुक करत त्यांना शुभेच्छा दिल्या. प्राचार्य गजानन धरणे, गव्हर्निंग बॉडीचे सदस्य आर. एस. पाटील, सी.बी. नाडगौडा, मल्लिनाथ मसरे व काशिनाथ ढोले यांनीही विजेत्या विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.

# हमाली ते जागतिक विक्रमवीर

## अश्विन कडलासकर



**सोलापूरच्या मातीतील एक असा नायक, ज्याने नियतीच्या आव्हानांनाच आपल्या पराक्रमाने उत्तर दिलं. आज शनिवार २१ मार्च रोजी आपला ३८ वा वाढदिवस साजरा करत असलेल्या अश्विनजींच्या, हमाली ते ६ जागतिक विक्रमांपर्यंतच्या प्रवासाचा हा विशेष आढावा...**



ज्या वयात खेळण्या-बागडण्याचे दिवस असतात, त्याच कोवळ्या वयात अश्विन यांच्या डोक्यावरून आई-वडिलांचे छत्र हिरावले गेले. सोलापूरच्या मार्केट यार्डात पाठीवर ओझं वाहताना, त्यांनी केवळ पोती वाहिली नाहीत, तर आपल्या स्वप्नांचं ओझंही तितक्याच ताकदीने पेललं. पहाटे ४ पासून थंडीत पेपर टाकणं, दूध विक्री करणं आणि रिक्षा चालवणं... या प्रत्येक कष्टाने अश्विनजींना पोलादासारखं घडवलं.

**मार्शल आर्ट्समध्ये प्राविण्य आणि शिवविचार**

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत बी.ए. शिक्षण पूर्ण करत त्यांनी कराटे आणि कुंग फू मध्ये ब्लॅक बेल्ट मिळवला. शिवचरित्र आणि ऐतिहासिक कादंबऱ्यांच्या वाचनातून त्यांनी छत्रपती शिवरायांचा विचार आत्मसात केला, ज्यामुळे आज ते एक प्रभावी शिवव्याख्याता म्हणूनही परिचित आहेत.

**दांडपट्ट्याला जागतिक ओळख मिळवून देणारा द्रोणाचार्य**

अश्विनजींनी ट्रॅडिशनल दांडपट्टा स्पोर्ट्स असोसिएशन, महाराष्ट्रची स्थापना करून या पारंपरिक खेळाला संघटित स्वरूप दिले. त्यांच्या या प्रयत्नांमुळेच आज हा खेळ महाराष्ट्रातील १४ जिल्हे, ४ राज्ये आणि २ देशांपर्यंत पोहोचला आहे. दांडपट्टा या खेळाला शालेय क्रीडा स्पर्धेत स्थान मिळावे, यासाठी त्यांनी १ लाख स्वाक्षऱ्यांची मोहीम राबवून उपोषणही केले.

**सुरक्षित माझी बहीण : एक सामाजिक बांधिलकी**

केवळ खेळच नाही, तर सामाजिक ऋणांची जाणीव ठेवत त्यांनी स्व. प्रेमाई स्मृती लोककल्याण प्रतिष्ठानच्या माध्यमातून मोठे कार्य उभे केले आहे. सुरक्षित माझी बहीण या संकल्पनेतून त्यांनी आजवर तब्बल ३५०० महिला आणि युवतींना मोफत दांडपट्टा, लाठी आणि कराटेचे स्वसंरक्षण प्रशिक्षण दिले आहे.

परिस्थिती माणसाला हरवू शकत नाही, जर मनात जिद्द आणि पाठीशी छत्रपतींचे विचार असतील, हेच अश्विन कडलासकर यांनी सिद्ध केलं आहे. हमाली ते ६ जागतिक विक्रमवीर असा त्यांचा हा प्रवास आजच्या तरुणाईसाठी दीपस्तंभासारखा आहे.

अशा या जिद्दीच्या महामेरूला ३८व्या वाढदिवसाच्या निमित्ताने लक्ष-लक्ष शुभेच्छा! हा योद्धा असाच यशाची नवनवीन शिखरे सर करत राहो, हीच सदिच्छा!

**अजितकुमार संगवे**
वृत्तसंपादक
मो. ९८८११३३१०३

### कर्तृत्वाचा गौरव, मिळालेले प्रमुख पुरस्कार

| | |
|---|---|
| युवा विश्वविक्रमवीर | दैनिक सकाळ. |
| राज्य भूषण | शिवशाही न्यूज नेटवर्क, पंढरपूर. |
| उत्कृष्ट खेलरत्न प्रशिक्षक | पीपल्स ऑलिम्पिक स्पोर्ट असोसिएशन. |
| उत्कृष्ट दांडपट्टा क्रीडा प्रशिक्षक | महादेव कोळी समाज. |
| उत्कृष्ट शिवकालीन युद्धकला - प्रशिक्षक | लाल आखाडा जोशी समाज तालीम संघ. |

### विश्वविक्रमांचा दैदीप्यमान डोंगर

| | |
|---|---|
| २००५ | ५९० ट्यूबलाईट अंगावर फोडून घेण्याचा थरारक विक्रम. |
| २००६ | ७५० मोटारसायकल्स पोटावरून नेण्याचा अविश्वसनीय विक्रम. |
| १५ ऑगस्ट २०२२ | ७५ व्या अमृत महोत्सवी स्वातंत्र दिनाच्या निमित्ताने सलग ७५ मिनिटे एका हाताने लाठी चालविली. |
| ७ ऑक्टोबर २०२२ | महाराष्ट्रातील सर्वात उंच कळसुबाई शिखर ज्याला महाराष्ट्रातील एव्हरेस्टसुद्धा म्हटले जाते. या शिखरावर शिवकालीन युद्ध कला याचे प्रात्यक्षिक करत भारताचा अभिमान असलेला तिरंगा ध्वज फडकविला. |
| २०२३ | सलग ५ तास, ५ मिनिटे, ५ सेकंद तलवारबाजीचा विश्वविक्रम. |
| २०२५ | शिवजयंती निमित्त सलग १९ तास, १९ मिनिटे, १९ सेकंद दांडपट्टा चालवून रचलेला जागतिक इतिहास. |

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### कुसमोड येथील जि.प. प्राथमिक शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी धायगुडे

**पिलीव दि २० मार्च-**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शाळा व्यवस्थापन समीतीच्या अध्यक्षपदी विजय शरद धायगुडे यांची निवड झाली. उपाध्यक्षपदी अमोल वाघमारे, स्थानिक ग्रामपंचायत प्रतिनिधी पुरुषोत्तम धायगुडे, सदस्य म्हणून संदीप कबाडे, शिक्षणतज्ज्ञ पोपट कचरे, सदस्या म्हणून शोभा व्होनमाने, आशा धायगुडे, अनिता सातपुते, अमृता चौगुले, आश्विनी डोंबे, सचिव शकील तांबोळी, शिक्षक प्रतिनिधी गणेश देशमुख यांच्या बिनविरोध निवडी करण्यात आल्या. यावेळी माजी सरपंच तुषार लवटे, हनुमंत धायगुडे, विश्वास धायगुडे, देवानंद चौगुले, राजाराम शिंदे, सुजित गुरव, सतीश व्होनमाने, जयश्री गुरव यांच्यासह आदी उपस्थित होते. निवडीनंतर सर्वांचा सन्मान करण्यात आला.

### पिलीव परिसरात गुढीपाडवा सण मोठ्या उत्साहात

**पिलीव दि २० मार्च -**

पिलीव परिसरात मराठी नवीन वर्षांचा गुढीपाडवा हा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. पारंपरिक पद्धतीने सकाळी लवकरच घरासमोर गुढी उभा करण्यात आली. या गुढीला नवीन साडी, हार, लावुन गुढी उभारण्यात आली. सकाळी पिलीव येथे दरवर्षी प्रमाणे पाढवा वाचन करण्यात आले. यासाठी लोकांनी म ोठी गर्दी केली होती. शिखर शिंगणापुरला जाण्यासाठी कावडी सज्ज झाल्या असुन संध्याकाळी पिलीव येथील दोन्ही कावडयांनी वाजत गाजत खडीचा महादेव, हनुमान, विठ्ठल रुकमीणी, गावातील सर्वच देवांना कावडी खेळत धार घालण्यात आली. गुढीपाडवा सणासाठी आवश्यक असणारे हार व किराणा मालाच्या दुकानात गेली दोन दिवस खरेदीसाठी चांगली गर्दी दिसुन आली. पिलीवसह, झिंजेवस्ती, कुसमोड, सुळेवाडी, बचेरी, शिंगोर्णी या सर्व गावात गुढीपाडवा सण मोठ्या उत्साहात व पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. सोशल मिडीयावरून एकमेकांना शुभेच्छांचा अक्षरश वर्षाव करण्यात आला.

### बार्शीत अल्पवयीन मुलावर हल्ला

**बार्शी, दि. २० मार्च-**

शहरातील देशमुख प्लॉट परिसरात खेळताना झालेल्या किरकोळ वादातून एका अल्पवयीन मुलावर तलवारीने हल्ला केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेत १७ वर्षीय मुलगा गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. बुधवारी सायंकाळी साडेचारच्या सुमारास गफूर मस्जिदच्या पाठीमागील देशमुख प्लॉट परिसरात काही मुले खेळत होती. त्यावेळी खेळताना चुकून एका मुलाकडून दगड शेजारील घराच्या गेटला लागला. यावरुन गैरसमज होऊन संबंधित घरातील अयान लतीफ पटेल व त्याचे कुटुंबीय बाहेर आले. दगड आपणच मारल्याचा संशय घेत अयान पटेल व त्याची आई मुन्नी पटेल यांनी संबंधित अल्पवयीन मुलास शिवीगाळ करत मारहाण केली. अयान पटेल याने लाकडी दांडक्याने मारहाण करण्याचा प्रयत्न केला, त्यात एका मित्राच्या डोक्याला दुखापत झाली. त्यानंतर अयान पटेल हा घरातून तलवार घेऊन आला व त्याने संबंधित मुलाच्या हातावर वार करत त्याला जखमी केले. या घटनेत मुलाच्या डाव्या मनगटावर व उजव्या हाताच्या पंजाजवळ गंभीर जखमा झाल्या. घटनेदरम्यान परिसरातील नागरिक व जखमी मुलाची आई यांनी मध्यस्थी करत भांडण सोडवले. जखमी मुलाला तत्काळ ग्रामीण रुग्णालय, बार्शी येथे दाखल करण्यात आले. पुढील उपचारासाठी जगदाळे मामा हॉस्पिटल येथे हलविण्यात आले असून सध्या त्याच्यावर उपचार सुरु आहेत. या प्रकरणी जखमी मुलाने अयान लतीफ पटेल, मुन्नी लतीफ पटेल व लतिफ पटेल यांच्याविरोधात तक्रार दिली आहे.

### अवैध दारू विक्रीवर पोलिसांचा छापा; १४ हजरांचा मुद्देमाल जप्त

**टेंभुर्णी, दि. २० मार्च-**

टेंभुर्णी पोलिसांनी अवैध दारूविक्रीविरोधात मोठी कारवाई करत यशश्री हॉटेलवर छापा टाकून देशी व विदेशी दारूचा साठा जप्त केला असून हॉटेल मालकाला ताब्यात घेतले आहे. टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी तथा परि.सहा.पोलीस अधीक्षक (भा.पो.से) राहुल आत्राम यांना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, टेंभुर्णी येथील पुणे-सोलापूर महामार्गालगत आकुंबे परिसरातील यशश्री हॉटेल येथे विनापरवाना देशी व विदेशी दारू साठवून विक्री केली जात आहे. या माहितीच्या आधारे पोलिसांनी नियोजनबद्ध सापळा रचून आज सायंकाळी सुमारे ६.३० वाजता छापा टाकला. छाप्यात हॉटेलच्या परिसरात व पाठीमागील बाजूस औदुंबर सावळा करंडे (वय ५१, रा. आकुंबे, ता. माढा) यांच्या ताब्यात विविध कंपनीच्या देशी व विदेशी दारूच्या बाटल्या आढळून आल्या. यामध्ये मॅकडॉल नंबर वन, इम्पेरियल ब्लू, आयकॉन व्हाईट, ग्रँड मास्टर मँगो, टू बर्ग बिअर, रॉयल स्टॅग, तसेच देशी दारूचे विविध प्रकार अशा एकूण १०९ बाटल्या जप्त करण्यात आल्या. या मुद्देमालाची किंमत १३,९१० रुपये इतकी आहे. सदर दारू विनापरवाना व बेकायदेशीररीत्या साठवून विक्री करत असल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपी औदुंबर करंडे यांच्याविरुद्ध पोलीस कॉन्स्टेबल प्रसाद धनाजी अनभुले यांनी फिर्याद दिली. त्यानुसार म हाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(ई) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर व सहाय्यक पोलीस अधीक्षक अंजना कृष्णा व्ही.एस. यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

## निधन वृत्त...

### निलव्वाबायी पाटील



**सोलापूर, दि. २० मार्च-**

श्रीक्षेत्र तीर्थ येथील (ता.द.सोलापूर) येथील निलव्वाबायी भीमशा पाटील यांचे अल्प आजाराने वयाच्या ९५ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असून त्यांचा अंत्यसंस्कार शुक्रवारी पाटील यांच्या शेतात धार्मिक विधिवत करण्यात आले. हंजगी येथील आश्रम शाळेचे सहशिक्षक परमेश्वर भीमशा पाटील यांचे मातोश्री होत्या.

# लोडशेडिंग, वीज कनेक्शन, मका खरेदी, कामगार प्रश्नांवर आ. जानकर आक्रमक

**तभा वृत्तसेवा**
**वेळापूर, दि. २० मार्च-**

राज्यातील ग्रामीण भागात सुरू असलेल्या लोडशेडिंगसह विविध प्रश्नांवर आमदार उत्तमराव जानकर यांनी विधानसभेत आक्रमक भूमिका घेतली. या मुद्द्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी त्यांनी विधानभवनाच्या पायऱ्यांवर बसून आंदोलन केले. यावेळी बीडचे आमदार संदीप क्षिरसागर हेही उपस्थित होते.

जानकर म्हणाले, राज्यातील ग्रामीण भागात गेल्या अनेक दिवसांपासून सायंकाळी ६ ते १० या वेळेत वीज पुरवठा खंडित केला जात आहे. ही वेळ घरगुती कामे, दूध काढणे, स्वयंपाक तसेच विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी अत्यंत महत्त्वाची असताना वीज नसल्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

वीज कनेक्शनच्या प्रश्नावर ते म्हणले, अनेक शेतकरी व नागरिकांची कनेक्शनची मागणी प्रलंबित आहे. काहीजण दहा किलोमीटरवरून उंचावर पाणी उचलत असतानाही त्यांना वीज कनेक्शन दिले जात नाही, तसेच स्वतः चा डीपी उभारण्यासही परवानगी दिली जात नाही. माळशिरस तालुक्यातच सुमारे ६०० वीज कनेक्शन प्रलंबित आहे. मका खरेदीबाबत त्यांनी गंभीर स्थिती मांडली. शासनाने सुरू केलेल्या खरेदी केंद्रात



सुमारे ६ हजार शेतकऱ्यांनी नोंदणी केली असली तरी त्यापैकी केवळ अडीचशे शेतकऱ्यांचा मका खरेदी झाल्याचे त्यांनी सांगितले. यामुळे शेतकरी अडचणीत सापडले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बांधकाम कामगारांच्या प्रश्नावरही त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. अनेक कामगारांच्या आरोग्यविषयक मदतीचे प्रस्ताव महिनोनमहिने प्रलंबित असून, गंभीर आजारांवरील महागड्या शस्त्रक्रियांसाठी त्यांना वेळेवर मदत मिळत नाही. अशा कामगारांसाठी तातडीने स्वतंत्र डिजिटल व्यवस्था निर्माण करून आर्थिक मदत देण्याची मागणी त्यांनी केली.

आरोग्य योजनांतील विसंगतींकडे लक्ष वेधताना जानकर म्हणाले की, काही विशिष्ट आजारांनाच मदत दिली जाते, तर इतर आजारांकडे दुर्लक्ष होते. आरोग्य योजना संपूर्ण शरीरासाठी लागू व्हाव्यात, अशी मागणी त्यांनी केली.

सरकारच्या कार्यपद्धतीवर टीका करताना त्यांनी म्हटले की, वारंवार प्रश्न मांडूनही त्यावर सम ाधानकारक उत्तर मिळत नाही. सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.




# निंबाळकर अध्यापक विद्यालयात डॉ. डिसले यांचे मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २० मार्च-**

शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालय बार्शी येथे ग्लोबल टीचर प्राईझ विनर डॉ. रणजितसिंह डिसले यांच्या 'शालेय शिक्षणात एआयचा वापर जबाबदारीने आणि सुरक्षितपणे' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य डॉ. दीपक गुंड हे होते.

प्रास्ताविक प्राचार्य डॉ. गुंड यांनी केले. त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर शिक्षणात कसा आवश्यक आहे याविषयीची माहिती सांगितली. तसेच डॉ. डिसले यांच्या अनुभवाचा फायदा निश्चितच होईल, असे सांगितले.

मार्गदर्शनपर व्याख्यानात डॉ. रणजितसिंह डिसले यांनी शालेय शिक्षणात कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयावर आधारित माहिती कृतिसत्र स्वरुपात सादर केली. त्यांनी माहिती सुरक्षा तसेच एआयचा वापर करताना जबाबदारीची जाणीव या विषयीची माहिती विद्यार्थ्यांना दिली. तसेच एआयचा वापर अध्ययन अध्यापन करताना तो करावा की नाही, काय योग्य आहे अयोग्य आहे. याविषयीची कृती विद्यार्थ्यांकडून करुन घेतली. त्यांनी ख च्या विविध साधनांची माहिती दिली.

गट कार्याद्वारे त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता वापरताना आपली जबाबदारी कोणती आहे याचीही माहिती त्यांनी विद्यार्थ्यांना दिली. डॉ. डिसले जे सध्या हॉर्वर्ड विद्यापीठात शिक्षण घेत आहेत. त्यांच्या ज्ञानाचा फायदा डीएड च्या विद्यार्थ्यांना झाला.

प्राचार्य डॉ गुंड यांनी त्यांचा परिचय करुन दिला व त्यांच्या ज्ञानाचा उपयोग विद्यार्थ्यांना निश्चितपणे होईल असे देखील सांगितले. सूत्रसंचालन, आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. जे. पी. गायकवाड यांनी केले.



# पाणी पुरवठा कामांना प्राधान्य द्या : सभापती मगर

## टंचाई आढावा बैठकीत जनावरांच्या पाण्याबाबतही चर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. २० मार्च-**

उन्हाळ्याच्या झळा वाढू लागल्याने पाणी पुरवठा कामांना प्राधान्य द्यावे अश्या सूचना नूतन सभापती दत्ता मगर यांनी टंचाई आढावा बैठकीत बोलताना केल्या. यावेळी सभापती दतात्रय मगर, उपसभापती मनीषा पाटील, जि प सदस्य अर्जुनसिंह मोहिते पाटील, गटविकास अधिकारी रघुनाथ पांढरे, सहा गटविकास अधिकारी किरण मोरे, पाणी पुरवठा शाखा अभियंता ए.एन. आंबले, पं.स.सदस्य प्रविण वाघमोडे, युवराज झंजे, जगन्नाथ माने आदी उपस्थित होते

उन्हाच्या झळा वाढू लागल्याने पंचायत समिती सभागृहात टंचाई बाबत आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी झालेल्या चर्चेत ग्रामसेवक व सरपंचांनी पाणीपुरवठ्याच्या संदर्भातील दुरुस्त्या डागडुजी आधी पाणीपुरवठ्या संदर्भातील कामांना प्राधान्य देण्याबाबत बैठकीत एकमत झाले.

यावेळी सरपंच, ग्रामसेवक यांनी आपल्या समस्या मांडल्या. यामध्ये पाणी पुरवठ्या साठी स्वतंत्र रोहित्र,काही गावात खार पाणी असल्याने ते पिण्यास योग्य नाही यामध्ये प्रशासनाने लक्ष घालण्याच्या सूचना देण्यात आल्या.

पाणीटंचाईच्या झळा जनावरांना मोठ्या प्रमाणात बसतात त्यामुळे संबंधित गावात जनावरांच्या संख्येचा दाखला जोडून आवश्यक पाण्यासाठी मागणी करावी व भविष्यातील पाणीटंचाईसाठी विहीर अधिग्रहण प्रस्ताव तयार ठेवण्याच्या सूचना यावेळी गटविकास अधिकारी रघुनाथ पांढरे यांनी दिल्या.

# मंद्रूपमध्ये गुढी पाडव्याला गुळ वाटण्याची प्रथा

## नवस फेडण्यासाठी भाविकांकडून फोडण्यात येतो नारळ

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. २० मार्च-**

नवीन वर्षाच्य२ा शुभ मुहूर्तावर मंद्रूप मध्ये गुढीपाडव्याचा गुळ वाटण्याची प्रथा आहे अनेक वर्षापासून गुढीपाडव्याचे मुहूर्त साधून मंद्रूप मधील भाविक मळसिदप्पा मंदिर येथे हजारो भाविकांना गुळ वाटप करून नवीन वर्षाचे स्वागत करतात. तसेच नवस फेडण्यासाठी मळसिध्द मंदिराच्या पायरीवर शेकडो नारळ फोडून नवस पूर्णही करतात. त्यामुळे मळसिध्द मंदिरात दरवर्षी गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर गुळ वाटण्याची व नारळ फोडण्याची अनोखी प्रथा वर्षानुवर्षे सुरू असल्याचे दिसून येते. गुढीपाडवा म्हणजे हिंदू नववर्षाचा पहिला दिवस. या दिवसाचे औचित्य साधून मंद्रूप मधील हिंदू भाविक मळसिद्ध मंदिर येथे देवाचे दर्शन घेऊन उपस्थितांना गोड म्हणून गुळ वाटप करतात . नवीन वर्षाची सुरुवात गोड देऊन करण्यामुळे गुळाला महत्त्व आहे. गुढीपाडव्यापासून उन्हाची तीव्रता वाढत असल्यामुळे शरीरामध्ये कॅल्शियमचे कमी होणारे प्रमाण भरून काढण्यासाठी गुळ वाटण्याची प्रथा असल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे मळसिध्द मंदिरात येणाऱ्या शेकडो भाविकांकडून पाच किलो पासून ते पंचवीस किलोपर्यंत गुळ वाटप करून नवीन वर्षाचे स्वागत करण्यात येते.



तसेच नवीन वर्षाचा पहिला दिवस म्हणून मळसिध्द मंदिरात नवस केलेल्या भक्तांकडून पायरीवर शेकडो नारळ फोडून नवस पूर्ण करण्यात येते. यावेळी पाच नारळापासून ते २५१ पर्यंत नारळ फोडण्यात येते . त्यामुळे नवस पूर्ण केल्याचा समाधानही भाविकांच्या चेहऱ्यावर दिसून येते. एकूणच उन्हाळा सुरू होण्याच्या पूर्वसंध्येला व नवीन वर्षाच्या शुभ मुहूर्तावर गुळ वाटप करून आनंद साजरा करण्याची ही प्रथा असल्याचे येथील पुजारीकडून सांगण्यात येते . शिवाय नवस फेडण्यासाठी नारळचा वापरही केला जात असल्या मुळे येथील परिसरातील व्यापाराला मोठ्या प्रमाणात चालना मिळते.



# जेऊर येथे संभाजी ब्रिगेडतर्फे इफ्तार पार्टी; हिंदू-मुस्लिम ऐक्याचा संदेश

**जेऊर, दि. २० मार्च-**

जेऊर (ता.करमाळा) येथे संभाजी ब्रिगेड तर्फे रमजान पवित्र महिण्यानिमित्त अलिफ मस्जिद येथे इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष व पंचायत समिती सदस्य भरत अवताडे म्हणाले संभाजी ब्रिगेड हि संघटना सर्व जाती धर्मातील लोक एकत्रित घेऊन चालणारी आशी संघटना आहे. व जाती-जातीत तेड निर्माण न करता सर्व जातीतील लोकांना एकत्रित घेऊन काम करणारी व शिवराय- फुले -शाहू-आंबेडकर विचारधारेवर सर्व समाज बांधवांचं संघटन करणारी संघटना आहे. यावेळी पंचायत समिती सदस्य लिंबोरेचे सरपंच रवींद्र वळेकर, मयुर रोकडे, सोमनाथ रोकडे, संभाजी ब्रिगेड पुणे विभागीय अध्यक्ष नितीन खटके, बाळासाहेब झोळ, निलेश पाटील,अतुल निर्मळ, हेमंत शिंदे, सोमनाथ जाधव, आदिनाथ माने,धन्यकुमार गारुडी, सागर साखरे, वैभव मोहिते, सचिन गारुडी, धनुभाऊ करंडे, आजित हिवरे उपस्थित होते.

# एमआयटी कॉलेजमध्ये महिलांचा सन्मान सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २० मार्च-**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून एमआयटी रेल्वे इंजिनिअरिंग कॉलेज येथे महिला सन्मान सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्षा म्हणून प्रा. डॉ. स्मिता सुरवसे या लाभल्या. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून एम आयटी कॉलेजचे प्राचार्य मधुकर लेंगरे, डॉ. क्रांती कोळी, गायत्री बंडेवार, अरुणा शेळगावकर, अक्षय बंडेवार, मनीष शहा, समाधान विधाते, मंगेश केवडकर हे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले. मान्यवरांचे स्वागत संस्थेचे सचिव अजय तिवारी यांनी केले.



मान्यवरांच्या हस्ते स्त्री शिक्षणाचे जननी माता सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करुन दीपप्रज्वल करण्यात आले. प्रास्ताविक सहसचिव नागनाथ सोनवणे यांनी केले. अध्यक्षा व पाहुण्यांचा परिचय बिनादेवी उकिरडे यांनी केले. संस्थेचे अध्यक्ष राहुल वाणी तसेच निवड समिती यांनी महिला बचतगट विविध क्षेत्रातील काम करणाऱ्या महिलांची निवड केली.

सोहळ्यातील सन्मानाच्या मानकरी पुढीलप्रमाणे - सुनिता पालखे (सामाजिक कार्य), श्रीमती सुरेखा जयहिंद पन्हाळकर ( वीर पत्नी), प्रज्ञा वाळके (गायन), भाग्यश्री बोथरा (सामाजिक), प्रमिला विधाते (आरोग्यसेविका), अॅड. रत्नमाला पाटील (विधी क्षेत्र), नीलम अग्रवाल (ब्युटिशियन) डॉ. क्रांती कोळी (वैद्यकीय), प्रियांका रत्नाकर स्वामी (बँकिंग), अनिता शिंदे (शिक्षण), उषा माने (पोलीस), ज्योती आग्रे (एस.टी. वाहक), वंदना कांबळे (स्वच्छता कर्मचारी), माधुरी काळे (परिरक्षण भूमापक अधिकारी), उषा दराडे (पर्यवेक्षक, बालविकास प्रकल्प, बार्शी), श्रीमती संगीता अवताडे (पंचायत समिती), शितल गवळी (महसूल अधिकारी तहसील कार्यालय बार्शी), महिला बचतगटातून सुशीला सोनवणे (सिद्धेश्वर महिला बचतगट गोरम ाळे), रोहिणी वायचळ ( बसवेश्वर महिला स्वयं सहाय्यता बचतगट बार्शी ) सुनीता गोंघाने (धनलक्ष्मी स्वयं सहाय्यता बचतगट बार्शी ) शोभा पवार (गिरीजा महिला बचतगट) या माता जिजाऊ, माता सावित्री, माता रमाई या लेकीनचा सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी सौभाग्य बोथरा, गायत्री बंडेवार यांनी मनोगत व्यक्त केले. एमआयटी कॉलेज संपूर्ण माहिती मंगेश केवडकर यांनी दिले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ. स्मिता सुरवसे यांनी सर्व महिलांचे व सन्मान पात्र महिलांचे अभिनंदन केले.

सूत्रसंचालन प्रा. माधुरी शिंदे व प्रा. मंजुषा राऊत यांनी केले आभार डॉ. प्रा. चंद्रकांत उलभगत यांनी करुन कार्यक्रमाची सांगता प्रा. रतिकांत हामने यांच्या पसायदानाने करण्यात आली. आभार अध्यक्ष राहुल वाणी यांनी मानले.

# वैरागच्या एकता मंचची जलसाक्षरतेची गुढी

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि.२० मार्च-**

भारतीय नववर्षाचे स्वागत केवळ परंपरेनेच नाही, तर सामाजिक भान जपून करण्याचा एक नवा आदर्श एकता महिला मंचच्या रणरागिणींनी घालून दिला आहे. गुढीपाडव्याचे औचित्य साधून वैराग येथे महिलांनी जलसाक्षरतेची गुढी उभारून निसर्गाप्रती आपली कृतज्ञता व्यक्त केली.

केवळ पारंपारिक गुढी न उभारता, भविष्यातील पाणी संकट लक्षात घेऊन पाणी वाचवा-जीवन वाचवा असा म ूलमंत्र यावेळी देण्यात आला. उपस्थित सर्व सदस्यांनी पाणी बचतीची सामूहिक शपथ घेऊन तो कृतीत आणण्याचा ठाम संकल्प केला.

प्रगती कासार, सुचेता कासार, दीप्ती गायकवाड, विजया कासार, रत्नप्रभा गायकवाड, वैशाली गोवर्धन, जयश्री सोपल, कुसुम कासार, विभावरी कुलकर्णी, शोभा मस्के, नंदा देशमुखे, मीनाक्षी कासार, शकुंतला दीक्षित, साळवे, जया एखंडे, संध्या जाडकर उपस्थित होते.





### शेळगाव (आर) येथे पाणी बचतीची सामूहिक शपथ

भारतीय नववर्षाचे स्वागत केवळ परंपरेनेच नाही, तर सामाजिक भान जपून करण्याचा एक नवा आदर्श 'एकता महिला मंचच्या रणरागिणींनी घालून दिला आहे. आज १९ मार्च २०२६ रोजी, गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर शेळगाव (आर), ता. बार्शी येथे मंचच्या वतीने जलसाक्षरतेची गुढी उभारून निसर्ग संवर्धनाचा जागर करण्यात आला.

यावेळी गीतांजली जोशी, सविता काटे, जयश्री गवळी, मंजुळा गवळी, राणी गवळी, मनीषा गवळी, रंजना गवळी, आशा विभूते, सारिका जाधव, मीरा गायकवाड, पंचशीला बनसोडे, संगीता कदम, अंजली अडसूळ, गंगा गोडगे, रुपाली कचरे, सरस्वती गवळी उपस्थित होत्या.



**मत्स्य अवतार...**

**पूर्व विभाग श्रीराम मंदिरच्या वतीने श्रीराम नवमीनिमित्त शुक्रवारी प्रभु श्रीरामास मत्स्य अवताराने अलंकृत करण्यात आले होते.**

## थोडक्यात...

### आदर्श माता व प्रगतशील शेतकरी यांचा आज पुरस्कार वितरण सोहळा

**सोलापूर, दि. २० मार्च-**

मातोश्री सावंत्रव्वा शिवलिंगप्पा कलशेट्टी यांच्या १५ व्या पुण्यस्मरणानिमित्त शनिवार दि. २१ मार्च रोजी स्वामी समर्थ सेवा मंडळ वळसंग येथे आदर्श माता व प्रगतशील शेतकरी यांचा पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमास जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, उपम हासंचालक यशदा पुणे मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या हस्ते हा पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे. यामध्ये सुनिता मल्लिनाथ बाबानगरे, गौराबाई चंद्रशेखर घोडके, बसम्मा अनिल मनुरे, सुशिलाबाई श्रीमंत कलशेट्टी यांना आदर्श माता पुरस्कार तर फारुख शेख, भुजंगा हुसेनी वाघमारे, निलेश स्वामीनाथ बोधले यांना आदर्श शेतकरी पुरस्कार देण्यात येणार आहे. या कार्यक्रमास सरपंच जगदीश अंतद, माजी सरपंच श्रीशैल दुधनी, माजी सरपंच सिध्दाराम कोल्हे, माजी सदस्य सोनू कलशेट्टी यांची उपस्थिती असणार आहे.

### अमित चव्हाणची नवोदय विद्यालयासाठी निवड



**सोलापूर, दि. २० मार्च-**

नुकत्याच झालेल्या सन् २०२५-२६ नवोदय परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून यामध्ये वळसंग जिल्हा परिषद प्राथमिक मराठी केंद्र शाळेतील इयत्ता पाचवीचा विद्यार्थी अमित सतीश चव्हाण याने १०० पैकी ९६.२५ गुण मिळवून नेत्रदीपक यश मिळवले आहे. त्याने जिल्हा गुणवत्ता यादीत १० वे स्थान पटकावले आहे. अमितची पोखरापूर येथील नवोदय विद्यालयासाठी निवड झाली आहे. त्याच्या या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी जयश्री सुतार, विस्तार अधिकारी गुरुबाळ सनके, वळसंग केंद्राचे केंद्रप्रमुख इंद्रसेन पवार यांनी त्यांचे अभिनंदन केले. यासाठी त्याला मुख्याध्यापक अमीनसो पटेल तसेच वर्गशिक्षक तानाजी राठोड यांचे मार्गदर्शन लाभले.



**सोलापूर शहरातील विजापूर रोड परिसरातील सुंदर नगर येथील श्री समर्थ मंदिरात शुक्रवारी सकाळी प्रकट दिनानिमित्त महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते पाच ते सहा हजार भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.**

# शाळेत हजेरीपुरते नव्हे, पूर्णवेळ उपस्थिती हवी!

- जि.प.अध्यक्ष, उपाध्यक्षांनी शिक्षण विभागाला दिला कडक इशारा
- मुख्यालयी न राहणाऱ्या शिक्षकांची यादी सादर करा
- दुरावस्थेतील शाळांवरही तातडीने कारवाई करा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० मार्च-**

शाळेत हजेरीपुरते नव्हे, पूर्णवेळ उपस्थिती हवी! अशा कडक शब्दात सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य, उपाध्यक्ष इंद्रजित पवार यांनी शिक्षण विभागाला इशारा दिला. मुख्यालयी न राहणाऱ्या शिक्षकांची यादी सादर करण्यात यावी, दुरावस्थेतील शाळांवरही तातडीने कारवाई करण्यात यावी, अशा सूचनाही प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांना दिल्या.

अध्यक्ष वैद्य व उपाध्यक्ष पवार यांनी शुक्रवारी जिल्हा परिषदेत पदभार स्वीकारल्यानंतर अधिकारी, कर्मचारी व विविध संघटनांकडून त्यांचा सत्कार करण्यात आला. मात्र या सत्कार सोहळ्याच्या पार्श्वभूमीवरच शिक्षण विभागातील ढिसाळ कारभारावर उपाध्यक्ष पवार यांनी थेट बोट ठेवत अधिकाऱ्यांना जाब विचारला.



### आक्रमक भूमिका, कठोर पावले

पहिल्याच दिवशी अध्यक्ष व उपाध्यक्षांनी घेतलेल्या या आक्रमक भूमिकेमुळे शिक्षण विभागात खळबळ उडाली. पुढील काळात शिस्तबद्ध कामकाजासाठी कठोर पावले उचलली जाणार असल्याचे संकेत मिळत आहेत.



दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, अक्कलकोट व मोहोळ तालुक्यांतील अनेक प्राथमिक शाळांमध्ये शिक्षक केवळ हजेरीपुरते येतात आणि शाळेच्या वेळेत इतर कामांकडे वळतात. अनेक शिक्षक नियुक्तीच्या ठिकाणी राहत नसल्याचेही निदर्शनास आले आहे. शिक्षकांनी मुख्यालयी राहणे बंधनकारक असताना त्याकडे शिक्षकांनी सर्रास दुर्लक्ष केल्याचा आरोपही त्यांनी केला.

शाळेच्या वेळेत शिक्षक शाळेतच उपस्थित राहिले पाहिजेत. वैयक्तिक कामे शाळेनंतर करावीत. अन्यथा कडक कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा देत, मुख्यालयी राहत नसलेल्या शिक्षकांची सविस्तर यादी तातडीने सादर करण्याच्या सूचना त्यांनी शिक्षणाधिकारी शेख यांना दिल्या. या सूचनेला कादर शेख यांनी होकार दिला.मागील पावसाळ्यानंतर अनेक शाळांच्या इमारती धोकादायक स्थितीत आहेत. विद्यार्थ्यांच्या जीविताला धोका निर्माण होण्यापूर्वीच अशा इमारतींची यादी तयार करून तातडीने उपाययोजना कराव्यात. धोकादायक वर्गखोल्यांच्या ठिकाणी नवीन खोल्या उभारण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# २३ मार्चपासून जिल्हास्तरीय कृषि व धान्य महोत्सव

- तंत्रज्ञानाबाबत विविध तज्ञांचे चर्चासत्रांचेही आयोजन
- जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २० मार्च-**

राष्ट्रीय खाद्य तेल अभियान व राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियानांतर्गत जिल्हास्तरीय कृषि व धान्य महोत्सवाचे दि. २३ ते २५ मार्च २०२६ रोजी हुतात्मा स्मृती मंदिर सोलापूर येथे महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागामार्फत आयोजित करण्यात आलेला आहे.

सदर महोत्सवामध्ये विविध धान्य व खाद्य पदार्थांचे एकूण ५० स्टॉल उभारण्यात येणार आहेत. महोत्सवामध्ये प्रमुख आकर्षण म्हणून सेंद्रीय गुळ, काकवी, इंद्रायणी तांदूळ, मंगळवेढा ज्वारी, सोलापूरी हुरडा व जांभुळ कुल्फी, ज्वारी बिस्किटे, केळी व शेवगा पावडर, मध, वाळवण पदार्थ, ड्रायड भाजीपाला, मल्टीमिलेट आटा, कडक भाकरी असे शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालापासून प्रक्रिया केलेले विविध पदार्थ ग्राहकांना थेट विक्रीसाठी उपलब्ध होणार आहेत.

त्याचबरोबर आधुनिक तंत्रज्ञानाबाबत विविध तज्ञांचे चर्चासत्र/ परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच अन्नप्रक्रिया उद्योगाचे विक्री व्यवस्थापन व विपणन याबाबत तज्ञांचे मार्गदर्शन होणार आहे. महोत्सवामध्ये विक्रेता-खरेदीदार संमेलनाच्या माध्यमातून उत्पादक व खरेदीदार यांना एकाच मंचावर आणून त्यांच्यामध्ये वार्षिक करार करण्यात येणार आहे. त्याचबरोबर वविध अन्नधान्य उत्पादनांचे शेतकरी ते ग्राहक थेट विक्री होईल असे आयोजन करण्यात आलेले आहे. तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकरी, बचत गट, शेतकरी उत्पादक कंपनी व उद्योजक यांनी धान्य महोत्सवास भेट द्यावी. तसेच चर्चासत्रामध्ये दिल्या जाणाऱ्या कृषि विषयक आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.



# पूर्व विभाग श्रीराम मंदिरच्या वतीने श्रीराम भुजंगप्रयात स्तोत्रपठण प्रशिक्षण

### मंगळवारी करण्यात येणार सामुहिक समर्पण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० मार्च-**

श्रीराम नवमीनिमित्त पूर्व विभाग श्रीराम मंदिरच्या वतीने शुक्रवार, दि.२० ते मंगळवार, दि.२४ मार्च २०२६ या कालावधीत दररोज सायंकाळी ५.१५ ते ६ यावेळेत श्रीराम भुजंगप्रयात स्तोत्रपठण मोफत प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, दि.२० मार्च २०२६ रोजी या शिबीरास मोठ्या भक्तीमय वातावरणात प्रारंभ करण्यात आला. मंगळवार, दि.२४ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता या स्तोत्राचे सामुहिक समर्पण करण्यात येणार आहे.

आदि शंकराचार्यांनी अयोध्येतील सरयू नदीच्या काठावर या स्तोत्राची रचना केली आहे. श्रीराम भुजंगप्रयात हे अत्यंत प्रगल्भ व भक्तिमय स्तोत्र आहे. प्रभू श्रीरामांच्या दैवी गुणांचे वर्णन करते आणि अखंड भक्तीभावाने त्यांच्या शरण जाण्याचा संदेश देते. या स्तोत्राच्या नियमित पठणाने श्रीरामांचे आशीर्वाद प्राप्त होऊन आध्यात्मिक उन्नती व अंतःशांती लाभते, असे मानले जाते. गोवर्धन चाटला व मासाई चाटला यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रशिक्षण शिबीर घेतले जात आहे.

श्रीकांची कामकोटी पीठाचे ७० वे पीठाधिपती जगद्गुरु शंकराचार्य श्री शंकर विजयेंद्र सरस्वती स्वामीजी यांनी सोलापूर दौऱ्यादरम्यान पूर्व विभाग श्रीराम मंदिरात या स्तोत्राचा फलक स्थापित करण्याची सूचना केली होती. त्यानुसार, वसंत पंचमी (१४ फेब्रुवारी २०२४) रोजी त्यांच्या हस्ते या फलकाचे अनावरण करण्यात आले होते. या उपक्रमाद्वारे अधिकाधिक भक्तांनी स्तोत्र पठण शिकून श्रीराम नवमी उत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# सोलापूर जनता सहकारी बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीत परिवार पॅनलची बाजी

### ७ उमेदवार बिनविरोध तर १० उमेदवारांचा मोठ्या मताधिक्याने विजय



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० मार्च-**

सोलापूर जनता सहकारी बँकेच्या संचालक पदाच्या पंचवार्षिक निवडणुकीत सत्ताधारी परिवार पॅनलच्या सर्व १७ उमेदवारांनी बाजी मारली. एकूण १७ पैकी ७ उमेदवार यापूर्वीच बिनविरोध निवडून आले. उर्वरित १० जागांसाठी निवडणूक लागली होती. तीत परिवार पॅनलचे सर्वच्या सर्व उमेदवार विजयी झाले आहेत. या निवडणुकीत एकूण ५१ हजार ४९४ मतदारांपैकी ५ हजार ६७९ मतदारांनी मतदान केले. यातील ५ हजार ४८८ मते वैध तर १९१ मते अवैध ठरली.

या निवडणुकीसाठीच्या चार मतदारसंघांपैकी सोलापूर महानगरपालिका क्षेत्रापासून २५ किलोमीटरच्या बाहेरील मतदारसंघातून डॉ.हर्षद डंबळ, ॲड.मिलिंद कुलकर्णी, अमित आपटे, चरणसिंग चौव्हाण तर महिला मतदारसंघातून चंद्रिका चौहान आणि गौरी आमडेकर आणि अनुसूचित जाती जमाती मतदार संघातून रवींद्र साळे हे बिनविरोध निवडून आले आहेत.

मतमोजणीतून विजयी झालेले उमेदवार व त्यांना पडलेली मते याप्रमाणे; पुरुषोत्तम उडता (५ हजार २६३), आनंद करवंदे (५ हजार २५३), सुरेश चिक्कळी (५ हजार १७५), महादेव न्हावकर (५ हजार १३२), राजेश पवार (५ हजार २६९), सुनील पेंडसे (५ हजार २५४), गिरीष बोरगावकर (५ हजार २४६), प्रमोद भुतडा (५ हजार २५६), विष्णू मोंढे (५ हजार १२०), ॲड.मल्लिनाथ शहाबादे (५ हजार ३२).

जिल्हाधिकारी तथा मुख्य निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या देखरेखीखाली ही निवडणूक झाली. जिल्हा उपनिबंधक आणि सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी किरण गायकवाड आणि सहकारी अधिकारी वर्गाने ही निवडणूक प्रक्रिया राबवली. याकामी सोलापूर जनता सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनय दुनाखे, सहाय्यक निबंधक आबासाहेब गावडे, उमेश पवार, गजानन वाडेकर, राजेंद्र ढोणे यांची मदत झाली.

### उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार प्रवेशिका देण्यासाठी मुदतवाढ

**सोलापूर, दि. २० मार्च-**

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, लेखन, दूरचित्रवाणी वृत्तकथा, छायाचित्रकार, समाज माध्यम तसेच स्वच्छ महाराष्ट्र जनजागृती पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात आली आहे. २०२५ या कॅलेंडर वर्षातील (१ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२५) कालावधीसाठी प्रवेशिका मागविण्यात येत असून, यापूर्वी निश्चित केलेली अंतिम तारीख १५ मार्च २०२६ होती. आता ही मुदत वाढवून ३१ मार्च २०२६ पर्यंत करण्यात आली आहे. सदर पुरस्कारांसाठीचे माहितीपत्रक व अर्जाचे नमुने शासनाच्या संकेतस्थळावर www.maharashtra.gov.in (maharashtra.gov.in in Bing), महासंचालनालयाच्या dgipr.maharashtra.gov.in तसेच https://mahasamvad.in या ब्लॉगवर उपलब्ध आहेत. तरी सोलापूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त प्रसार माध्यम प्रतिनिधी यांनी शासनाच्या या पुरस्कारा योजनेत सहभागी व्हावे व आपल्या प्रवेशिका ३१ मार्च पर्यंत सादर कराव्यात, असे आवाहन जिल्हा माहिती कार्यालय सोलापूरच्या वतीने करण्यात येत आहे.







**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**

● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## पोलीस शेतकऱ्यांच्या बांधावर; लातूर पोलिसांचा अभिनव उपक्रम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० मार्च :** लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागामध्ये शेतजमिनीच्या बांधावरून, शेतरस्त्यांवरून तसेच मालकी हक्कांवरून उद्भवणारे वाद अनेक वेळा गंभीर स्वरूप धारण करतात. अशा वादांमुळे शेतकऱ्यांमध्ये तणाव निर्माण होऊन परस्परविरोधी तक्रारी दाखल होतात व काही वेळा गुन्हेगारी घटनांनाही खतपाणी मिळते. या सर्व प्रक्रियेमुळे शेतकऱ्यांना पोलीस ठाणे, न्यायालयीन कामकाज यामुळे मानसिक त्रास सहन करावा लागतो आणि न्यायासाठी वर्षानुवर्षे प्रतीक्षा करावी लागते.

ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन लातूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री.अमोल तांबे यांनी शेतकऱ्यांच्या अडचणींचा अत्यंत संवेदनशीलतेने विचार करून पोलीस शेतकऱ्यांच्या बांधावर हा अभिनव व लोकाभिमुख उपक्रम दिनांक १६ मार्च २०२६ पासून सुरू केला आहे. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या समस्या प्रत्यक्ष जाणून घेताना एक महत्त्वाची बाब अधोरेखित केली की, शेतकऱ्यांसाठी त्यांची जमीन ही केवळ मालमत्ता नसून ती त्यांच्या आयुष्याचा आधार, कष्टाचे प्रतीक आणि कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचे मुख्य साधन आहे.शेतीच्या छोट्या-छोट्या कारणांवरून निर्माण होणारे वाद वर्षानुवर्षे प्रलंबित राहतात, त्यातून शेजारी शेजाऱ्यांचे संबंध बिघडतात, आणि काही वेळा किरकोळ वाद मोठ्या गुन्ह्यांत परिवर्तित होतात. ही बाब लक्षात घेऊन त्यांनी केवळ कायदेशीर कारवाई करण्याऐवजी मानवी दृष्टीकोनातून, संवादातून व सामोपचारातून प्रश्न सोडवण्यावर भर दिला आहे.



# रेणापूर व मुरुडच्या तंट्यासह ४९ तंटे सामंजस्याने निकाली

## पोलीस शेतकऱ्यांच्या बांधावर उपक्रमाला अभूतपूर्व प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० मार्च :** लातूर पोलीस दलाच्या 'पोलीस शेतकऱ्यांच्या बांधावर' या उपक्रमाला जिल्हाभरात अभूतपूर्व प्रतिसाद मिळत आहे. लातूर तालुक्यातील मुरुड आणि रेणापूर तालुक्यातील एकूण ४९ तंटे या उपक्रमाअंतर्गत सामंजस्याने सोडविण्यात यश आले आहे. या उपक्रमाचे जिल्हाभरातून स्वागत होत आहे.

ग्रामीण भागातील जमीन व शेतीसंदर्भातील वादांमुळे सामाजिक तणाव निर्माण होऊन अनेक वेळा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. असे वाद वर्षानुवर्षे प्रलंबित राहिल्यामुळे शेतकऱ्यांना मानसिक, आर्थिक व सामाजिक त्रास सहन करावा लागतो. या पार्श्र्वभूमीवर पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या पोलीस शेतकऱ्यांच्या बांधावर या उपक्रमाला जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. प्रत्यक्ष शेतात जाऊन वाद निवारण करण्याच्या



या उपक्रमातून अत्यंत प्रभावी परिणाम दिसून येत आहेत. रेणापूर पोलीस ठाणे - दोन वर्षांपासून प्रलंबित वादाचा शेवट रेणापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नेहरू नगर शिवारामध्ये अर्जदार सोमनाथ रमेश भोसले यांनी शेती रस्त्याच्या वादासंदर्भात तक्रार दाखल केली होती. सदर वाद हा अर्जदार व गैरअर्जदार यांच्यात मागील दोन वर्षांपासून सुरू होता. या कालावधीत परस्परांविरुद्ध ४ वेळा एनसी दाखल झाल्या होत्या. शेतात जाण्यासाठी १० फूट रुंदीचा रस्ता देण्याच्या मुद्द्यावरून वारंवार वाद, भांडणे व पोलीस तक्रारी होत होत्या; मात्र कायमस्वरूपी तोडगा निघत नव्हता.या उपक्रमांतर्गत पोलीस निरीक्षक सुधाकर देडे यांनी स्टाफसह प्रत्यक्ष शेतात भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. गावातील प्रतिष्ठित नागरिक व दोन्ही पक्षकारांना समोरासमोर बसवून सखोल चर्चा करण्यात आली. वादाचे मूळ कारण समजून घेऊन, सामाजिक सलोखा जपण्याच्या दृष्टीने व कायदेशीर बाबींचा विचार करून दोन्ही पक्षांची समजूत काढण्यात आली. परिणामी, दोन्ही पक्षांच्या संमतीने सामोपचाराने वाद कायमचा मिटविण्यात आला, ज्यामुळे दोन वर्षांपासून सुरू असलेला तणाव पूर्णतः समाप्त झाला.

मुरुड पोलीस ठाणे

मुरुड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील भोसा येथे शंकर रंगराव खोसे, भीमराव रंगराव खोसे व लक्ष्मण व्यंकट खोसे यांच्यात ८ ते १० वर्षांपासून शेत रस्त्याचा वाद सुरू होता.या वादाच्या अनुषंगाने यापूर्वी न्यायालयीन प्रक्रिया, तहसीलदार स्तरावरील सुनावणी, पोलीस ठाण्यात तक्रारी तसेच उपोषण व आत्मदहनाचे निवेदन देण्यात आले होते. तरीही वाद निकाली निघत नव्हता.दि. २० फेब्रुवारी २०२६ रोजी तहसीलदार सौदागर तांदळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक अशोक उजगरे, पोलीस व महसूल कर्मचारी, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व स्थानिक प्रतिष्ठित नागरिक यांच्या उपस्थितीत प्रत्यक्ष शेतात जाऊन पाहणी करण्यात आली. सुमारे ५ तास सखोल चर्चा करून शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करत रस्ता व नाली तयार करून देण्याचा निर्णय घेण्यात आला. सर्व संबंधितांच्या संमतीने हा दीर्घकालीन वाद सामंजस्याने मिटविण्यात आला. यामुळे अनेक वर्षांपासून सुरू असलेला वाद संपुष्टात येऊन संबंधित कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला.

या मोहिमेदरम्यान अवघ्या पाच दिवसांत ४९ जमीन व शेती वादांचा सामंजस्याने निपटारा करण्यात आला असून, अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले वाद यशस्वीरीत्या मिटविण्यात आले आहेत. पोलीस शेतकऱ्यांच्या बांधावर हा उपक्रम केवळ वाद निवारणापुरता मर्यादित नसून, ग्रामीण भागात विश्र्वास निर्माण करणारा, संवेदनशील व परिणामकारक पोलिसिंगचा आदर्श नमुना ठरत आहे. जमीन व शेतीसंदर्भातील वाद असलेल्या शेतकऱ्यांनी आपल्या संबंधित पोलीस ठाण्याशी संपर्क साधून या उपक्रमाचा लाभ घ्यावा व सामंजस्याच्या माध्यमातून वाद मिटविण्यास पुढाकार घ्यावा, असे आवाहन लातूर पोलीस प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## लातुरात डॉ. भूषण शुक्ल यांच्या उपस्थितीत पालकशाळेचे आयोजन : डॉ. मिलिंद पोतदार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० मार्च :** पुण्याचे ख्यातनाम बालमानसोपचार तज्ज्ञ डॉ. भूषण शुक्ल यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवार, दि. २२ मार्च २०२६ रोजी लातुरात 'तंत्रज्ञान युगातील पालकत्व - कानगोष्टी पालकत्वाच्या' या विषयावरील पालकशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेस लातूर शहर व परिसरातील पालकांनी आवर्जून उपस्थित रहावे , असे आवाहन संयोजक सावली सेंटर फॉर मेंटल हेल्थ अँड रिसर्च लातूरचे संचालक डॉ. मिलिंद पोतदार, डॉ. मुग्धा पोतदार यांनी केले आहे.



सद्यस्थितीत समाजात अनेक पातळीवर बदल होत असलेले पाहावयास मिळतात. प्रत्येक पालक आपआपल्या परीने पाल्यांना सर्व काही उत्कृष्ट दर्जाचे देण्याचा प्रयत्न करत असतात. आपल्या पाल्याचे भवितव्य उज्वल घडावे, तो समाजात एक आदर्श नागरिक म्हणून घडावा यासाठी पालक जीवाचे रान करताना दिसतात. तरीही मुलांना घडविताना , वाढविताना पालकांनाही अनेक प्रश्र्नांचा सामना करावा लागतो. त्यांनाही अनेक प्रश्र्न पडतात. पालकांना येणाऱ्या अडचणीवर मात करण्याचे कानमंत्र या आगळ्यावेगळ्या पालकशाळेच्या माध्यमातून डॉ. भूषण शुक्ल देणार आहेत. मुलांना वाढविताना जाणते - अजाणतेपणे पालकांकडून होणाऱ्या चुकांबद्दल ते यावेळी कानउघाडणीही करणार आहेत.

रविवारी सायंकाळी पाच वाजता दगडोजीराव देशमुख सभागृहात होणाऱ्या या कार्यक्रमात डॉ. भूषण शुक्ल यांच्यासोबत पालकांनाही संवादही साधता येणार आहे. हा कार्यक्रम स्वर, लातूर, अंतरंग व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्र आणि सावली सेंटर फॉर मेंटल हेल्थ अँड रिसर्च लातूरच्या संयुक्त विद्यमाने पार पडणार आहे. या पालकशाळेस जास्तीत जास्त पालकांनी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

## साई मंदिरात माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते आरती



**लातूर :** लातूर येथील विशाल नगर भागातील श्री साई मंदिरात गुढीपाडवा निमित्ताने गुरुवारी सायंकाळी माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांनी साईबाबा चे दर्शन घेतले त्यानंतर त्यांच्या हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत आरती करण्यात आली

यावेळी राज्य साखर महासंघाचे संचालक आबासाहेब पाटील जागृति शुगर चे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे मांजरा साखर कारखान्याचे उपाध्यक्ष अशोक काळे , रेणा साखर कारखान्याचे अध्यक्ष अनंतराव देशमुख जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अँड प्रमोद जाधव,रामदास पवार सचीन दाताळ बाजीराव संभाजी सुळ शिवाजी कांबळे गोविन्द डुरे, ज्ञानेश्वर भिसे,रमेश सुर्यवंशी अमोल शिंदे महेंद्र भादेकर, सुपर्ण जगताप डॉ आनंद पवार विकास देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते यावेळी मंदिर संस्थानच्या वतीने माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

## लातूर जिल्हा पोलीस शिपाई भरती २०२४-२०२५ ची ३० उमेदवारांची तात्पुरती निवड व प्रतीक्षा यादी जाहीर

**लातूर :** लातूर जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई भरती सन २०२४-२०२५ अंतर्गत गुणवत्तेनुसार प्रवर्गनिहाय ३० उमेदवारांची तात्पुरती (Provisional) निवड यादी तसेच प्रतीक्षा यादी दिनांक १९ मार्च २०२६ रोजी जाहीर करण्यात आली आहे. सदर यादी लातूर जिल्हा पोलीस दलाच्या अधिकृत संकेतस्थळ https://laturpolice.gov.inG$ वर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

या भरती प्रक्रियेमध्ये मैदानी चाचण्या, लेखी परीक्षा व इतर सर्व टप्पे अत्यंत काटेकोरपणे, पारदर्शक पद्धतीने व नियमानुसार पार पाडण्यात आले. मा. पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण प्रक्रिया सुयोग्य नियोजन, प्रभावी अंमलबजावणी व वेळेचे अचूक व्यवस्थापन यामुळे अल्पावधीत पूर्ण करण्यात आली. विशेष म्हणजे, राज्यातील इतर जिल्ह्यांच्या तुलनेत लातूर जिल्हा पोलीस दलाने सर्वप्रथम तात्पुरती निवड यादी जाहीर करण्याचा मान मिळविला आहे. ही बाब लातूर पोलिसांच्या कार्यक्षमतेचे, पारदर्शकतेचे व उत्तरदायित्वाचे द्योतक आहे. गुढीपाडवा व रमजान ईद या सणांच्या पूर्वसंध्येला ही निवड यादी जाहीर झाल्यामुळे निवड झालेल्या उमेदवारांसाठी हा क्षण अत्यंत आनंददायी व त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा ठरत आहे. दीर्घ काळ मेहनत घेऊन स्पर्धात्मक प्रक्रियेत यश मिळवलेल्या उमेदवारांच्या कुटुंबीयांमध्ये देखील समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. सदर निवड ही तात्पुरती (Provisional) असून पुढील कागदपत्र पडताळणी व आवश्यक शासकीय प्रक्रियांच्या अधीन राहील. उमेदवारांनी पुढील सूचनांसाठी नियमितपणे अधिकृत संकेतस्थळाला भेट देणे आवश्यक आहे.

लातूर जिल्हा पोलीस दलाने राबविलेली ही भरती प्रक्रिया राज्यातील इतर जिल्ह्यांसाठी एक आदर्श नमुना ठरत असून, नागरिकांमध्ये पोलीस प्रशासनाबद्दल विश्वास व सकारात्मकता निर्माण करणारी ठरली आहे.

## दिशा प्रतिष्ठानचा सहावा वर्धापन दिनानिमित्त मोफत शस्त्रक्रिया शिबिर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० मार्च :** मानवतेच्या सेवेचा वसा जपत शिक्षण व आरोग्य क्षेत्रात कार्यरत असलेल्या दिशा प्रतिष्ठानच्या सहाव्या वर्धापन दिनानिमित्त भव्य मोफत शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर शनिवार दि. २१ मार्च ते २१ एप्रिल कालावधीत संपन्न होणार असून दररोज सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत क्रीडा संकुल लातूर येथील दिशा प्रतिष्ठान च्या मुख्य कार्यालयात नोंद करणे अनिवार्य आहे.

या शिबिरामध्ये अँजिओप्लास्टी, कॅन्सर, प्रोस्टेट ग्रंथी, मुतखडा, मणक्याचे आजार तसेच ब्रेन ट्यूमर यांसारख्या गंभीर आजारांवर १००% मोफत शस्त्रक्रिया (औषधांसह) करण्यात येणार आहेत.

मणक्यातील नस दाबणे, गॅप येणे किंवा गाठी सरकणे अशा समस्यांवरही उपचार उपलब्ध राहणार आहेत. मात्र फक्त अँजिओग्राफीसाठी ५००० शुल्क आकारले जाणार आहे.

याशिवाय हाडे, डोळे, कान-नाक-घसा, जनरल व स्त्रीरोग संबंधित शस्त्रक्रियांवर ५०% सवलत (औषधाविना) देण्यात येणार आहे.

शस्त्रक्रिया लातूर येथील सह्याद्री हॉस्पिटल, पोद्दार हॉस्पिटल, काळे हॉस्पिटल, गोरे हॉस्पिटल, सारडा हॉस्पिटल, सिग्मा आय हॉस्पिटल, हार्मोनी हॉस्पिटल, येथे केल्या जाणार आहेत. तसेच लॅब तपासण्या-रक्त, सीटी स्कॅन व एमआरआय-५०% सवलतीत उपलब्ध असतील.

रुग्णांनी नोंदणी करताना जुने वैद्यकीय रिपोर्ट, राशन कार्ड व आधार कार्ड सोबत आणणे आवश्यक आहे. नोंदणी दिशा प्रतिष्ठानच्या लातूर येथील मुख्य कार्यालयात करावी लागणार आहे.

अधिक माहितीसाठी दिशा प्रतिष्ठान चे अध्यक्ष सोनू डगवाले, इसरार सगरे, डॉ. वैशाली यादव, विष्णुदास धायगुडे, जब्बार पठाण, अजय शहा यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन

प्रतिष्ठान च्या वतीने अभिजीत देशमुख, डॉ अशोक पोद्दार, डॉ चेतन सारडा, संतोष देशमुख, प्रसाद उदगीरकर, किशोर भुजबळ, अविनाश कामदार, रतन बिदादा, प्रसाद जोशी, महेश मालपाणी, पप्पू घोलप यांनी केले आहे.

## जिल्ह्यात रमजान ईदनिमित्त मद्यविक्री बंद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० मार्च :** जिल्ह्यात २१ मार्च, २०२६ रोजी एक दिवस पुढे मागे चंद्र दर्शनानुसार मुस्लिम बांधवातर्फे रमजान ईद साजरी करण्यात येणार आहे. यानिमित्त लातूर जिल्ह्यातील सर्व किरकोळ अबकारी मद्यविक्री अनुज्ञप्त्या बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी दिले आहेत. मुंबई मद्य निषेध कायदा १९४९ चे कलम १४२ नुसार तसेच नमुद कायद्यांतर्गत केलेल्या विविध नियमानुसार प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून हे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. या आदेशाची अंमलबजावणी करण्यास कुचराई करणाऱ्या अबकारी मद्यविक्री अनुज्ञप्तीधारकाविरुध्द मुंबई दारुबंदी कायदा १९४९ व अनुषंगिक नियमांच्या आधारे कडक कारवाई करण्यात येईल, असे राज्य उत्पादन शुल्क विभागाने कळविले आहे.

## मतदार यादीचा सखोल पुनरिक्षण कार्यक्रम लवकरच सुरू होणार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० मार्च :** भारत निवडणूक आयोग आणि राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या निर्देशानुसार लातूर जिल्ह्यात मतदार यादीचा सखोल पुनरिक्षण (Special Intensive Revision - SIR) कार्यक्रम लवकरच सुरू होत आहे. या कार्यक्रमाच्या तयारीसाठी मतदार यादी अद्ययावत करण्याचे महत्त्वाचे कामे सुरू झाली असून, मतदारांना सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांनी केले आहे.

या अनुषंगाने १) Blurr Photo (धूसर किंवा अस्पष्ट छायाचित्र दुरुस्त करणे), २) DSE (Demographically Similar Entries - समान लोकसंख्याशास्त्रीय नोंदी तपासणी व दुरुस्ती), ३) SIR Mappins (मतदारांचे २००२ च्या मतदार यादीशी नकाशा संलग्नीकरण/मॅपिंग) आणि Book a Call (BLO सोबत कॉल बुकिंग) इत्यादी कामे तात्काळ पूर्ण करणे आवश्यक आहे. हे काम प्रत्येक मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (Booth Level Officer - BLO) यांनी आपल्या नेमणुकीच्या क्षेत्रातील मतदारांना समक्ष भेटून लवकरात लवकर पूर्ण करावीत, असे निर्देश देण्यात आले आहेत.

### मतदारांनी बीएलओ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन

२३५ लातूर शहर विधानसभा मतदार संघ आणि २३४ लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील सर्व मतदारांनी आपल्या रहिवासी मतदान केंद्रातील बीएलओ यांच्याशी समक्ष भेट घेऊन वरील कामे पूर्ण करून घ्यावीत. याशिवाय मतदार नावातील दुरुस्ती, वगळणी (Deletion) किंवा इतर आवश्यक बदलांसाठीही बीएलओ यांच्याकडे संपर्क साधावा. SIR Mapping चे काम २१ मार्च २०२६ नंतरही सुरू राहणार आहे. २००२ च्या मतदार यादीतील नाव शोधण्यासाठी https://voters.eci.gov.in/searchInSIR/S2U-4DPDF-JK4QWODSE या अधिकृत लिंकचा वापर करावा. मतदारांनी मतदार यादीच्या या सखोल पुनरिक्षण प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेऊन मतदार यादी अचूक, अद्ययावत आणि सर्वसमावेशक राहण्यास मदत करावी, असे आवाहन उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे आणि तहसीलदार सौदागर तांदळे यांनी केले आहे.

# दयानंद विज्ञानच्या आर्यन गिरवलकरला राष्ट्रीय युवक महोत्सवात स्किट कलाप्रकारात द्वितीय पारितोषिक

## दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेश बियाणी यांच्या हस्ते सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० मार्च :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान महाविद्यालयातील बी.एस्सी.बी.टी.तृतीय वर्षातील आर्यन गिरवलकर या विद्यार्थ्याने स्किट (लघुनाटिका) या कलाप्रकारात चेन्नई येथे पार पडलेल्या राष्ट्रीय युवक महोत्सवात द्वितीय क्रमांक मिळविलेला आहे.सदरील राष्ट्रीय युवक महोत्सवात नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने तब्बल २६ वर्षानंतर सुवर्णझेप घेत व ऐतिहासिक यश मिळवित देशातील आठ झोनमधील १४२ नामांकित विद्यापीठांमध्ये झालेल्या चुरशीच्या लढतीत विद्यापीठाने एकूण सात कलाप्रकारात यश मिळविलेले आहे.त्यामध्ये दयानंद विज्ञान महाविद्यालयातील आर्यन गिरवलकर या विद्यार्थ्याने स्किट या एका कलाप्रकारात द्वितीय क्रमांक मिळवून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे, दयानंद शिक्षण संस्था व दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे नावलौकिक राष्ट्रीय पातळीवर झळकाविलेले आहे.





त्याबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी यांनी त्याचे अभिनंदन केले तसेच संस्थेचे सचिव रमेश बियाणी यांच्या हस्ते त्याचा यथोचित सत्कार करण्यात आला.याप्रसंगी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे, प्राचार्य डॉ.शिवाजी गायकवाड, पर्यवेक्षिका डॉ.संध्या कोल्हे, पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरुडकर, सेल्फ फायनान्सचे प्राचार्य अनिलकुमार माळी,कॅप्टन डॉ. विजेंद्र चौधरी, डॉ.कोमल गोमारे, प्रा.कविता जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.याचबरोबर स्वारातीम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ.अशोक महाजन यांच्यासह सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी आदींनी त्याचे अभिनंदन व कौतुक केले आहे.

यापूर्वी दयानंद विज्ञानच्या आर्यन गिरवलकर याने आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव- २०२५ मध्ये मिमिक्री (नक्कल) या कलाप्रकारात पहिले पारितोषिक मिळविले.आंतर विद्यापीठ युवक महोत्सव (इंद्रधनुष्य) २०२५ मध्ये माईम (मूक अभिनय), वन ऍक्ट प्ले (एकांकिका) तसेच मिमिक्री (नक्कल) या कलाप्रकारात आपला सहभाग नोंदविला. ऑल इंडिया युनिव्हर्सिटी सेंट्रल झोनल युवक महोत्सवमध्ये स्किट (विडंबन) या कलाप्रकारात द्वितीय पारितोषिक तसेच क्रिएटिव्ह डान्स याही कलाप्रकारात सहभाग नोंदवून द्वितीय पारितोषिक मिळविले.तसेच सत्यभामा विद्यापीठ, चेन्नई,एमजीएम विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर व कवयित्री बहिणाबाई चौधरी विद्यापीठ, जळगाव येथील विद्यापीठाच्या स्पर्धेतही त्यांनी घवघवीत यश मिळविलेले आहे.

## संक्षिप्त...

### किलबिल च्या विराट शिंदे आणि नमन सारोळे ची नवोदय साठी निवड




**अहमदपूर :** नुकताच नवोदय विद्यालय इयत्ता ५ वी प्रवेश पूर्व परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून यात किलबिल नॅशनल स्कूल या शाळेतील विराट संदीप शिंदे आणि नमन मंगेश सारोळे या दोन विद्यार्थ्यांची नवोदय विद्यालय लातूर येथे इयत्ता सहावी प्रवेशासाठी निवड झाली आहे. किलबिल नॅशनल स्कूल शाळेचे प्रति वर्षी विद्यार्थी सदरील सहावी वर्गाच्या प्रवेशासाठी नेहमीच पात्र ठरतात. यामध्ये गुणवंत विद्यार्थ्यांची व पालकांची मेहनत, अनुभवी शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळे हे शक्य होते. शाळेत स्कॉलरशिप, नवोदय, सातारा सैनिक स्कूल डॉ होमी भाभा यासारख्या स्पर्धा परीक्षेची तयारी करून घेतली जाते . या सर्व विद्यार्थ्यांना शाळेतील स्पर्धा परीक्षा प्रमुख ज्ञानेश्र्वर जाधव , धनेश्र्वर आगलावे यांनी मार्गदर्शन केले. यशाबद्दल संस्थेचे सचिव ज्ञानोबा भोसले, प्राचार्य संतोष पाटील, उपप्राचार्य धरम सिंग शिराळे आदींनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक प्रगतीसाठी शुभेच्छा दिल्या.

### महाळंगी येथील तरुणाविरोधात पोक्सो चा गुन्हा दाखल




**किनगाव :** चाकूर तालुक्यातील माहाळंगी येथे एका तरुणाने १३ वर्षीय अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याची घटना बुधवारी (दि.१८) रात्री घडली. पिडितेच्या आईच्या फिर्यादीवरून किनगाव पोलीस ठाण्यात आरोपी विरुद्ध पोक्सो चा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. किनगाव पोलिसांनी आरोपीला अवघ्या दोन तासात अटक केली आहे. त्याची रवानगी न्यायालयीन कोठडीत करण्यात आली आहे.माहाळंगी येथील आरोपी आदिनाथ सेनाजी सन्मुखराव ( वय २४) याने १३ वर्षीय मुलीच्या कमरेला धरून ' तू मला आवडतेस ' असे म्हणून बुधवारी रात्री ९.४३ वाजता विनयभंग केला. पीडित मुलीच्या आईच्या फिर्यादीवरून किनगाव पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोले यांच्या मार्गदर्शनात सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक डोके, उपनिरीक्षक सत्यजित तोंडारे , हेड कॉन्स्टेबल तोपरपे, सुरज कोतवाड व होमगार्ड यांनी अवघ्या दोन तासांत आरोपीस जेरबंद करून न्यायालयासमोर हजर केले.

### अध्यात्मातून संस्कार मिळतात: सहकार मंत्री नामदार पाटील

**अहमदपूर :** अध्यात्मातून संस्कार मिळतात, त्यामुळे आपण अध्यात्माकडे जास्तीचे लक्ष देणे गरजेचे आहे व या मृदंग वादन स्पर्धेतून अध्यात्माची गोडी निर्माण होईल असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी परचंडा तालुका अहमदपूर येथे केले. रोकडोबा देवस्थान परचंडा येथे गुढीपाडव्यानिमित्त आयोजित झेंडा पूजन व मृदंग वादन स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून किशन महाराज प्रचंडेकर होते. यावेळी जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, शिवसेना उबाठाचे जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी, राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस शिवानंद हेगणे, जिल्हा परिषद सदस्य अश्र्विन नागराळे, भागवत गुट्टे, सुंदरराव साखरे, धनराज बोडके, युवराज घोगरे, नितीन पाटील, जाधव देशमुख, विष्णू आदटराव, बालाजी घोगरे, पोलीस निरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक सह विविध मान्यवर उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना नामदार पाटील म्हणाली की अध्यात्म व संस्कार हे अविभाज्य घटक असून, संस्कार हे शिक्षणातून नव्हे तर कृतीतून मिळत असतात. मृदंग वादन ही एक महत्वपूर्ण कला असून या कलेत सातत्य हवे आहे तेव्हाच यश मिळते असेही सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील म्हणाले. या कार्यक्रमाचे आयोजन पत्रकार दत्ता कानवटे, परचंडा येथील ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले होते.

### निलंग्यात प्रधानमंत्री आवास योजनेवर कार्यशाळ

**निलंगा/प्रतिनिधी :** लातूर आवास अभियान (ग्रामीण) अंतर्गत संपूर्ण जिल्ह्यात दि. १७ मार्च ते १५ ऑगस्ट या कालावधीत विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. या अभियानाद्वारे प्रलंबित घरकुलांची कामे जलद गतीने पूर्ण करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे गटविकास अधिकारी सतीश पाटील यांनी सांगितले.

ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला सुरक्षित व पक्के घर उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने शासनाच्या विविध आवास योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी निलंगा येथील पंचायत समितीच्या सभागृहात तालुकास्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सतीश पाटील उपस्थित होते. यावेळी प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) तसेच राज्य पुरस्कृत आवास योजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन करत संबंधित अधिकारी व ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांना योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आवाहन केले.

# बैल बारदाणा परवडेना अन् सालगडी मिळेना सालगड्याचा पगार दीड ते दोन लाखावर..

**तभा वृत्तसेवा/शंकर मिटकर**
**शिरूर अनंतपाळ, दि. २० मार्च :** शिरूर अनंतपाळ तालुक्यात शेती कामासाठी सालगडी मिळणे कठीण झाले असून त्यांचा पगार दिड ते दोन लाखांपर्यंत पोहोचला आहे,तर गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर नवीन सालगडी ठेवण्याची परंपरा शिरूर अनंतपाळ तालुक्यात जपली जात आहे.

शेतीकामासाठी कायमस्वरूपी मजूर मिळणे दिवसेंदिवस कठीण होत चालल्याने तालुक्यातील अनेक शेतकरी सध्या सालगड्यांच्या शोधात गावोगा- वी फिरताना दिसत आहेत. सालगडी मिळत नसल्याने त्यांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली असून त्यांच्या पग- ारानेही आता दीड ते पावणे दोन लाख रुपयांचा टप्पा गाठला आहे.



पूर्वी ग्रामीण भागात सालगडी सहज उपलब्ध होत असत.म्हणून शेतकऱ्यांना बैल बारदाणा परवडत असत परंतु सध्या आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब होत असल्याने बैलांची जागा ट्रॅक्टरने घेतल्याने शेतकऱ्यांची बैलजोडी नामशेष होण्याच्या मार्गावर आहे.सध्या ट्रॅक्टरने शेतातील सर्व मशागतीची कामे केली जातात परंतु राहिलेले सटरफटर कामेही रोजगाराच्या माध्यमातून केली जातात तरीपण सालगडी मिळणे कठीण झाले आहे.पुर्वी वर्षभर शेतीतील विविध कामे जसे की जनावरांची देखभाल, नांगरणी, पेरणी, कापणी तसेच शेतीची निगा राखणे ही कामे सालगडी करत असत. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीची कामे करणे सोपे जात होते मात्र बदलत्या काळानुसार ग्रामीण भागा- तील युवक शिक्षण व रोजगाराच्या शोधात शहरांकडे वळत असल्याने शेती कामासाठी कायमस्वरूपी मजूर मिळणे खुप अवघड झाले आहे. यामुळे शेतकऱ्यांना शेतीची कामे सुरळीत पार पाडण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. विशेषतः ऊस, सोयाबीन, द्राक्षे व फळबाग यांसारख्या पिकांच्या हंगामात सालगड्यांची गरज अधिक भासते मात्र मजूरटंचाईमुळे अनेक शेतकऱ्यांना शेतीतील कामे करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. दरम्यान, गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर सालगडी ठेवण्यासाठी शेतकऱ्यांमध्ये चढाओढ सुरू झाली आहे.शेतकरी सालगड्यांच्या शोधासाठी गावोगा- वी फिरताना दिसत आहेत. विश्र्वासू आणि मेहनती सालगडी मिळाला तर शेतकरी राहण्याची सोय करून देण्यासह वर्षभरासाठी दीड ते दोन लाख रुपयांपर्यंत मानधन देण्याची तयारी दाखवत आहेत. तरीही योग्य सालगडी मिळत नसल्याची स्थिती निर्माण झाली आहे.

## पानगावच्या श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरामध्ये अखंड हरिनाम सप्ताह व शिव महापुराण कथे ची जय्यत तयारी

**तभा वृत्तसेवा**
**पानगाव, दि. २० मार्च :** रेनापुर तालुक्यातील प्रति पंढरपूर समजल्या जाणाऱ्या पानगाव मध्ये दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विठ्ठल रुक्मिणी मंदिरामध्ये अखंड हरिनाम सप्ताह व शिव महापुराण कथे च्या आयोजनाची तयारी गुढीपाडवा या शुभ मुहूर्तावर ध्वज स्तंभाचे पूजन विठ्ठल रुक्मिणी मंदिर ट्रस्टच्या वतीने करण्यात आले. या सप्ताहाचा प्रारंभ चैत्र शु षष्ठी मंगळवार दिनांक २४ मार्च २०२६ रोजी सुरू होऊन याची सांगता चैत्र शुक्ल त्रयोदशी मंगळवार दिनांक ३१ मार्च २०२६ रोजी सांगता करण्यात येणार आहे या कथेच्या प्रवक्त्या ह भ प साध्वी सोनाली दीदी श्रीक्षेत्र सद्गुरु कल्याण स्वामी संस्थान चकलांबा बीड व कीर्तनकार ह भ



प जयेश महाराज भाग्यवंत ह भ प गुरुराज महाराज देगलूरकर ह भ प कृष्णा महाराज चवरे ह भ प पांडुरंग महाराज घुले ह भ प उमेश महाराज दशरथे ह भ प विजयानंद महाराज सुपेकर ह भ प अनिल महाराज पाटील ह भ प योगीराज महाराज गोसावी पारायण व्यासपीठ प्रमुख ह भ प कांतराव गुरुजी पांडे ह भ प माऊली महाराज इके अंदलगावकर सद्गुरू चिन्मयानंद स्वामी महाराज संस्थान श्रीक्षेत्र दर्जी बोरगाव व्यंकटी महाराज पावडेवाडी कर योगेश महाराज नांदगावकर या सप्ताहातील दैनंदिन कार्यक्रम सकाळी ५ते ७श्री ची महापूजा७:३०ते ११:३० ग्रंथराज ज्ञानेश्र्वरी पारायण ११:३०ते १२गाथा भजन दुपारी १२ते २भोजन २ते ५शिव महापुराण कथा ५:३०ते ६:३०हरिपाठ व धूप आरती ७ते ९ कीर्तन व रात्री ९ते ११ भोजन अशा प्रकारे सार्वजनिक सप्ताह समिती व समस्त गावकरी मंडळ प्रति पंढरपूर पानगाव यांच्याद्वारे या सप्ताहाची जय्यत तयारी होत आहे.

## पैशाच्या कारणावरून एकाचा गळा चिरला



**तभा वृत्तसेवा**
**किनगाव, दि. २० मार्च :** उसने दिलेले पैसे देतो म्हणून फोनवरून बोलवून घेतले. पैशाचा चांगलाच तगदा लावल्याचा राग मनात धरून मंगळवारी रात्री ९वा कारेपूर रोडवर शिविगाळ करत लाथाबुक्याने मारहाण करून रेजर ब्लेडने गळा कापून गंभीर जखमी केले आहे.. जखमीवर प्राथमिक उपचारानंतर अंबाजोगाई शासकिय रुग्णालयात हालविण्यात आले आहे. जखमीच्या जबाबावरून किनगाव पोलीस ठाण्यात मारेकऱ्या विरुद्ध गुरूवार (दि१९ ) रोजी पहाटे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की अहमदपूर तालुक्यातील देवकरा येथील चालक नरसिंग निवृत्ती गुट्टे (वय २६ ) यांनी गोविंद राजू मुंडे रा दगडवाडी यांना ७० हजार रुपये हात उसने दिले होते. या पैशाची मागणी फोनवरून मंगळवार ( दि१७ )रोजी रात्री ९ वा केली तेंव्हा कारेपूर रोडवर बोलवले. तेंव्हा गोविंद मुंडे यांनी तुझे कशाचे पैसे म्हणून शिवीगाळ करत लाथाबुक्याने मारहाण करून रेझर ब्लडने गळ्यावर वारकरूण गंभीर जखमी केले. जखमीस किनगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार करून अंबाजोगाई येथील शासकीय रुग्णालयात पुढील उपचारासाठी हलविण्यात आले. जखमी नरसिंग गुट्टे यांच्या जवाबा वरून किनगाव पोलीस ठाण्यात मारेकरी गोविंद राजू मुंडे यांच्या विरुद्ध गुरूवार (दि१९ ) रोजी पहाटे १.४५ गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक तानाजी वलंमपल्ले हे करीत आहेत ..

## बारावीनंतर करिअरची निवड करताना आवड, क्षमता आणि संधी यांचा संगम साधा : हांडगे

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. २० मार्च :** विद्यार्थ्यांनी आपल्या आवडी-निवडी, क्षमता आणि भविष्यातील उद्दिष्टे लक्षात घेऊन करिअरची निवड करणे अत्यावश्यक आहे. योग्य मार्गदर्शन, तज्ज्ञांचे सल्ले तसेच विविध क्षेत्रांबाबतची सखोल माहिती यांचा योग्य वापर केल्यास विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यासाठी योग्य दिशा निश्चित करता येते, असे प्रतिपादन एमआयटी करिअर गाईडन्स सेलचे प्रमुख श्री. बळीराम हांडगे यांनी केले.

एमआयटी शिक्षण संस्था समूह, लातूर यांच्या वतीने 'बारावीनंतर पुढे काय?' या विषयावर आयोजित करिअर मार्गदर्शन मेळाव्यात श्री बळीराम हांडगे बोलत होते. यावेळी पुणे येथील एडीटी विद्यापीठाचे डॉ. उल्हास माळवदे, प्रा. अमित उत्तरकर तसेच वैद्यकीय मानसशास्त्रज्ञ प्रा. संदेश नागरगोजे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना श्री. हांडगे म्हणाले की, आजच्या स्पर्धात्मक आणि वेगाने बदलणाऱ्या शैक्षणिक युगात बारावीनंतर योग्य करिअर निवड करणे हे विद्यार्थ्यांसाठी मोठे आव्हान ठरत आहे. शिक्षणाच्या विविध शाखा आणि अभ्यासक्रमांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे विद्यार्थ्यांसमोर अनेक पर्याय उपलब्ध झाले आहेत. मात्र या पर्यायांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण होत असून योग्य निर्णय घेणे कठीण जात आहे. विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय, अभियांत्रिकी, फार्मसी, फिजिओथेरपी, बायोटेक्नॉलॉजी, नर्सिंग यांसारख्या क्षेत्रांमध्ये करिअरच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांसाठी सीए, सीएस, बीबीए, बीकॉम, बँकिंग आणि फायनान्स या क्षेत्रांमध्ये उज्ज्वल भविष्य घडवण्याच्या संधी आहेत. कला शाखेतील विद्यार्थ्यांसाठी पत्रकारिता, मानसशास्त्र, समाजशास्त्र, डिझाईन, प्रशासन, शिक्षण व संशोधन अशा विविध क्षेत्रांचे दरवाजे खुले आहेत.



वैद्यकीय शिक्षणाबाबत माहिती देताना श्री. हांडगे यांनी एमबीबीएस, बीडीएस, बीएएमएस, बीएचएमएस, बीपीटी या अभ्यासक्रमांची माहिती सविस्तरपणे दिली. तसेच निट परीक्षेची तयारी, प्रवेश प्रक्रिया आणि देश- विदेशातील शिक्षणाच्या संधी याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

अभियांत्रिकी क्षेत्रातील विविध संधींबाबत डॉ. उल्हास माळवदे आणि प्रा. अमित उत्तरकर यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. संगणक अभियांत्रिकी, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), डेटा सायन्स, मेकॅनिकल, सिव्हिल तसेच इलेक्ट्रॉनिक्स अशा विविध शाखांमध्ये करिअरच्या व्यापक संधी उपलब्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. याशिवाय, जेईई आणि एमएचटी-सीईटी यांसारख्या प्रवेश परीक्षांची तयारी, भविष्यातील तंत्रज्ञानातील प्रगती आणि उद्योजकतेच्या वाढत्या संधी याबाबतही त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

करिअर निवडीत मानसशास्त्राचे महत्त्व अधोरेखित करताना प्रा. संदेश नागरगोजे यांनी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व, आवड आणि क्षमतेनुसार करिअर निवड करण्याचा सल्ला दिला. त्यांनी पालकांनाही विद्यार्थ्यांवर अनावश्यक दबाव टाळून त्यांना प्रोत्साहन देण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याकडे लक्ष देणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

मेळाव्यात आयोजित प्रश्नोत्तर सत्र हे कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम निवड, प्रवेश प्रक्रिया, परदेशातील शिक्षण तसेच योग्य महाविद्यालय निवड यासंदर्भात विविध प्रश्न विचारले. तज्ज्ञांनी या सर्व प्रश्नांची सविस्तर उत्तरे देत विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन परमेश्वर सोनवणे यांनी केले, तर आभार प्रदर्शन मावीय सय्यद यांनी केले. लातूर जिल्हा व परिसरातील विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हिंदू-मुस्लिम ऐक्याचा उत्सव शेख शहाबुद्दिन बाबांचा उरूस

**तभा वृत्तसेवा/रियाज मोमीन**
**वलांडी, दि. २० मार्च :** येथील प्रसिद्ध हजरत शाहबोदिन बाबांचा उरूस यावर्षी १९ मार्च रोजी मोठ्या उत्साहात साजरा झाला. हिंदू- मुस्लिम ऐक्याचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या या उरूसासाठी परिसरातील भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

उरूसानिमित्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. जाती-धर्माचे बंधन विसरून सर्व धर्मीय लोक बाबा शहाबुद्दीन यांना ईश्र्वराचा अंश मानतात. वलांडी मध्ये विविध धर्माचे लोक आज गुण्यागोविंदाने नांदत आहेत. मनापासून श्रद्धा ठेवून जो कोणी श्रद्धाळू दर्ग्यावर माथा टेकण्यासाठी येतो त्याच्या मना- तील सर्व इच्छा पूर्ण करण्याचे कार्य आज पर्यंत ईश्र्वरीय अंश असलेल्या बाबा शहाबुद्दीन यांनी केले आहे. आजपर्यंत कुठलाही भक्त रिकाम्या झोळीने परतला नाही. त्यामुळेच



वलांडी आणि परिसरातील तसेच हैदराबाद नांदेड मुंबई पुणे ला- तूर अशा मोठमोठ्या शहरातून आणि दूर अंतरावरून श्रद्धाळू आ- पली मनोकामना बाबांच्या दरबारात मांडण्यासाठी येतात आणि अनेक श्रद्धाळू मनोकामना पूर्ण झाल्यामुळे बाबांचे आशीर्वाद घेण्यासाठी येतात. सर्व धर्मीय लोक मोठ्या संख्येने संदलसाठी उपस्थित असतात व अतिशय उत्साहात हा संदल संपन्न झाला.दर्गा परिसरात कव्वाली, उरूसाची परंपरागत विधी तसेच भाविकांसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली. १९ मार्च रोजी रात्री ९ वाजता संदल मिरवणूक काढण्यात आली व ती गावातील प्रमुख मार्गांवरून फिरवण्यात आली.

यावेळी परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित हो- ते. यामध्ये वलांडी नगरीचे माजी आमदार धर्माजी सोनकवडे, प्रसिद्ध उद्योजक मोहम्मद रफीक बंबईवाले, माजी सभापती तुकाराम पाटील, सरपंच रामभाऊ भंडारे, माजी सरपंच मोहम्मद शिकुर बौडीवाले, उपसरपंच दिनेश पाटील, तंटामुक्तीचे माजी अध्यक्ष बालाजी सोनकवडे, मोहम्मद रफी सौदागर, महेश बंग, खलील मुंजेवार, अरुण पाटील, यासीन बल्लेबाज, अमीर मोमीन, यासीन मुंजेवार, इस्माल बौडीवाले, इसराइल तांबोळी, नासर पठाण बाबा कादरी, मोहम्मद तांबोळी, शांतेश्र्वर साबणे, दर्गा व्यवस्थापक आजम मुंजेवार व अनेक मान्यवर उपस्थित होते. श्रद्धाळूंसाठी पाणी, प्रकाश व्यवस्था व सुरक्षा यांचीही योग्य ती व्यवस्था करण्यात आली होती.

दरवर्षीप्रमाणे यंदाही उरूस शांततेत आणि उत्साहात पार पडला. यासाठी उरूस कमिटी व ग्रामस्थांकडून विशेष प्रयत्न केले गेले.

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी**
**शिरूर अनंतपाळ यांचे कार्यालय**
**(दंडीय - विभाग)**
**जा. क्र.२०. मएजी/कावि दि.:-//२०२६**

### जाहिर प्रगटन

**जन्म/ मृत्यु नोंदणी बाबत.**

श्री. कासीम दावलजी पटेल विरुध्द ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय तुरुकवाडी ज्याअर्थी नामे, शमाफरहीन कासीम पटेल रा. तुरुकवाडी ता. शिरूर अ. रोजी जि. ला- तूर यांचा/ यांच्या मुलाचा/मुलीचा/माताचा/नातीचा जन्म दि. १४/०६/१९८२ मौजे. तुरुकवाडी ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर येथे झाला आहे. ज्याअर्थी अर्जदार कासीम दावलजी पटेल रा. तुरुकवाडी यांनी या न्यायालयात त्यांच्या मुलाच्या/मुलीच्या/ नाताच्या/नातीच्या जन्माची नोंद करण्यासाठी आदेशीत करावे असा अर्ज दाखल केला आहे. त्या पृष्ठयार्थ त्यांनी शपथपत्र व ग्रामपंचायत कार्यालय तुरुकवाडी ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर येथे त्यांच्या जन्माबाबतची नोंद नसल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडलेले आहे.

त्याअर्थी सदरहू नामे शमाफरहीन कासीम पटेल रा. तुरुकवाडी ता. शिरूर अनतपाळ जि. लातूर हयाचा/ हिचा जन्म दिनांक. १४/०६/१९८२ रा. तुरुकवाडी रोजी झाला नाही, असे कोणास सांगावयाचे असेल, तर या जाहीरनाम्याच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू नामे शमाफरहीन कासीम पटेल रा. तुरुकवाडी ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर यांचा जन्म तारखेबाबत लागलहीच पुरावा घेवून अर्जदाराच्या हक्कात सदरहू जन्म तारखेबाबत आदेश देण्यात येईल.पुढील तारीख १५ दिवसानंतर

स्वाक्षरित/-
**तहसिलदार तथा**
**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**शिरूर अनंतपाळ**

CMYK

धाराशिव

# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## भरधाव मोटारसायकल अपघातात तरुणाचा मृत्यु

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० मार्च -**

लोहारा तालुक्यातील विलासपूर पांढरी ते माळेगाव रस्त्यावर भरधाव व निष्काळजीपणे मोटारसायकल चालवताना झालेल्या अपघातात एका तरुणाचा मृत्यू झाला. मनोज उर्फ पिंटू साहेब गर्जे (वय ३५, रा. माळेगाव ता. लोहारा, जि. धाराशिव) हे दि. १८ मार्च २०२६




रोजी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास एमएच २५ एई ७६२४ क्रमांकाच्या मोटारसायकलवरून जात होते.

दरम्यान, त्यांनी मोटारसायकल हायगतीने व निष्काळजीपणे चालविल्याने तोल जाऊन ते रस्त्यावर पडले. या अपघातात गंभीर दुखापत होऊन त्यांचा मृत्यू झाला.

या प्रकरणी यशवंत साहेब गर्जे (वय ४०) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून लोहारा पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.



## दूषित पाणी पुरवठा विरोधात महाविकास आघाडीचे तुळजापूरात आंदोलन





**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२० मार्च -**

शहरात वाढत्या अस्वच्छतेच्या सम स्येसह दूषित पाणी पुरवठ्याच्या विरोधात महाविकास आघाडीच्या वतीने नगर परिषदेसमोर लाक्षणिक धरणे आंदोलन करण्यात आले.

शहरातील नाल्या तुंबून दुर्गंधी पसरली असून नाल्यातील सांडपाणी रस्त्यावर वाहत आहे. तसेच पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपलाईनमधील वाल्व्हमधून दूषित पाणी नागरिकांच्या नळांपर्यंत पोहोचत असल्याचा आरोप करण्यात आला. दूषित पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असून अनेकांना विविध आजारांचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे तात्काळ स्वच्छ पिण्याचे पाणी पुरवावे व शहरातील अस्वच्छता दूर करावी, अशी प्रमुख मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

यावेळी पाणीपुरवठ्याची लॅब तपासणी करून त्याचा अहवाल जाहीर करावा, कचरा नियमितपणे उचलावा, रस्ते व गटारांची स्वच्छता करावी, तसेच घंटागाडी नियमित चालवावी, अशा मागण्याही करण्यात आल्या.

संबंधित ठेकेदारांकडून कामात हलगर्जीपणा होत असल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. आंदोलनानंतर मुख्याधिकाऱ्यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले असून त्या तात्काळ मार्गी लावाव्यात, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.

या आंदोलनात अमर मगर, नगरसेवक अमोल कुतवळ, आनंद जगताप, रणजीत इंगळे, अक्षय कदम, रवींद्र इंगळे, सुधीर कदम, अमर चोपदार, गणपत कदम, नागनाथ भांजी, बालाजी तट, किरण यादव, गोरक्षनाथ पवार, रवींद्र साळुंके, ऋषिकेश मगर, विनोद सोंजी, सुनील शिंदे, चिन्मय मगर, एन. व्ही. इंगळे, मोहन पांढरे, रत्नदीप पाटील, अर्जुन साळुंके, गणेश इंगळे आदींसह अनेक कार्यकर्ते सहभागी झाले होते.

### जिल्ह्यातील ग्रामपंचायत पोटनिवडणुकांचा बिगुल...

## आचारसंहितेच्या काटेकोर अंमलबजावणीसाठी अधिकाऱ्यांची नियुक्ती

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० मार्च -**

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्या आदेशानुसार ग्रामपंचायतीतील सदस्य व थेट सरपंच पदे रिक्त झाल्याने पोटनिवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

निधन, राजीनामा, अनर्हता किंवा इतर कारणांमुळे रिक्त झालेल्या पदांसाठी ही निवडणूक प्रक्रिया पारंपरिक पद्धतीने राबविण्यात येणार आहे.

यासाठी संबंधित तालुक्यातील ग्रामपंचायतींची यादी व सविस्तर निवडणूक कार्यक्रम ई-मेलद्वारे




पाठविण्यात आला असून, निवडणूक प्रक्रिया अधिकृतपणे सुरू करण्यात आली आहे. दरम्यान, पोटनिवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आदर्श आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी पंचायत समिती स्तरावर गटविकास अधिकाऱ्यांची आचारसंहिता प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

या माध्यमातून निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता व शिस्त राखण्यावर भर दिला जाणार आहे.

तालुकानिहाय धाराशिव, तुळजापूर, उमरगा, लोहारा व कळंब येथील पंचायत समितींचे गटविकास अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली असून, त्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील ग्राम पंचायतींमध्ये आचारसंहितेचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.

तसेच आयोगाकडून वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

## मैलारपुर येथे मोफत पानपोईचा शुभारंभ; प्रवाशांना दिलासा



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२० मार्च -**

श्रीक्षेत्र मैलारपुर येथे राष्ट्रीय महामार्गालगत छत्रपती शिवाजी महाराज चौकात सामाजिक कार्यकर्ते महेश कोप्पा पाटील यांच्या पुढाकारातून 'महात्मा बसवेश्वर महाराज मोफत पानपोई' सुरू करण्यात आली आहे. या उपक्रमाचा लाभ प्रवासी, भाविक, शेतकरी व पशुपालकांना होणार असल्याचे नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी सांगितले.

कडक उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी या उद्देशाने ही पानपोई सुरू करण्यात आली असून, दि.२० मार्च रोजी बसवराज धरणे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. यावेळी पाणीपुरवठा समिती सभापती तानाजी जाधव, नगरसेवक आकाश कुलकर्णी, विनायक अहंकारी, सुधीर हजारे, पद्माकर घोडके, बंडप्पा कसेकर, उत्तम बनजगोळे, अतुल हजारे आदींसह नागरिक उपस्थित होते.

यावेळी बोलताना बसवराज धरणे म्हणाले, तहानलेल्या व्यक्तींना पाणी पाजणे हे मोठे पुण्याचे कार्य असून महेश कोप्पा पाटील यांनी सुरू केलेला हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी आहे. तसेच विनायक अहंकारी यांनीही या कार्याचे कौतुक केले.

## वाशी तालुक्याला विजांच्या कडकडाटासह अवकाळी पावसाचा तडाखा

### रब्बी पिकांसह फळबागांचे नुकसान...


**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२० मार्च -**

शेतकऱ्यांना एकामागून एक संकटांचा सामना करावा लागत असताना अवकाळी पावसाने पुन्हा एकदा अडचणीत भर टाकली आहे. दि. १९ मार्च रोजी धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यात विजांच्या कडकडाटासह अवकाळी पावसाने हजेरी लावली.

या पावसाचा फटका फळबागांसह ज्वारी, गहू व हरभरा या रब्बी पिकांना







बसला आहे. मागील दोन-तीन दिवसांपासून सुरू असलेल्या ढगाळ वातावरणामुळे आणि हवामानातील सततच्या बदलांमुळे फळबागांवर रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याची भीती व्यक्त होत आहे.

दरम्यान, काढणी करून शेतात ठेवलेली ज्वारी, गहू व हरभरा पिके वाचवण्यासाठी शेतकऱ्यांची मोठी धावपळ उडाली. काही ठिकाणी पिके झाकण्यासाठी शेतकरी प्रयत्न करताना दिसून आले. मात्र, पावसामुळे भिजलेल्या ज्वारीचे दाणे काळसर पडत असल्याने शेतकरी चिंतेत आहेत.

## नळदुर्ग येथे वधुवर मेळावा उत्साहात; संवादातून विवाह जुळवण्याचे आवाहन



**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.२० मार्च -**

ब्राह्मण समाजात विवाह जुळवणे दिवसेंदिवस कठीण होत असून, वधू-वरांनी प्रत्यक्ष भेटून संवाद साधल्यास विवाह जुळवणे सोपे होईल, असे मत ब्रह्मवार्ता वधुवर संस्थेचे संचालक श्रीराम विद्वत यांनी व्यक्त केले.

ते नळदुर्ग येथे तुळजाई वधू-वर सूचक मंडळाच्या वतीने आयोजित पहिल्या वधुवर मेळाव्यात प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर पुरुषोत्तम कुलकर्णी, प्रवीण कुलकर्णी तसेच अजय अणदुरकर उपस्थित होते. श्रीराम विद्वत पुढे म्हणाले की, पूर्वी नातेवाईकांच्या माध्यमातून विवाह सहज जुळत असत; मात्र सध्या केवळ फोनवर चौकशी करण्याच्या पद्धतीमुळे विवाह जुळण्यात अडचणी येत आहेत. त्यामुळे वधू-वरांनी परिचय मेळाव्यात सहभागी होऊन प्रत्यक्ष भेटीगाठींवर भर द्यावा. तसेच वाढत्या फसवणूक प्रकारांमुळे समाजाने अधिक जागरूक राहण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी अजय अणदुरकर यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रवीण कुलकर्णी यांनी केले, तर आभार माऊली शेळके यांनी मानले. मेळावा यशस्वी करण्यासाठी विकी हजारे, प्रदीप ग्रामोपाध्ये, राजू वैद्य, अरुण जोशी, नंदू जोशी, अश्विनी भूमकर, रामदासी, चिन्मय कुलकर्णी, अजय कुलकर्णी आदींनी परिश्रम घेतले.

मेळाव्यास वधू-वर व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महात्मा बसवेश्वर मंदिर सभामंडपासाठी भूमिपूजन



**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२० मार्च -**

लोहारा शहरातील महात्मा बसवेश्वर मंदिर येथे सभामंडप बांधकामासाठी १ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून, या कामाचे भूमिपूजन दि.१९ मार्च रोजी पार पडले. हा निधी तत्कालीन आमदार ज्ञानराज चौगुले यांच्या प्रयत्नातून नगरविकास विभागाच्या योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आला आहे.

भूमिपूजन समारंभ जेवळी मठाचे म.नि.प्र. गंगाधर महास्वामी यांच्या प्रमुख उपस्थितीत ज्ञानराज चौगुले यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी नगराध्यक्षा वैशाली खराडे, उपनगराध्यक्ष अमीन सुंबेकर, तालुकाप्रमुख जगन्नाथ पाटील, उपजिल्हाप्रमुख शब्बीर गवंडी, नगरसेवक विजयकुमार ढगे, आरिफ खानापुरे, अविनाश माळी, के.डी. पाटील, गौस मोमिन, जालिंदर कोकणे, श्रीकांत भरारे, दिपक रोडगे, सारिका बंगले, ओम कोरे आदींसह बसवेश्वर पंच कमेटीचे पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

## मारुती बनसोडे यांना राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२० मार्च -**

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार २०२३-२४ साठी नळदुर्ग येथील परिवर्तन सामाजिक संस्थेचे संस्थापक सचिव व सामाजिक कार्यकर्ते मारुती बनसोडे यांची निवड करण्यात आली आहे.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्म शताब्दी वर्षात अंधश्रद्धा निर्मूलनासाठी १०१ व्याख्यानांचा संकल्प पूर्ण करणारे बनसोडे यांनी पोतराज प्रथा निर्मूलन, पशुहत्या विरोधी आंदोलन तसेच व्यसनमुक्ती अभियानात उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांनी डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्यासोबतही कार्य केले असून परिवर्तन सामाजिक संस्थेच्या माध्यमातून जिल्ह्यात विविध उपक्रम राबवले आहेत.

त्यांच्या कार्याची दखल घेत शासनाने १८ मार्च २०२६ रोजी जाहीर केलेल्या निर्णयाद्वारे हा पुरस्कार जाहीर केला असून धाराशिव जिल्ह्यातून ते एकमेव मानकरी ठरले आहेत. त्यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## घरासमोरून मोटारसायकल चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० मार्च -**

कळंब तालुक्यातील वाघोली येथे घरासमोर उभी असलेली मोटारसायकल अज्ञात चोरट्यांनी पळविल्याची घटना घडली आहे. बबन महादेव लोहार (वय ४३) यांची स्प्लेंडर प्लस (क्र. एम एच २५ एव्हाय ६३७०) ही सुमारे ४० हजार रुपये किमतीची मोटारसायकल दि. १६ मार्च रोजी पहाटे ३.३० ते सकाळी ८ वाजण्याच्या दरम्यान चोरीस गेली.

## धाराशिवमध्ये संस्कार भारतीतर्फे गुढीपाडवा उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० मार्च -**

देवगिरी प्रांत अंतर्गत धाराशिव जिल्हा संस्कार भारती समितीच्या वतीने गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर शहरातील श्री स्वामी समर्थ मंदिर, संभाजी नगर व श्रीराम मंदिर, समर्थ नगर येथे आकर्षक रांगोळ्या रेखाटून दीपोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमात कला साधकांनी पारंपरिक व देखण्या रांगोळ्यांद्वारे सणाचे सौंदर्य खुलवले. मंदिर परिसरात दीपप्रज्वलन करून मंगलमय वातावरण निर्माण करण्यात आले.



यावेळी देवगिरी प्रांत सह महामंत्री डॉ. सतीश महामुनी, दृष्य कला संयोजक शेषनाथ वाघ, छायाचित्र संयोजक पद्माकर मोकाशे, श्री स्वामी समर्थ मंदिराचे विश्वस्त अमर पाटील, राहुल पताले, दयानंद काकडे तसेच श्रीराम मंदिराचे विश्वस्त रघुराज कुलकर्णी, श्रीपाद देशपांडे उपस्थित होते. तसेच जिल्हा संरक्षक अनिल ढगे, प्रभाकर चोराखळीकर, जिल्हाध्यक्ष श्यामसुंदर भन्साळी, जिल्हा उपाध्यक्ष प्रफुल्लकुमार शेटे, प्रविण गोरे, अरविंद पाटील, सुरेश वाघमारे, लक्ष्मीकांत सुलाखे, शरद वडगाकर, शहर सचिव गणेश कसपटे यांच्यासह अनेक कला साधक उपस्थित होते.

श्रीराम मंदिर येथे संस्कार भारतीचे ध्येयगीत सादर करण्यात आले. तसेच पुढील वर्षाच्या नियोजनाबाबत छोटेखानी बैठक घेऊन गुढीपाडव्याच्या प्रसाद वितरणाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## नवोदय प्रवेशाचा तडवळा पॅटर्न : तब्बल २७४ विद्यार्थी नवोदय विद्यालयात!

**यंदा शाळेचे १४ विद्यार्थी नवोदय विद्यालय प्रवेश पात्र ...**

**४० वर्षांपूर्वी सुरु आहे नवोदय प्रवेशासाठी कसबे तडवळा गाव अग्रेसर...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० मार्च -**

तालुक्यातील कसबे तडवळे हे छोटेसे गाव आज नवोदय प्रवेशाचा तडवळा पॅटर्न म्हणून राज्यभर चर्चेत आले आहे. ग्रामीण भागातूनही गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या जोरावर मोठे यश मिळू शकते, याचे उदाहरण या गावाने पुन्हा एकदा दाखवून दिले आहे. यंदाच्या वर्षीही जिल्हा परिषद शाळेचे तब्बल १४ विद्यार्थी जवाहर नवोदय विद्यालय प्रवेशासाठी पात्र ठरले असून, गावाच्या शैक्षणिक परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

तुळजापूर येथील नवोदय विद्यालय स्थापनेपासून आतापर्यंत या गावातून एकूण २७४ विद्यार्थी प्रवेशित झाले आहेत.

ग्रामीण भागातील एका गावातून इतक्या मोठ्या संख्येने विद्यार्थी नवोदयमध्ये प्रवेश मिळवणारे कसबे तडवळे हे कदाचित देशातील एकमेव गाव असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे तडवळा पॅटर्न हा शब्दच आता यशस्वी शैक्षणिक मॉडेल म्हणून ओळखला जाऊ लागला आहे. ग्रामीण भागातील हुशार व गुणवंत विद्यार्थ्यांना मोफत व दर्जेदार शिक्षण मिळावे या उद्देशाने माजी पंतप्रधान राजीव गांधी यांनी १९८६ साली जवाहर नवोदय विद्यालयांची संकल्पना राबवली. आज देशभरात ६४९ नवोदय विद्यालये कार्यरत असून, इयत्ता सहावीमध्ये प्रवेशासाठी दरवर्षी राष्ट्रीय स्तरावर परीक्षा घेतली जाते. प्रत्येक जिल्ह्यातून केवळ ८० विद्यार्थ्यांची निवड होत असल्याने ही परीक्षा अत्यंत स्पर्धात्मक मानली जाते.

तडवळे गावाचा हा यशस्वी प्रवास १९८६ पासून सुरू झाला. त्या पहिल्या वर्षी प्रमिला खलीपे आणि दीपक ननवरे हे दोन विद्यार्थी नवोदय प्रवेशासाठी पात्र ठरले होते. त्यानंतर हा प्रवास कधीच थांबला नाही. जिल्हा परिषद आदर्श कन्या प्राथमिक शाळेचे ज्येष्ठ शिक्षक जगन्नाथ धायगुडे यांच्या मार्गदर्शनाखाली या चळवळीला वेग आला. त्यांच्या प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक तयारीची सवय लागली आणि गावात शिक्षणाची मजबूत पायाभरणी झाली.

आज परिस्थिती अशी आहे की, गेल्या २१ वर्षांपासून दरवर्षी दहा ते पंधरा विद्यार्थी नवोदय प्रवेशासाठी पात्र ठरत आहेत. यंदाही ही परंपरा कायम ठेवत १४ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. धाराशिव तालुक्यातून एकूण २० विद्यार्थी निवडले गेले असून, त्यापैकी १४ विद्यार्थी हे एकट्या तडवळे गावातील जिल्हा परिषद शाळेचे आहेत, ही बाब विशेष उल्लेखनीय आहे.

या यशामागे केवळ विद्यार्थ्यांची मेहनत नाही, तर मुख्याध्यापक, तज्ञ शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती आणि पालक यांचे एकत्रित प्रयत्न आहेत. विद्यार्थ्यांना लहान वयापासून योग्य मार्गदर्शन, सराव आणि आत्मविश्वास दिला जातो. त्यामुळे ग्रामीण पार्श्वभूमी असूनही हे विद्यार्थी स्पर्धात्मक परीक्षांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करू शकतात, हे सिद्ध झाले आहे.

कसबे तडवळे हे गाव आज प्राथमिक शिक्षणाची पंढरी म्हणून ओळखले जाऊ लागले आहे, तर जगन्नाथ धायगुडे यांना तडवळा पॅटर्नचे जनक म्हणून मान मिळत आहे. गावाच्या या यशोगाथेमुळे इतर ग्रामीण भागांनाही प्रेरणा मिळत असून, शिक्षणाच्या माध्यमातून प्रगतीचा मार्ग खुला होऊ शकतो, हा संदेश या यशातून अधोरेखित झाला आहे.

## बंद घर फोडून चोरी; सोन्याचे दागिने व रोख रक्कम लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० मार्च -**

धाराशिव तालुक्यातील चिखली येथे बंद घर फोडून चोरी झाल्याची घटना उघडकीस आली आहे. श्रीकृष्ण विठ्ठल काकडे



(वय ५४, रा. चिखली ता. जि. धाराशिव) यांच्या घराचे कुलूप अज्ञात चोरट्यांनी दि. १६ मार्च २०२६ रोजी पहाटे १ ते ६ वाजण्याच्या दरम्यान तोडून घरात प्रवेश केला.

यावेळी चोरट्यांनी घरातील सुमारे १३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व ५ हजार रुपये रोख रक्कम असा एकूण ६७ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला.

या प्रकरणी श्रीकृष्ण काकडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून बेंबळी पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## धाडसी दरोडा; भरदिवसा महिलेला लुटले

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२० मार्च -**

वाशी तालुक्यातील इंदापूर शिवारात एका महिलेची सोन्याची साखळी हिसकावून नेल्याची घटना घडली आहे. मिराबाई विष्णु गोरे (वय ४५, रा. इंदापूर ता. वाशी, जि. धाराशिव) या दि. १९ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजण्याच्या सुमारास इंदापूर ते वाशी रस्त्यावरील



पुलाजवळून शेतात जात असताना ही घटना घडली.

मोटारसायकलवरून आलेल्या तीन अज्ञात इसमांनी त्यांच्या गळ्यातील सुमारे ४ ग्रॅम वजनाचे, अंदाजे १६ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने जबरदस्तीने हिसकावून घेतले आणि घटनास्थळावरून पसार झाले.

या प्रकरणी मिराबाई गोरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वाशी पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

## संक्षिप्त वृत्त...



### सय्यद हिप्परगा येथे बौद्ध विहारासाठी भूमिपूजन

**लोहारा, दि.२० मार्च -**

शिवसेना उपनेते तथा माजी आमदार ज्ञानराज चौगुले यांच्या प्रयत्नातून लोहारा तालुक्यातील सय्यद हिप्परगा येथे अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्तीच्या विकासासाठी बौद्ध विहार बांधकामासाठी १० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या कामाचे भूमिपूजन दि.१९ मार्च रोजी ज्ञानराज चौगुले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पंचायत समिती सभापती पल्लवी जानकर, शिवसेना जिल्हाप्रमुख मोहन पणुरे, तालुकाप्रमुख जगन्नाथ पाटील, पंचायत समिती सदस्य नागनाथ पाटील, सरपंच श्रीशैल ओवांडे, उपतालुका प्रमुख परमेश्वर साळुंखे, उपसरपंच गुरुनाथ यादव, राजेंद्र माळी, संदीपान बनकर, नागेश पनुरे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.



### अद्वैत कोळीची नवोदय विद्यालयासाठी निवड; शाळेत सत्कार

**उमरगा, दि.२० मार्च -**

येथील स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिरमध्ये इयत्ता पाचवीत शिक्षण घेत असलेला अद्वैत वाल्मीक कोळी याची नवोदय विद्यालयासाठी निवड झाली आहे. सन २०२५-२६ मधील नवोदय प्रवेश परीक्षेत अद्वैत वाल्मीक कोळी याने उल्लेखनीय यश संपादन केले. त्यानिमित्त शाळेत सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. मुख्याध्यापिका सविता लोहार व गोपाळ आष्टे यांच्या हस्ते त्याचा सत्कार करण्यात आला. यावेळी मार्गदर्शक शिक्षक बेबी सरोजा पवार, भागीरथी शिंदे, नागनाथ तांबोळी यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. चंद्रकांत महाजन, अध्यक्ष मल्लिकार्जुन आप्पा दंडगे, डॉ. कपिल महाजन, राजा देशट्टी, प्रवीण अनुदुरकर, प्रमोद कुलकर्णी, तसेच सविता लोहार, गोपाळ आष्टे, दत्तात्रय कोकणे आदींनी अभिनंदन केले.

### पृथ्वीराज जमादार नवोदय विद्यालय प्रवेशासाठी पात्र

**तुळजापूर, दि.२० मार्च -**

सलगरा दिवटी येथील जिल्हा परिषद प्रशालेचा विद्यार्थी पृथ्वीराज कैलास जमादार याने आपल्या मेहनत,



चिकाटी आणि गुणवत्तेच्या जोरावर जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत यश संपादन केले आहे. पृथ्वीराज हा जिल्हा परिषद प्रशाला, सलगरा दिवटी येथे शिक्षण घेत असून, त्याने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही अभ्यासावर लक्ष केंद्रित करत हे यश मिळवले आहे. त्याच्या या यशामागे शिक्षकांचे मार्गदर्शन आणि कुटुंबियांचा पाठिंबा मोठा ठरला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल त्याचे आई-वडील कैलास जमादार व रेश्मा जमादार, महादेव, सुखदेव, परमेश्वर, भीमाशंकर आणि संपूर्ण जमादार परिवाराने अभिनंदन केले आहे.



### नागूर येथे 'पुस्तकाची गुढी' उपक्रमातून वाचनाचा संदेश

**लोहारा, दि.२० मार्च -**

लोहारा तालुक्यातील नागूर येथे गेल्या पाच वर्षांपासून गुढीपाडव्याच्या निमित्ताने 'पुस्तकाची गुढी' उभारण्याची अनोखी परंपरा जपली जात आहे. अस्मिता बहुउद्देशीय सामाजिक संस्था व महाराष्ट्र साहित्य कला संघाच्या वतीने साहित्यिक प्रा. यशवंत चंदनशिवे यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात येतो. गुढी पारंपरिक पद्धतीने उभारतानाच त्यात पुस्तकांचा समावेश करून विधिवत पूजा करण्यात येते. यावेळी प्रा. यशवंत चंदनशिवे यांनी नागरिकांना व तरुणांना वाचनाची सवय लावण्याचे आवाहन केले. कार्यक्रमास बब्रुवान जावळे, गुडू जाधव, शरद पाटील, बाळासाहेब जाधव, बबलू कपाळे, संजय जावळे, बाळासाहेब चंदनशिवे, वरवटे, आराध्या चंदनशिवे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

### विजय महानुर यांचे निधन

**लोहारा, दि.२० मार्च -**

लोहारा शहरातील भाजपाचे ज्येष्ठ नेते तसेच



शहरातील लोक वाचनालयाचे सेवक कै. विजय अण्णा महानुर (वय ५२) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. दि.२० मार्च रोजी सकाळी सुमारे ११ वाजता लोहारा येथील हिंदू स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी व भाऊ असा परिवार आहे.

# ग्रामीण शिक्षणाचा झेंडा उंचावला; ८० पैकी ७७ विद्यार्थ्यांची निवड

## नवोदय प्रवेशात जिल्हा परिषद शाळांचा दबदबा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० मार्च -**

जिल्ह्यातील जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश प्रक्रियेत यंदा जिल्हा परिषद शाळांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. इयत्ता सहावीकरिता उपलब्ध असलेल्या ८० जागांपैकी तब्बल ६६ विद्यार्थी जिल्हा परिषद शाळांमधून निवड झाले आहेत. विशेष म्हणजे, एकूण ८० पैकी ७७ विद्यार्थी ग्रामीण भागातील असून, हे ग्रामीण शिक्षणाच्या वाढत्या गुणवत्तेचे द्योतक मानले जात आहे.

तालुकानिहाय निकालात धाराशिव तालुक्यातून २०, तुळजापूर १८, कळंब १३, उमरगा ७, भूम ७, लोहारा ७, वाशी ४ आणि परंडा ४ अशा एकूण ८० विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. यामध्ये जिल्हा परिषद शाळांचा मोठा वाटा असून धाराशिव तालुक्यातील २० पैकी १८, तुळजापूर १८ पैकी १६, कळंब १३ पैकी १२, उमरगा ७ पैकी ४, भूम ७ पैकी ४, लोहारा ७ पैकी ५, वाशी ४ पैकी २ आणि परंडा ४ पैकी सर्व ४ विद्यार्थी जिल्हा परिषद शाळांमधून निवड झाले आहेत. मागील वर्षी ६३ विद्यार्थ्यांची निवड झाली होती, तर यंदा हा आकडा वाढून ६६ वर पोहोचला आहे. त्यामुळे जिल्हा परिषद शाळांच्या कामगिरीत लक्षणीय सुधारणा झाल्याचे स्पष्ट झाले आहे. विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवण्यासाठी आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची गोडी लागावी यासाठी जिल्हा परिषदेतर्फे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये जिल्हा स्वनियोजित निधीतून OMR आधारित दोन सराव परीक्षांचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाचा सकारात्मक परिणाम दिसून आला असून, यामुळेच विद्यार्थ्यांच्या यशात वाढ झाल्याचे मानले जात आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल जिल्हा परिषद अध्यक्षा अर्चनाताई पाटील, उपाध्यक्ष उषाताई गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, शिक्षणाधिकारी डॉ. रवींद्र खंदारे आणि उपशिक्षणाधिकारी कैलास पिकवणे यांनी विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे आणि पालकांचे अभिनंदन केले आहे.

सर्व संबंधितांच्या मार्गदर्शनाखाली आणि शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नांमुळे जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी ही कामगिरी साध्य केली असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या यशामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची स्पर्धात्मक क्षमता अधोरेखित झाली असून, भविष्यातही अशीच कामगिरी कायम राहील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.



## कला केंद्रांच्या आड देहव्यापाराचा घृणास्पद प्रकार उघड; ९ जणांविरुद्ध गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० मार्च -**




जिल्ह्यातील काही कला केंद्रांच्या आड देहव्यापार चालवून एका विवाहित महिलेला जबरदस्तीने वेश्या व्यवसाय करायला भाग पाडल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. पीडित महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी ९ जणांविरुद्ध गुन्हा नोंद केला आहे.

फिर्यादीनुसार, संबंधित महिलेला धाराशिव जिल्ह्यातील पिंजरा, महाकाली व साई कला केंद्र तसेच लातूर जिल्ह्यातील बुधडा कला केंद्र येथे जबरदस्तीने ठेवून मारहाण करण्यात आली. ग्राहकांकडून पैसे घेऊन तिच्याकडून देहव्यापार करून घेतल्याचेही तिने तक्रारीत नमूद केले आहे. या प्रकरणामुळे जिल्ह्यातील कला केंद्रांबाबत सुरू असलेल्या वादाला अधिकच तोंड फुटले आहे. महाकाली केंद्र वगळता इतर संबंधित केंद्रांचे परवाने जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी, पोलिस अधीक्षक रितु खोखर यांच्या अहवालानंतर कायमस्वरूपी रद्द केले आहेत. या प्रकरणात प्रतापराव सरनाईक यांनीही दोषींवर कठोर कारवाईचे निर्देश दिले असून, उच्चस्तरीय चौकशीची मागणी होत आहे. दरम्यान, पीडितेच्या तक्रारीवरून पिटा कायदा तसेच भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये वालचंदनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास धाराशिव ग्रामीण पोलिसांकडे वर्ग करण्यात आला आहे. या प्रकरणी सोनाली वाघ, सचिन कापसे, सोनाली कापसे, अजय कापसे, माधुरी गिरी, अनिता कापसे, कविता कोळपेकर, अंजली आदींसह ९ संशयितांविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

या रॅकेटमध्ये आणखी कोणी सहभागी आहे का? याचा तपास पोलिस प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

## अवकाळी पावसाने चिवरी परिसरातील द्राक्ष बागांचे मोठे नुकसान



**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.२० मार्च -**

काल झालेल्या अवकाळी पाऊस, गारपीट व जोरदार वाऱ्यामुळे चिवरी परिसरातील द्राक्ष बागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या परिसरात द्राक्ष शेती मोठ्या प्रमाणावर होत असून येथील द्राक्षांची निर्यातही केली जाते. मात्र अचानक झालेल्या हवामान बदलामुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे.

गारपीटीमुळे द्राक्षांचे घड तुटून पडले असून अनेक ठिकाणी वेलींनाही हानी पोहोचली आहे. वाऱ्यामुळे बागांची रचना विस्कळीत झाली आहे. याशिवाय आंबा, ज्वारी व गहू पिकांचेही मोठे नुकसान झाले आहे.

या नैसर्गिक आपत्तीमुळे हतबल झालेल्या शेतकऱ्यांनी तात्काळ पंचनामा करून नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे. प्रशासनाने परिस्थितीचा आढावा घेऊन लवकरात लवकर मदत जाहीर करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## धाराशिवमध्ये गूढ आवाजाने खळबळ; प्रशासनाकडून तपास सुरू

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० मार्च -**

शहरासह संपूर्ण जिल्ह्यात आज सकाळी सुमारे ११.५२ वाजता अचानक प्रचंड गूढ आवाज ऐकू आल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. स्फोटासारखा किंवा आकाशात काहीतरी घडल्यासारखा हा आवाज असल्याची चर्चा विविध भागांत सुरू आहे. काही ठिकाणी जमीन हादरल्यासारखीही नागरिकांना जाणवले.



या घटनेनंतर काही काळ नागरिकांमध्ये घबराट पसरली असून अनेकांनी घराबाहेर येत काय घडले याची चौकशी केली. काही भागांत घरांच्या काचा थरथरल्याची माहितीही समोर आली आहे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने घटनेची दखल घेत तात्काळ माहिती संकलन सुरू केले आहे. हा प्रकार भूकंपामुळे झाला का, याची पडताळणी सुरू असली तरी प्राथमिक माहितीनुसार भूकंपाची कोणतीही अधिकृत नोंद झालेली नाही.

भूगर्भशास्त्र विभाग व हवामान खात्याशी संपर्क साधून अधिक माहिती घेतली जात आहे. अशा प्रकारचे आवाज कधी कधी ध्वनीलहरी, सुपरसॉनिक विमानांची हालचाल किंवा वातावरणातील दाबबदलामुळेही होऊ शकतात. दरम्यान, प्रशासनाने नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवता शांतता राखण्याचे आवाहन केले आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाची २२ मार्चला जिल्हा आढावा बैठक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० मार्च -**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) यांच्या वतीने जिल्ह्यातील पक्ष संघटना अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीत पक्षाच्या कामकाजाचा आढावा घेऊन आगामी धोरणांवर चर्चा करण्यात येणार आहे.



ही बैठक पक्षाचे जिल्हा निरीक्षक रवींद्र पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विविध फ्रंटल सेलचे पदाधिकारी सहभागी होणार आहेत. सदर बैठक रविवार, दि.२२ मार्च रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आली आहे. बैठकीत पक्ष संघटन वाढ, आगामी निवडणुकांची तयारी तसेच स्थानिक प्रश्नांवर सविस्तर चर्चा होणार आहे.

जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी या बैठकीस उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.

## सुजितसिंह ठाकूर यांच्या उपस्थितीत असंख्य कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२० मार्च -**

भारतीय जनता पक्षाच्या विचारधारेवर विश्वास ठेवून अनेक कार्यकर्त्यांनी पक्षात प्रवेश केला. या प्रवेश कार्यक्रमात भाजपा नेते व माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांच्या हस्ते धाराशिव जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष व विद्यमान सदस्य धनंजय सावंत यांचा सत्कार करण्यात आला.




धनंजय सावंत यांच्या नेतृत्वाखाली जयदेव गोफणे, महादेव वळेकर, योगेश राऊत, शशीकांत खुने, नानासाहेब कातुरे, अशोक राऊत, बंडू अप्पा बानगुडे, बालाजी जगताप, महेश अंधारे, सुधीर रोडगे, सुधीर लटके, विष्णू पवार, राजेंद्र कुदळे, ज्ञानेश्वर अंधारे, अभिजीत गवारे, राहुल वाघमारे, भारत बानगुडे, दिनेश पाटील, कुमार गटकुळ, विशाल शिंगटे, प्रशांत खरसडे आदींनी भाजपा मध्ये प्रवेश केला.

कार्यक्रमास तालुकाध्यक्ष अरविंदबप्पा रगडे, उपनगराध्यक्ष समरजीतसिंह ठाकूर, जिल्हा सरचिटणीस ॲड. गणेश खरसडे, विकास कुलकर्णी, ॲड. जहीर चौधरी, शहराध्यक्ष उमाकांत गोरे, धनाजी गायकवाड, तानाजी पाटील, तुकाराम हजारे, तानाजी घोडके, तुषार नेटके, नागेश गर्जे आदींसह महिला पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी ठाकूर यांनी स्वागत करून शुभेच्छा दिल्या.

## मुस्कान पठाण हिची निवड

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.२० मार्च -**

प्रेरणा संस्थेच्या वतीने नवोदय विद्यालय मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये श्री. बाळेश्वर विदयालय बारूळ (ता.



तुळजापूर) येथील विद्यार्थिनी मुस्कान बंदेनवाज पठाण हिची गुजरात येथे ६ दिवसाच्या प्रशिक्षण साठी निवड झाली आहे.

अतिशय कठीण असलेली ही परीक्षा मुस्कान ने सहज दिली व यश संपादन केले, तिच्या या यशामध्ये तिचे पालक, गुरुजन वर्ग यांचा सहभाग असून, संपूर्ण गावातून तिच्या या यशाबद्दल तिचे अभिनंदन केले जात आहे.

शिक्षण प्रसारक मंडळ अणदूरचे सचिव रामचंद्र आलुरे, मार्गदर्शक जेष्ठ विधीज्ञ लक्ष्मीकांत पाटील, ॲड. नागनाथ कानडे, शाळेचे मुख्याध्यापक मंगेश अणदूरकर, सर्व सहशिक्षक व सर्व ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले व पुढील प्रशिक्षणास शुभेच्छा दिल्या.

## 'छत्रपती शिवाजी महाराज स्व-समाधान' शिबिरास प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० मार्च -**

महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासनाच्या वतीने ढोकी येथील जिल्हा परिषद कन्या शाळेत आयोजित 'छत्रपती शिवाजी महाराज स्व-समाधान' शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आली.

अपर विभागीय उपायुक्त मंजुषा मिस्कर यांनी सकारात्मक दृष्टीकोनातून काम केल्यास प्रशासनाकडून अधिक चांगले परिणाम साध्य होतात, असे सांगितले.

तर तहसीलदार डॉ. मृणाल जाधव यांनी शासनाच्या विविध योजनांचा




लाभ नागरिकांना त्यांच्या गावीच मिळावा हा या अभियानाचा उद्देश असल्याचे स्पष्ट केले.

या शिबिरात जात, रहिवासी, उत्पन्न, नॉन-क्रीमी लेयर, राष्ट्रीयत्व, अल्पभूधारक, भूमिहीन, ॲग्रो स्टॅट, किसान कार्ड, एस.टी. स्मार्ट कार्ड तसेच आरोग्य सेवा अशा विविध योजनांतर्गत एकूण ११९२ लाभार्थ्यांना थेट लाभ देण्यात आला. तसेच २९० अर्ज स्वीकृत करण्यात आले, तर आरोग्य विभागामार्फत ३७ नागरिकांची तपासणी करण्यात आली.

शिबिरात विविध विभागांचे स्टॉल उभारण्यात आले होते. बचत गट व आशा कार्यकर्त्यांनीही सहभाग घेतला. अधिकाऱ्यांनी लाभार्थ्यांशी संवाद साधून अनेक प्रकरणांचा जागेवर निपटारा केला.

या उपक्रमासाठी ढोकी, पळसप व येडशी मंडळातील महसूल कर्मचारी, विविध विभागांचे अधिकारी, लोकप्रतिनिधी तसेच ग्रामपंचायत पदाधिकारी उपस्थित होते. शिबिराची तयारी मंडळ अधिकारी संभाजी तोगरे, तलाठी वेंकटेश लोमटे व त्यांच्या टीमने केली.